
3303

अंधश्रद्धेवर आघात

संपादक-सा.मधुजाधव

म. ग्रं. सं. ठाणे.
निषेध
3363



REFBK-0026092


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
वर्गणी भरावी लागले.

26 MAY 1990
6 JUN 1990
JUN 1990
7 JUL 1990
5 SEP 1990
5 JAN 1994
MAY 1990
14 JUL 1990
5 SEP 1990
3 OCT 1990
7 OCT 1990
5 FEB 1992
20 MAY 1992

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ निबंध
3303
२६०९२
नगरालय



अंधश्रद्धेवर आघात

महाराष्ट्रातील विचारवंतांनी साकार केलेले
अंधश्रद्धा निर्मूलनाचे पैलू

संपादक : प्रा. मधू श्री. जाधव, चिपळूण


REFBK-0026092

मनोविकास प्रकाशन, मुंबई

प्रकाशक :
मनोविकास प्रकाशन
अरविंद घनःश्याम पाटकर
आमदार निवास कंपाऊंड,
मंत्रालया शेजारी, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०३२.

मुखपृष्ठ : मनोज आचार्य

प्रथमावृत्ती : २५ नोव्हेंबर १९८९

मुद्रक : पॅरामाऊंट लिथो ऑफसेट,
जेकब सर्कल, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट,
मुंबई - ४०० ०११

संपादन : प्रा. मधु श्री. जाधव
दातार कॉलेज, चिपळूण, जि. रत्नागिरी.

लेसर टाईप सेटिंग :
पी. सी. सिस्टीमस्
ब्यू माँडे, १४/४९१, गॅब्रीअल स्ट्रीट,
माहिम, मुंबई - ४०० ०१६.

किंमत : २०.०० रुपये

बुवाबाजीतील चमत्काराला
सर्वोच्च न्यायालयात
आव्हान देणारे
थोर विज्ञानवादी
बी. प्रेमानंद (केरळ) यांना

प्रास्ताविक

अज्ञान पारतंत्र्य आणि गरिबी यांची श्रीमंती आपल्या देशाने दीर्घकाळ अनुभवली आहे. इंग्रजांच्या अधिपत्याखाली देश गेल्यानंतर गोऱ्या मिशनऱ्यांनी आपल्या भारतीय परंपरेतील अनेक दोष दाखवून दिले. तुमची समाजव्यवस्था सदोष, तुमचे देव वाईट, तुमच्या समजुती खोट्या, तुम्ही स्त्रियांचा छळ करता, असा सूर त्यांनी लावला. आपल्यातील समजूतदार विचारी लोकांना हे म्हणणे वाजवी वाटले. त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न सुरू झाला.

मराठी राज्य बुडाल्यानंतरच्या काळातील पहिले राजकारणी लोकहितवादी यांनी 'प्रभाकर' या पत्रातून शतपत्रे लिहून तत्कालीन पढिक-पंडितावर हल्ले चढविले. महात्मा फुल्यांनी परंपरागत समाजरचनेला उखडून टाकणारे क्रांतिकारक विचार मांडले. या वादळाने महाराष्ट्र हादरला. सत्यशोकध समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचे जणू रणशिंगच फुंकले.

विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी आपल्या देशाचा उज्वल इतिहास वाचकांसमोर ठेवताना निबंधमालेतून लोकभ्रमावर कोरडे ओढले. न्या. रानड्यांनी सामाजिक सुधारणेस तत्त्वज्ञानाचा दर्जा प्राप्त करून दिला. सुधारकाचार्य आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्यवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, व मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन या तत्त्वत्रयींचा हिरीरिने पुरस्कार केला.

स्वा. सावरकरांनी हिंदुत्वाची चौकट स्वीकारून विवेकवादी विचार प्रकर्षाने मांडले. 'धर्म म्हणजे व्यवहार धर्म, म्हणजे इतिहास. धर्म म्हणजे राष्ट्र आणि हा धर्म, कोणाला सुटला आहे?' अशी वास्तव भूमिका त्यांनी मांडली. परंतु त्यांची भूमिका फारशी कुणी समजून घेतली नाही.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षणाचे लोण बहुजन समाजात अगदी खालच्या थरापर्यंत पोचविले. व्यासंगी शैलीकार प्रा. श्री. म. माटे यांनी 'विज्ञान बोधाची प्रस्तावना' लिहून परामर्थप्रवण मताची परखड छाननी केली. प्रबोधनकार के. सी. ठाकरे, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, आचार्य दादा धर्माधिकारी यांनी विवेकवादी दृष्टिकोन रूजविण्यासाठी आपली लेखणी व वाणी झिजविली.

निरक्षर गाडगेबाबांनी किर्तनाच्या माध्यमातून देव, धर्म, मूर्तिपूजा, मानवता, यावर प्रभावीपणे विचार मांडून जनजागरण केले.

लोकशिक्षणातून - संस्कारातून खऱ्या अर्थाने सांस्कृतिक परिवर्तन होते. प्रगतीचे आस असलेल्या समाजाला प्रचलित व्यवस्था बदलायची मनाची तयारी ठेवावी लागते. आपल्या राष्ट्रनेत्यांनी स्वातंत्र्यासाठी लढे दिले, हे लढे केवळ राजकीय मुक्ततेसाठी नव्हते तर त्यांनी आपला संघर्ष आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाशी निगडित केला होता. जात, धर्म, पंथ, इ. मानवनिर्मित भेद नष्ट होऊन राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समता, बंधुता इथे रूजावी, असे झाले तरच आपली प्रगती होईल असा विश्वास त्यांना वाटत होता.

स्वातंत्र्यानंतर राजकीय लोकशाही अस्तित्वात येईल परंतु ही लोकशाही टिकविण्यासाठी, राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले पाहिजेत. "सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याची जीवनतत्त्वे होत. हे मान्य करणारी पद्धती," असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. ही तिन्ही तत्त्वे परस्परापासून अलग करता येत नाहीत. तसे झाले तर लोकशाहीचे अस्तित्व नष्ट होईल असा इशारा चाळीस वर्षांपूर्वीच त्यांनी दिला आहे.

अंधश्रद्धा हे भारतीय लोकशाहीपुढील जबरदस्त आव्हान आहे, असे प्रा. अ.भि. शहा यांनी म्हटले आहे. अंधश्रद्धा निर्मुलनाचे प्रयत्न हे अंतिमतः अज्ञान घालविण्याचे, मानवनिर्मित विषमता नष्ट करण्याचे प्रयत्न आहेत. एकूण समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील तो महत्त्वाचा घटक आहे. चार-दोन बुवांचा भांडाफोड करून किंवा भानामतीची २५ प्रकरणे हाताळून वा एखाद्या बाबाविरूद्ध केस दाखल करून भागणार नाही तर समाजातील सर्व घटकांची मानसिकता बदलणे हे ध्येय असावे लागते. काळ बदलला असे आपण म्हणतो, याचा अर्थ कॅलेंडरवरील तारखा बदलल्या एवढाच नसतो तर नवे ज्ञान आले, नवी आचारपद्धती आली. नवी जीवनमूल्ये रूजली हे आपणास अभिप्रेत असते. नव्या साधनांबरोबर नवी दृष्टी यावी लागते. अशी दृष्टी निर्माण होण्यात सगळ्यांचेच हित आहे यात शंका नाही.

अंधश्रद्धेवर आघात -

गेल्या शतकाच्या पूर्वार्धात या देशात इंग्रजांची सत्ता दृढमूल झाली. नव्या इंग्रजी साम्राज्याबरोबर विज्ञान आणि नवे शिक्षण आपल्या देशात आले. वाघीणीचे दूध परिवर्तनास उपकारक ठरले. या नंतरच्या काळातील अनेक मान्यवर

विचारवंतांनी अंधश्रद्धेवर आघात करण्यासाठी लेखन केले. त्यातील काहीं महत्त्वाचे साहित्य इथे सादर केले आहे. स्थूलमानाने प्रकाशन कालानुसार अनुक्रम ठेवला आहे.

या पुस्तकांत ज्यांचे विचार आहेत त्या सर्व व्यक्ती मान्यवर आहेत. सुधारणेविषयी आस्था बाळगणाऱ्या आहेत. हे विचारधन इथे समाविष्ट करण्यास अनुमती देणारे लेखक व संबंधित हक्कदार यांचे मी आभार मानतो.

थोर विचारवंत, साहित्यिक, समाजवादी तत्त्वचिंतक नानासाहेब गोरे यांनी अमूल्य वेळ खर्च करून विवेचक प्रस्तावना लिहून प्रेरणा दिली. त्यांचे हार्दिक आभार.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी उपयुक्त सूचना केल्या. मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. श्याम मानव यांच्याबरोबर झालेली चर्चा उपयुक्त ठरली. प्रा. डॉ. अंजली सोमण यांनी या कामी परिश्रम घेऊन उत्स्फूर्तपणे सहकार्य केले. प्रा. रेखा दंडिगे यांनी या प्रयत्नाचे स्वागत केले. चळवळीतील या सर्व सहकाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. गुरुवर्य डॉ. निर्मलकुमार फडकुले सर, डॉ. अनिल अवचट यांनी या धडपडीचे आवर्जून कौतुक केले.

मनोज आचार्य यांनी मुखपृष्ठ तयार करून दिले. गौतम शिंदे यांनी मुद्रणप्रत तयार करताना उत्तम सहकार्य केले. संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून देण्यात महाविद्यालयातील माझे सहकारी ग्रंथपाल सौ. आशा थत्ते, तसेच भीमराव बलाढ्ये यांनी तत्परता दाखविली. पॅरामाऊंट लिथो ऑफसेटच्या कुशल कामगारांनी छपाई केली.

आठ वर्षापूर्वी बी. प्रेमानंदांची भेट झाली. त्यांच्या विज्ञानयात्रेत सहभागी झालो. नव्या विश्वाची ओळख झाली. नवी वाटचाल सुरू झाली.

चळवळीबद्दल जिव्हाळा असलेले कार्यकर्ते अरविंद पाटकर यांनी पुस्तकाच्या प्रकाशनात खूप आस्था दाखविली, त्यामुळेच हे प्रकाशन शक्य झाले. वरील सर्वांचे मी आभार मानतो. अंधश्रद्धा निर्मूलन कामात रस घेणाऱ्या कार्यकर्त्यांना, जिज्ञासु रसिकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

- मधू जाधव.

प्रारंभीचे चार शब्द

प्रा. मधू जाधव यांनी संपादित केलेला "अंधश्रद्धेवर आघात" हा ग्रंथ म्हणजे एकवीस निरनिराळ्या लेखांचा एक संग्रह आहे. त्याची विशेषता या मध्ये आहे की, यातील प्रत्येक लेख वेगवेगळ्या लेखकाने वेगवेगळ्या प्रसंगी लिहिलेले आहेत. लेखनाच्या विषयांतही बरीच विविधता आढळून येते. तथापि सर्व लेखकांचे व लेखांचे उद्दिष्ट मात्र एकच असल्याचे दिसून येईल. समाजातील परंपरागत अंधश्रद्धा, रूढ समजूती, मंत्रतंत्र आणि धर्म-कल्पना यांचे जंगल शक्य तेवढे खणून काढून तेथे नवविचारांच्या लागवडीसाठी नवी मनोभूमी तयार करण्याचा सर्वांनीच आपआपल्या परीने प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्रामध्ये रूढ धर्म-कल्पनांना हादरे देण्याचे कार्य नेटाने सुरू करणाऱ्या जोतीराव फुल्यांपासून मानवी समानता हे धर्मा पलिकडचे उच्चतर असे नैतिक मूल्य आहे, असा ठाम विचार प्रतिपादन करणाऱ्या लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापर्यंतच्या सर्व सुधारणवादी लेखकांनी या ग्रंथात हजेरी जावलेली आहे. या लेखकावलीमध्ये आजचे आघाडीचे लेखक प्रा. शाम मानव, डॉ. नरेंद्र दाभोळकर आणि डॉ. अनिल अवचट यांचीही नावे झळकताना दिसतील. संत गाडगे महाराज यांचे शेवटचे कीर्तन या ग्रंथामध्ये शब्दशः उध्दृत करून संपादकांनी या ग्रंथावर अस्सल वऱ्हाडी साज चढवलेला आहे आणि त्यामुळे ग्रंथाच्या गोडीमध्ये भर पडली आहे असे मला आवर्जून म्हणावेसे वाटते.

"तत्वज्ञांचे दुहेरी धाडस" हा. कै. श्री. म. माटे यांचा लेख, "बुद्धी, माणसाची खरी शक्ती" हे दादा धर्माधिकाऱ्यांचे प्रतिपादन, "विज्ञानाचे विमोचक सामर्थ्य" हा अ. भि. शहा यांचा निबंध, त्यांच्यातील विशिष्ट भाषाशैलीमुळे व विषय प्रतिपादनाच्या धाटणीमुळे त्या त्या दिवंगत लेखकांच्या मूर्ति वाचकासमोर उभ्या करतात. "धर्म आणि कल्पना आली कोठून" हा लेख कै. आगरकरांच्या मूलगामी विचार-सरणीचे दर्शन घडवतो तर "वेडगळ धर्मकल्पनांनी देश भिकेस लागला" या लेखावरून डॉ. आंबेडकरांच्या हृदयातले आर्त आपल्या प्रत्ययास येते. "व्रत-वैकल्ये" हा सावरकरांचा लेख वाचला म्हणजे सावरकर काय सांगत होते आणि त्यांच्या नावाचा जप करणारे त्यांचे आजचे अनुयायी ज्याचा पूरस्कार करीत आहेत त्यातले अंतर लक्षात घेऊन आश्चर्य वाटते. तसाच प्रकार "देवडीवरचा मुजरा" लिहिणारे कै. के. सी. ठाकरे यांचे विचार आणि बाळासाहेब ठाकरे यांची कृती तोलून पाहता होतो.

पण सावरकरांच्या अनुयायांची अथवा शिवसैनिकांचीच गोष्ट कशाला? जे स्वतःला फुले आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेण्यात धन्य मानतात त्यांची तरी

अवस्था कशा प्रकारची आहे? त्यांच्या मध्ये तरी जागृतीच्या कांही खुणा सापडतात काय? ज्या भट ब्राम्हणांनी धर्माची अफू पाजून बहुजन समाजाची बुद्धी नष्ट केली त्यांचे नागपाशी विळखे तुटून गेल्याला किती काळ लोटला? जुन्या पुरोहित वर्गाला पिटाळून लावल्यावर त्यांच्या जागी नवे पुरोहित नव्या स्वरूपात आले की जुन्या पुरोहितांच्या जागा ओसाड पडल्या? मला तर असे दिसते आहे की, नवे नवे बुवा, महंत, पुरोहित उत्पन्न होत आहेत. भैरोबा वीरोबा समोर हजारोंनी बकरी कापली जात आहेत, यल्लमा समोर पूर्वीप्रमाणेच जटा वाढलेल्या मुलींना देवदासी बनवले जात आहे, ब्राम्हणांच्या तोंडची अशुद्ध मंगलाष्टके ऐकल्यावाचून लग्ने होत नाही, सत्यनारायणाच्या महापूजा धडाक्याने होत आहेत आणि नवे नवे गणपती-मारुती कोपऱ्या कोपऱ्यावर प्रकट होत आहेत आणि ते सुद्धा ज्यादातर ब्राम्हणेतर तरुणांच्या पुढाकाराने होते आहे. सामाजिक सुधारणांच्या दिशेने समाज चालला आहे की विरुद्ध दिशेने? वाढते आहे काय? प्रकाश की अंधार? सत्यधर्म की धर्माचा बुरखा पांघरलेले पाखंड? आणि बहुजन समाजच या पाखंडाचा बळी होतो आहे ना?

परंतु चालू स्थितीबद्दल विस्मय वाटून अथवा खेद वाटून काहीच साध्य होणारे नाही. महात्मा फुल्यांच्या पासून जो विचार वेगवेगळ्या विचारवंतांनी गेली शंभर सव्वाशे वर्षे एवढ्या समर्थपणे मांडला तो आता मंदतेज होऊ लागलेला असल्याची जाण आपण ठेवावयास हवी. मानवी समानता आणि तिच्या पाठोपाठ येणारी अहिंसा ही दोन्ही तत्वे आजच्या घटकेला जणू रद्दबातल ठरत आहेत की काय असे वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण होत असलेली आपण पाहत आहोत. निरनिराळ्या धर्माच्या आपमतलबी आणि राजकारणी वापरामुळे समतेचे मुल्य जनता विसरत चालल्याचा प्रत्यय येतो. पुन्हा एकवार धर्माचा वापर अफूप्रमाणे होऊन विवेक बुद्धि हे जे मानवी समाजाच्या उन्नतीचे एकमेव साधन तेच गहाळ होणार नाही याची दक्षता आपण घेतली पाहिजे. धर्म वाढत आहे आणि भ्रष्टचारही वाढत आहे. याचा अर्थच असा की वाढत चाललेला दिसतो तो धर्म ढोंगीपणाचा आहे. अशा वेळी भ्रांत अशा कल्पनांचे आणि अंधश्रद्धांचे बुरखे फाडून विज्ञानाची ज्योत जनतेच्या अंतःकरणात पुन्हाएकदा पेटवण्याचे कार्य आपणा सर्वांनाच करावयाचे आहे. त्यासाठी अवश्य असणारी विवेचक बुद्धी आणि निर्धार यांचा लाभ या ग्रंथाच्या वाचनाने आपणास झाला तरी तो मोठाच लाभ समजावयास हवा. नवे काही जरी करता आले नाही, तरी आपल्याकडे चालत आलेला हा जागृतीचा दीडशे वर्षांचा वारसा आपण निदान सांभाळावयास तरी हवा.

ना. ग. गोरे

अनुक्रमणिका

१. निर्मीकाची पूजा आणि स्वर्ग - जोतिराव फुले १
२. अंगारे, मंत्र, तंत्र वगैरे
या लोकांची ढोंगे होत ! - लोकहितवादी ६
३. लोकभ्रम - विष्णुशास्त्री चिपळूणकर १०
४. धर्मकल्पना आली कोठून - गो. ग. आगरकर १३
५. तोडगे मंत्रप्रयोग व औषधी - वि. का. राजवाडे २०
६. वेडगळ धर्म कल्पनांनी
देश भिकेस लागला - डॉ. बाबासाहेब आंबेडकर २३
७. अंत्येष्ठी व श्राद्ध - हरिभाऊ चव्हाण २६
८. व्रतवैकल्ये - वि. दा. सावरकर ३२
९. तत्वज्ञांचे दुहेरी धाडस - श्री. म. माटे ३५
१०. देवडीवरचा मुजरा - के. सी. ठाकरे ४२
११. शेवटचे किर्तन - गाडगे महाराज ४५
१२. विश्वाविरुद्ध - पु. ग. सहस्रबुद्धे ५२
१३. बुद्धी : माणसाची खरी शक्ती - दादा धर्माधिकारी ५८
१४. विज्ञानाचे विमोचक सामर्थ्य - अ. भि. शहा ६२
१५. बुवाबाजी आणि समाज - नरहर कुरुंदकर ६८
१६. संत आणि चमत्कार - निर्मलकुमार फडकुले ७२
१७. कथा सत्यनारायणाची - भीमराव कुलकर्णी ७८
१८. पाप-पुण्याची कल्पना - प्रा. श्याम मानव ८२
१९. अंधश्रद्धा निर्मूलन
आक्षेप आणि आशय - डॉ. नरेंद्र दाभोळकर ९१
२०. संभ्रम - डॉ. अनिल अवचट ९८
२१. मानवी समानता हे
धर्मापेक्षा उच्च नैतिक मूल्य - लक्ष्मणशास्त्री जोशी १०२

निर्मीकाची पूजा आणि स्वर्ग

- म. जोतिराव फुले

जोतिराव गोविंदराव फुले (१८२७-१८९०)-

महाराष्ट्रातील आद्य कर्ते सुधारक, समाजपरिवर्तनवादी चळवळीचे पुरस्कर्ते. सत्यशोधक समाजाचे संस्थापक, स्त्रिया, अस्पृश्य, शेतमजूर, शेतकरी, वेठबिगार, बलुतेदार यांच्यातील जागृतीसाठी अविश्रांत झटणारा युगपुरुष. संघर्षात्मक आणि रचनात्मक कार्य करणारा आदर्श 'महात्मा'.

सार्वजनिक सत्यधर्म, इशारा, गुलामगिरी, विवेकसार, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब इ. ग्रंथातून त्यांनी आपले मूलगामी विचार मांडले. यातून त्यांनी स्वातंत्र्य, समता, मानवता आणि विश्वबंधुता यांचा प्रचार केला.

खालील उताऱ्यातून त्यांनी निर्मीकांची (परमेश्वर) पूजा आणि स्वर्ग या विषयी संवादाच्या माध्यमातून चर्चा केली आहे.

पूजा

बळवंतराव हरी साकवळकर. प्र० - आतां आपल्या निर्माणकर्त्यावर पुष्पें चढवून त्याची पूजा आपण मानवांनी कोणत्या तऱ्हेनें करावी ?

जोतीराव उ० - या अफाट पोकळींतील अनंत सूर्यमंडळासह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित पृथ्वीवरील पुष्पें वगैरे सर्व सुवासिक पदार्थ जर निर्माणकर्त्यानीं दया दृष्टीनें आपल्या **मानवांच्या उपभोगासाठी** उत्पन्न केलीं आहेत, तर त्यांपैकी कोणता पदार्थ उलटा आपण निर्मीकावर वाहून त्याची पूजा करावी ? एकंदर सर्व पदार्थ निर्मीकानें जर उत्पन्न केले आहेत, तर आपल्याजवळ आपलें स्वतःचे काय आहे, तें निर्मीकावर वाहून त्याची पूजा करावी ?

बळवंतराव. प्र०- तर मग आतां आपण या पुष्पांचा काय उपयोग करावा?

जोतीराव. उ०- स्वपरिश्रमानें आपल्या कुटुंबाचें पोषण करून रात्रंदिवस जगाच्या कल्याणासाठी झटणारे-म्हणजे अज्ञानी मानव बांधवास आपमतलबी व स्वकार्यसाधु लोकांच्या जाळयांतून मुक्त करणारे अशा सत्पुरुषास फुलांच्या माळा करून नित्य ईश्वराच्या नांवानें अर्पण कराव्यात म्हणजे पुष्पांचें सार्थक

झालें.

नामस्मरण

बळवंतराव हरी साकवळकर. प्र० - निर्माणकर्त्यांचें वारंवार पोकळ नामस्मरण केल्यानें त्यास संतोष होईल काय ?

जोतीराव फुले. उ०- आपण घरीं असतां मी आपल्या घरीं तुमच्या नांवानें एखाद्या धातूच्या अथवा दगडाच्या मूर्तीवर पुष्पें वाहून तुमचें नामस्मरण केल्यास तुम्हांस त्यापासून कांही खरा फायदा होईल काय ? त्याचप्रमाणे एका मातापित्यास सुमारें दहा मुलें झालीं; व त्या उभयतांनी परिश्रम करून आपला वृद्धापकाळ होत तोंपर्यंत त्यांचे पालनपोषण केलें व तीं आतां उभयतां वृद्ध होऊन पंगू झाल्यावर त्यापैकीं थोरल्या मुलानें त्यांच्या पाळणपोषणांकरितां कांही खटपट न करितां "माझी माता, माझा पिता" असें पोकळ नामस्मरण करूं लागल्यास मातापित्यास त्याच्या भांवडांस उपवासानें मरावें लागेल कीं नाही बरें ? परंतु दुसऱ्या मुलानें मातापित्याचें व धाकट्या भांवडांचें पाळणपोषण केल्यास त्याचे आईबाप व बहिणभावंडे सुखी होऊन आनंद पावतील किंवा नाही बरें ? यावरून केवळ मातापित्याचें पोकळ नामस्मरण करणारा मुलगा, किंवा अति मेहनत करून स्वकष्टानें त्यांचें व बहिणभावंडांचें पोषण करणारा, या सर्वांस आवडेल ? तद्वत् आपल्या परिश्रमानें उदरनिर्वाह न करितां अथवा जगाच्या हितासाठी न झटतां, केवळ आपलें पोट जाळण्याप्रीत्यर्थ बहुरूप्यासारखें ढोंगी बैराग्याचें सोंग घेऊन सर्वकाळ भांग पिऊन तिच्या अमलांत अज्ञानी भोळ्या जनांचे मिष्टान्नांवर नित्य ताव देऊन लाल गाजरासारखे गलेलठ्ठ पडून, निरर्थक निर्मीकांचें नामस्मरण करितात, ते निश्चयेंकरून विचारवान् पुरूषांच्या उपहासास पात्र होतात.

बळवंतराव. प्र०- तर मग निर्मीकाचें नांवसुद्धा आपण मानवांनी घेऊं नये काय ?

जोतीराव. उ० - आपण मानवांनी **कृतज्ञपूर्वक व मनःपूर्वक** निर्मीकाचें नांवसुद्धां घेऊं नये, ह्मणून सिद्ध करणारास अधम व कृतघ्न म्हटलें पाहिजे.

बळवंतराव. प्र० - तर मग मानवानें कृतज्ञपूर्वक निर्मीकांचे नांव कसें व कोणत्या वेळीं घ्यावें, याविषयी विस्तारानें स्पष्टीकरण कराल, तर फार उत्तम होणार आहे.

जोतीराव. उ०- जो आपणास निर्माण करून सतत आपलें पाळणपोषण करीत असतो व काळजी वहातो त्याच्या नांवाचा घोष धर्ममिषानें, कोल्ह्यासारखा नानाविध युक्त्या लढवून कोणत्या तरी मार्गानें अज्ञानाच्या हातावर तुरी देऊन **स्वकुटुंबाचा निर्भयपणें निर्वाह करणाऱ्या धूर्त भट्ट मानवानें** मौल्यवान नखरेदार पितांबर नेसून रजस्वला स्त्रीसारखें सोंवळें होऊन, सुगंधी पदार्थाच्या योगानें घमघमाट ज्या ठिकाणीं सुटला आहे, अशा पूजेच्या खोलींत नकट्या गुन्हेगारासारखें आपलीं नकटीं नाकें मुठींत धरून, बगळ्यासारखें एकचित्त होऊन, दिवाभितासारखें गच्च डोळे झांकून, मोठ्या धार्मिकपणाचा आव घालून, त्याचे नांवाचा घोष जर केला, तर आपल्या सर्वांच्या परमन्यायी निर्मीकास या अट्टल धूर्त गारुड्याचें नामस्मरण पाहून अत्यंत संताप होणार नाहीं काय ? यास्तव निर्मीकाचे नांवाचें सदा सर्वकाळ भय बाळगून त्याच्या नांवाची आठवण मनीं दृढ धरून, त्यानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व मानवांबरोबर **छक्केपंजे न करितां** सरळ सात्विक आचरण केल्यानें निर्मीकाच्या पवित्र नांवास सन्मान दिल्यासारखें होईल. परंतु केवळ निर्मीकाच्या नांवाचा सतत व्यर्थ नामघोष करून त्याचें मस्तक फिरविल्यानें त्यास निःसंशय संतोष होणार नाहीं. सारांश आपल्याकरितां निर्मीकानें निर्माण केलेल्या वस्तूंचा, त्याच्या नांवानें कांहीं धर्मसंबंधित कल्पित छक्केपंजे उत्पन्न केल्याशिवाय आपल्या सर्वांच्या श्रमाप्रमाणें उपभोग घेण्याची सुरवात केल्याबरोबर, एकंदर सर्व जगांतील मानवप्राण्यांत कोणत्याहि तऱ्हेचे निरर्थक कलह उत्पन्न होणार नाहींत. व आपण सर्व बहिणभावंडांसारखें वागूं लागल्याबरोबर एकंदर सर्व मानवी प्राणी सुखी होऊन साक्षात् निर्मीकाचा अम्मल बसून त्याचें राज्य होणार आहे.

नेवैद्य अथवा अन्नदान

यशवंत जोतीराव फुले. प्र०- आपण निर्मीकास नेवैद्य दाखवून त्यास कसें तृप्त करावें ?

जोतीराव फुले. उ० -एकंदर सर्व पोकळींतील अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहपोग्रहांसहित पृथ्वीवरील सर्व प्रकारचे पदार्थ मानवाच्या निर्वाहाकरितां जर निर्माणकर्त्यानें आपल्या स्वेच्छेनें उत्पन्न केले आहेत, तर त्यापैकीं आह्मी कोणत्या पदार्थाचा उलटा नैवेद्य अर्पण करावा ?

जोतीराव. उ० - तर यावरून तुमच्या मतें आळशी म्हणून निरूपयोगी

भट्ट भिक्षुकांस सहस्त्र भोजनें व दक्षिणा देऊं नये काय ?

जोतीराव. उ० - तसें नव्हें, कोणत्याहि प्रकारचा भेदाभेद न करितां एकंदर सर्व मानवांपैकी जो कोणी आपल्या कुटुंबाचें पोषण करून जगाच्या कल्याणासाठीं सतत रात्रंदिवस झटत आहे, तो आर्य भट्ट भिक्षुक असो, अथवा अमेरिकेंतील **इंडियन** असो अथवा ज्याला तुह्मी नीच मानितां असा एखादा **मृतप** असो, तो मात्र अन्नदान घेण्यास पात्र आहे आणि तशालाच अन्नदान केल्यानें निर्मीकास अर्पिलें जाणार आहे. कारण एकंदर सर्व मानवी प्राण्यांचा निर्माणकर्ता साक्षात् तोच आहे.

अनुष्ठान

बळवंतराव. प्र०- अनुष्ठानांपासून अथवा **जप** करण्यापासून निर्मीकास कांहीं संतोष होईल काय ?

जोतीराव. उ०- नाहीं, कारण हें सर्व अज्ञानरूप अंधःकारांत बुडालेल्या बांधवास बहुरूपी धूर्त ठकांचें लुटून खाण्याचें कृत्रिमी **सोंग** आहे.

बळवंतराव. प्र० - तर मग अनुष्ठान घालून जपतप कसें करावें ?

जोतीराव. उ०- निर्मीकानें एकंदर सर्व पदार्थ उत्पन्न केले आहेत. त्यापैकीं प्रत्येक पदार्थाचा कोणकोणत्या ठिकाणीं कसा उपयोग करावा, याविषयी रात्रंदिवस खटपट करून ध्यानस्थ होऊन त्याविषयीं विचार करीत बसल्यानें निर्मीकाची **अगाध शक्ति, अगाध चातुर्य व अगाध लीला** होणार आहे.

स्वर्ग

मनाजी बोलूजी मगर.प्र०- एकंदर जगांतील **अज्ञानी** लोक स्वर्ग म्हणून म्हणतात व त्या स्वर्गामध्यें पुण्यवान् मनुष्यांस यावत्काल अनाद्यंत सुख मिळतें, तसेंच पातकी मनुष्यांच्या त्यांच्या पातकांप्रमाणें नर्कात यावत्काल नाना प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात, याविषयीं तुमचें कसें काय म्हणणें आहे ?

जोतीराव गोविंदराव फुले. उ०-अति प्राचिन काळीं ह्मणजे ज्या वेळेस जिकडे तिकडे सुधारणूक हा पदार्थ काय आहे, हें ज्यांना माहींत नव्हतें, अशा लोकांनी स्वर्ग हा कोणी एक पशूपक्ष्यादिकांस भेडावण्याकरितां माळ्याच्या जितरांपांतील हडकाला शेंदूर लावून थेट बाहुल्यासारखा बागुलबुवा अथवा बुजगावणें करून ठेवला होता. पुढें कित्येक कामांत कालेंकरून सुधारणा होत

गेल्या; परंतु स्वर्गाविषयीं कोणीच विचार करून त्याचा खरा थांग लाविला नाहीं.

मनाजी. प्र० - यावरून स्वर्ग नाहीं ह्मणून तुह्मास वाटतें काय ?

जोतीराव. उ०- यांत काय संशय ? कारण एकंदर सर्व धर्मपुस्तकांत स्वर्ग आहे ह्मणून लिहितात; परंतु या पृथ्वीच्या पृष्टभागावरील एका तरी गृहस्थास स्वतः हा स्वर्ग पाहिला ह्मणून सांगता येईल काय ? त्याचप्रमाणें कल्पित पुराण शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देऊन पौराणिक कथेवर विश्वास न ठेवतां एखादा मनुष्य स्वर्ग पहाण्यास गेला व तो परत आला अशी कधींतरी गोष्ट घडून आली आहे काय ? व अशा प्रकारचा मनुष्य तरी एखाद्या भूभागावर सांपडेल काय ?

(सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक)



अंगारे, मंत्र, तंत्र वगैरे या लोकांची ढोंगे होत!

लोकहितवादी

गोपाळ हरी देशमुख (१८२३-१८९२). आंग्लकाळातील थोर विचारवंत. निबंधकार, भारतीय सुधारणावादाचे प्रवर्तक. इतिहास, राजकारण, समाजकारण, धर्म, व्यापार शिक्षण इ. विषयांवर अभ्यासपूर्ण मूलगामी लेखन करुन विद्याप्रेम, स्वावलंबन आधुनिकता, उद्योगप्रियता या गुणाची जोपासना केली.

सन १८४८ ते १८५० या काळात त्यांनी 'प्रभाकर' मधून सुप्रसिद्ध 'शतपत्रे' प्रसिद्ध केली. खालील उताऱ्यातून त्यांनी भ्रामक समजुती जीर्ण रुढी, मंत्रतंत्र यावर आपले विचार मांडले आहेत.

अंगारे, मंत्र, तंत्र, उपदेश, पुत्रप्राप्ती, रोगदूरीकरण, वगैरे या लोकांची ढोंगे होत हें जाणिलें पाहिजे. स्वच्छास्त्र व सदाचार यांचा प्रसार झाला पाहिजे. इत्यादि गोष्टींच्या प्रभावानें दारिद्र्य नष्ट होईल. याशिवाय वर ज्या गोष्टींकडे आज अविचाराने पैसा खर्चिला जातो म्हणून लिहिले आहे तिकडे बंद होऊन जिकडे खर्चिला जात नाहीं म्हणून दर्शविले आहे तिकडे खर्चिला जावा. ह्मणजे तेणेंकरून संपत्तीचा व्यर्थ व्यय न होता केलेला खर्च व त्यावर आणखी त्यांचे गुणीकरण होऊन देशांतली संपत्ति चिरस्थायी होईल. येणेंकरून आज जे आपण हताश, हतसंपत्, हतगर्व, नष्टैक्य आणि नष्टप्रभ झालों आहो त्या आपणांस महत्व, कीर्ति, उत्साह, सदभिमान आणि महत्वाकांक्षा पूर्णपणें वरतील व पूर्ववत् आपला दिगंती लौकिक होईल.

चांगली चांगली शास्त्रें, सदाचार व सद्रीती हीं चालू करावयाचें जें मुख्य कर्तव्य तें भुलून पाखंडप्रचार आणि मनसोक्त आचार यांचा विस्तार करण्याकडेच अविचारी आणि विषयलोलुप लोकांची प्रवृत्ति झाली. शास्त्रें, आचार रीतीभाती यांजमध्यें पुष्कळ फेरफार व सुधारणा कर्तव्य होत्या त्या एकीकडे राहून भलभलते ग्रंथ लिहिण्यांतच त्यांनी आपली बुद्धि आणि आयुष्य घालविले. देशामध्यें अनन्याचार, यातना, कष्ट व दुखें ही कशीं वाढूं लागलीं आहेत व त्यांचा प्रतिकार कसा करावयाचा इकडे कोणाचेंच लक्ष्य लागले

नाही. बालविवाहाचे नियम, विधवांच्या यातना, परदेशगमननिषेध, कूपमंडूकता, मिथ्याग्रह वगैरे जे धर्मशास्त्रांचे परिणाम अनुभवास येत त्यांजपासून परावर्तन करण्यात नवीन शास्त्र ग्रंथ तयार करणें व काल व देश यांजकडे बघून पूर्वीच्या ग्रंथांत सुधारणा करणें हे महत्वाचे विषय तसेच एकीकडे राहिले व त्यांजकडे सर्वांशांनी दुर्लक्ष्य केलें हा मोठा प्रमाद झाला. जोपर्यंत विचारवंत लोक असून विचारीपणा जागृत होता तोपर्यंत कालदेशमन्वंतराप्रमाणें विधीचे निषेध आणि निषेधांचे विधी करण्यास लोक समर्थ होते. परंतु विचाराचा अस्त झाल्यापासून लोक मूर्ख व आग्रही निघून त्याप्रमाणें विधिनिषेधांच्या दुरूस्ती करण्याचें काम तसेंच निव्वळ पडून राहिलें, असें कां व्हावें हें कळत नाही. देशाचें व लोकांचें नष्टचर्य ओढवलें त्याप्रमाणें दुर्बुद्धि व मौर्ख्य आपल्या लोकांच्या पदरीं येण्यास कारण झालें. येवढें ह्मणून समाधान केल्याशिवाय गत्यंतर नाही. परंतु हा नष्टचर्याचा काल दिवसानुदिवस जात जाईल अशी आशा आहे. पूर्वीच्या लोकांच्या वरील चुका आता सुशिक्षणप्रसृतीनें दृष्टिगोचर होत चालल्यामुळें अल्पावकाशांतच त्यांची सुधारणा होईल.

वर लिहिल्याप्रमाणें मंत्र, तंत्र आणि यंत्र इत्यादि कल्पित व मिथ्या भ्रमांची वृद्धि करणारें प्रकार अनेक बाष्कळ ग्रंथकारांनी लिहून ठेवून, त्यांच्या आधारें ब्राह्मण, बोवा, व जती वगैरे लोकांनी सर्व देशास भूल घातली व सर्व लोक बावळे करून त्यांस वेड लाविलें आहे. द्रव्य हरण करण्यास या ढोंगी लोकांना असले ग्रंथ फार साह्यकारी झाले. ते लोक त्रिकोण, पंचकोण, षटकोण, नवत्रिकोण, अष्टकमल, षोडशकमल, श्रीयंत्र, इत्यादी यंत्रे काढून त्यांना निरनिराळी नांवे देतात. आणि त्यांची कोणी जनावरांचे रक्तानें, कोणी गोरोचनानें व कोणी केशरादि सुगधि द्रव्यांनीं पूजा करितात; कोणी स्मशानांत जाऊन किंवा होमहवनेंकरून ही यंत्रे भूर्जपत्रावर लिहितात; आणि अशा प्रकारच्या यंत्रसाधनानें मनुष्यें मरून जातात, उडून जातात, सेना पलायन करिते, मोक्षपदप्राप्ती होते, इत्यादि गप्पा सांगून भोळ्या व अविचारी लोकांस भुरळ पाडून त्यांची श्रद्धा असल्या कृत्यांवर मांत्रिक लोक बसवतात व हे आचार लोकांच्या आश्रयानें निर्वेधपणें चालतात. ह्या ढोंगांचा प्रचार सर्वत्र आढळतो. बायका, वाणी, बकाल, राजे व सरदार वगैरे अज्ञान लोकांचा वर्ग बघितला ह्मणजे त्यांच्या गळ्यांत, दंडावर, मणगटास वगैरे असली यंत्रें, भारलेले ताईत, गंडे व पेट्या बहुतकरून बांधलेल्या पाहण्यांत येतात. आणि असली साधनें व

यंत्र किंवा मंत्र साध्य करण्याच्या खटपटींत व तपासात ते नेहमीं असतात. परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, ही सर्व अविद्या आणि कपट आहे. त्याचप्रमाणें, पूर्वी जे मोठे विद्वान् पुरुष होऊन गेले त्यांचे नांवावर अनेक खोटे नाटे ग्रंथ ठग व अपस्वार्थी लोकांनी प्रसिद्ध करून ढवळ्यादिवसां फसविण्याचा बाजार मांडिला व भोळ्या लोकांस भुरळ पाडून त्यांजकडून आपला कार्यभाग साधून घेतला. तत्वतः या सर्व मांत्रिक व तांत्रिक कर्मात कांहीं एक सत्य नाहीं हे सिद्ध असतां, बावा, जती, मंत्री, पंचाक्षरी, मंत्रशास्त्री वगैरे लोकांच्या मंडळ्या ठिकठिकाणीं अडाणी लोकांस फसविण्यास आणि बुचाडण्यास आपल्या सोंगाढोंगांचा पसारा मांडून बसलेल्या आढळतात. त्यांची सोंगे ढोंगे ओळखण्यास उशीर लागत नाही. त्यांच्यांतील बहुतेक लोक कपाळास भस्म, शेंदूर किंवा कुंकुमाचे मोठमोठे पट्टे लावून आपल्यास फार पवित्र व साधू समजतात. अशांच्या नादी लागून फसणें ह्मणजे केवळ बावळेपणा आणि आत्महितशत्रुत्व होय. त्यांची कपटें आणि दांभिक आचरणें समजून त्यांच्या संसर्गापासून दूर रहावें हेंच विचारी मनुष्याचें काम आहे.

ज्यांच्या पूर्वजांनी तर्क, व्याकरण, औषधीविद्या, ज्योतिष, गणित इत्यादि महान महान् विद्यांचे आणि शास्त्रांचे शोध लाविले, व त्यांचे अध्ययनाध्यापन करवून जगामध्यें त्यांचा प्रसार केला, व ज्यांनी केवळ सत्यशोधनांतच आपलीं आयुष्यें घालविलीं, त्यांचे वंशांत असे असन्मार्गवर्ती, ढोंगी व सोंगाड्यें लोक निघून लोकांच्य भाविकपणाचा आणि अज्ञानाचा फायदा करून घेण्यांत आपलें कर्तव्य समजतात, ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे. सद्विद्या व सच्छास्त्र यांच्या शोधनार्थ व वृद्धर्थ आपल्या आर्यपूर्वजांनी जे परिश्रम केले त्यांजबद्दल त्यांस उचित असा सन्मान आपल्या पूर्वजांकडून मिळाला आहे व अजूनही त्यांजबद्दल आपली पूज्य बुद्धि असावी हें योग्य आहे. परंतु त्यांचे वंशांत वर लिहलेले कुलकलंक असे सोंगीढोंगी व धुतारे लोक निर्माण होऊन त्यांच्या संबंधाची पूज्यता व आदरबुद्धि घालविण्यासारखीं निचतम कृत्ये करण्यास प्रवृत्त झालें; ही किती दुःखाची गोष्ट आहे बरे? असें होणें चांगले नाहीं.

या धूर्त व ठग लोकांचा अहोरात्र धंदा ह्मणजे हरयुक्तीनें आणि हरकसबाने लोकांस कसें फसवावें या विचारांत आपल्यास बुडवून घेण्याचाच असतो, असें बहुतांस समजले आहे. परंतु जसजसा अविद्यारूप अंधकाराचा सद्विद्याप्रखररश्मितेजोराशीकडून नाश होत जाईल, तसतसा हा ढोंगांचा व

धूर्तपणाचा बाजार मावळत जाऊन लोकांमध्यें सदसद्विवेक आणि सारासार विचार ही प्रसृत होत जातील अशी खात्री आहे. आणि असें झालें ह्मणजे, आतांपासूनच या गाढांधांत लोळणाऱ्या व सफै लुबाडणाऱ्या मांत्रिकादि लोकांस ओळखून त्यांच्या संसर्गापासून अलिप्त राहण्यास लोकांनी शिकलें पाहिजे, व त्याही लोकांस त्यांचे नाना ढंग टाकून खऱ्या पंथाला लागण्याविषयी शिकविलें पाहिजे. विद्याशिक्षणप्रसारानें हीं फसविण्याची आणि नाडण्याची बंडें दिवसेंदिवस जास्त वाढण्याची तरी निदान भीति नाहीं असें वाटतें व तशा लोकांस आतां असेंच सांगावयाचें कीं, बाबांनो, आतां तरी तुम्ही काल देश वर्तमान बघून त्याप्रमाणें आचरण ठेवा व आपला निर्वाह करा. आपण अमार्गाला जाऊन त्याबरोबर दुसऱ्यालाही अमार्गी ओढून ईश्वराच्या घरीं पातकी आणि सरकारच्या दरबारीं अपराधी कां होतां? याचें फल लोकांमध्यें फजिती आणि संसाराची दुर्दशा या व्यतिरिक्त काहींही मिळावयाचें नाहीं, हें पूर्णपणे लक्ष्यांत ठेवावे. आपली व आपल्या देशाची उन्नति कोणत्या विद्या कलांनी होऊन इतर सुधारलेल्या देशांशी आपली बरोबरी होईल याचे चिंतन करा. विचारभ्रष्ट होऊन भलभलतीं कृत्यें करूं नका. तसा काल आतां राहिला नाही.

लोकभ्रम

विष्णूशास्त्री चिपळूणकर

विष्णू कृष्ण चिपळूणकर (१८५०-१८८२)

मराठी भाषेचे शिवाजी. आधुनिक मराठी गद्यशैलीचे शिल्पकार, मराठी भाषा, इतिहास, आणि संस्कृती यावर पोटतिडिकेने लेखन. 'निबंधमाला' मधून स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यावर विविधांगी लेखन करून त्यांनी लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य केले.

केसरी वृत्तपत्र, न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा इ. संस्थांचे संस्थापक. खालील उताऱ्यातून त्यांनी खोट्या समजुती व रुढीमधला वेडेपणा सांगून शकून-अपशकुनातील खुळेपणा साधार पटवून दिला आहे.

कोणत्याही देशात शकुनाचे निरनिराळे प्रकार नव्हतेसे नाहीत. युरोपातील प्राचीन ज्ञानसंपन्न राष्ट्रे, ग्रीक व रोमन लोकांच्यातही इतिहासात हे खूळ पुष्कळच दृष्टीस पडते. व अद्यापही त्या खंडात अडाणी लोकांमध्यें भुतेखेते, ग्रहफले, जादू वगैरेंवर जसा विश्वास आहे तसाच शकुनांवरहि बहुधा असेलच. आमच्या देशात तर हा प्रकार आजपर्यंत भरपूर चालत आला आहेच.

शकुन म्हणजे पुढे घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींचे सूचक. यावरून शकुन अर्थात दोन प्रकारचे झाले : एक शुभ आणि दुसरा अशुभ. या दोहींविषयी निश्चित प्रमाण म्हणून काहीच नसल्यामुळे असे अर्थातच होत असेल की, जे एका देशात शुभ त्यासच दुसऱ्यात अशुभ मानीत असतील, व अशुभास शुभ. शकुन पुष्कळ गोष्टींवरून मानतात. पक्षांच्या शब्दांवरून व गतींवरून, कोणत्याही आवाजावरून, पोरांच्या साहजिक बोलण्यावरून, नेत्रादी स्फुरण पावल्यावरून वगैरे. तसेच मांजर, कावळा, घुबड, पिंगळे, कवडा इत्यादी प्राणीही शुभाशुभसूचक मानले आहेत. ग्रहांचे योग तर चोहोकडे शुभावह व अशुभावह मानलेले असून आमच्या देशात तर त्यावाचून काहीही चालत नाही. स्वयंपाकघरात चुली घालण्यापासून तो मोठ्या मोहिमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचे आनुकूल्य अगोदर करून घ्यावे लागते.

सर्वात मोठा शकुन म्हटला म्हणजे मांजराचा होय. कोणी काही

कार्यानिमित्त बाहेर पडला, आणि वाटेने मांजर आडवे गेले, की गेली मसलत! ही मांजराची गंमत पुष्कळांनी पाहिली असेल. एखादे वेळी दोघे-चौघे कोठे निघाले असता मध्येच एखाद्या घरातून मांजर निघते व माणसांच्या भयाने ते रस्ता ओलांडून समोरच्या घराकडे पळत जाऊ लागते. त्या बिचाऱ्याच्या ध्यानीमनीही नसते की आपल्या साहजिक जाण्याने या गृहस्थास आपण अपशकुन करीत आहोत व आपल्या केवळ यदृच्छेच्या गतीचा जाणाऱ्या गृहस्थांच्या कार्यावर येवढा जबरदस्त परिणाम घडणार आहे. यास्तव ते खुशाल बिनधोक जात असते. न्ण इतक्यात हे गृहस्थ हाकाटी करून दोघे इकडे होतात, दोघे तिकडे जातात. आणि त्यास हुसकू लागतात. मांजरास आपणावर एकाएकी येवढा गहजब गुजरण्याचा अर्थ काहीच न कळून बिचारे अगदी गांगरून जाते आणि इकडे पळ तिकडे पळ अशी त्याची त्रेधा उडते. मग त्या धांदलीत बहुधा या गृहस्थांच्या इच्छेविरुद्धच त्याचे गमन होते! याप्रमाणे घडणाऱ्या शकुनास बळेच माघारी फिरविण्याचा यांचा यत्न निष्फळ झाला असता हे हिरमुसले होऊन माघारी फिरतात, किंवा त्या अपशुकुनावरही काही तडजोड चालवून पुनः मार्गस्थ होतात! याप्रमाणेच **विधवेचे दर्शन, प्रेत समोरून येणे** वगैरेही अशुभसूचक होत. दिंुस्थानात म्हणजे **शिंद्यांच्या, होळकरांच्या वगैरे मुलखाकडे शिंकणे** हेही अपशकुन मानतात. वाटेने निघाले असता वगैरे कोणी शिंकता कामा नये. गाईकवाडाच्या मुलखात विधवेप्रमाणेच विधुराचेही मुखावलोकन अशुभ धरतात. जो विधुर म्हणजे **गतस्त्रीक** झाला त्याला **राजवाडा वर्ज्य!** तर असे अपशकुनांचे अनेक प्रकार आहेत.

आता काही **शुभ-शकुन सांगतो. सकाळच्या प्रहरी कोल्ह्याचे तोंड दृष्टीस पडणे, डावा डोळा लवणे, उजवा बाहू स्फुरण पावणे, वगैरे तसेच घराच्या बाहेर पडताच सवाष्ण बायका कडेवर पाण्याने भरलेल्या घागरी घेऊन सामोऱ्या येणे.** हा शेवटला शकुन फार उत्कृष्ट समजतात व मागील पद्धतीच्या श्रीमंत लोकांची अशी चालही सांगतात की ते काही एखाद्या मोठ्या कार्यास बाहेर पडले असता दहा-पाच बायका वर सांगितल्याप्रमाणे मुद्दाम तयारी करून स्वारी घराबाहेर पडते आहे तोच त्यांस सामोऱ्या याव्या अशी आधीच तजवीज करून ठेवायची! तसेच ज्या वाटेने बडी स्वारी जायची त्या वाटेत कोणी अपशकुनी माणूस येऊ नये म्हणून अगोदर शिपायांनी पुढे धावून बंदोबस्त करून ठेवायचा! हे वाचून सर्व सुविचारी मनुष्यांस हसू आल्याखेरीज

राहणार नाही. एकतर शकुन-अपशकुन म्हणजे सारी निव्वळ भ्रांती. त्यातून त्यास यदृच्छेने घडू न देता अपशकुनास पिटून लावून चांगल्या शुभ अशा शकुनास मुद्दाम कैद करून आणून पुढे उभे करणे व तसल्या मारून-मुटकून आणलेल्या शकुनाचे शुभत्व मानणे म्हणजे मुर्खपणाची सीमाच झाली!

वर शकुनाचे काही निरनिराळे प्रकार सांगितले. आता यांवर विश्वास ठेवणे यात समंजसपणा कितपत आहे, याविषयी विचार करू. कोणतीही गोष्ट खरी मानण्यास अनुभवसिद्ध प्रमाण पाहिजे; ते इतर लोकभ्रमांप्रमाणेच यासही बिलकुल मिळणार नाही. वर सांगितलेले मांजराचेच नेहमीचे उदाहरण घ्या. काही कामास निघाले असता मांजर आडवे गेले, आणि ते काम हटकून झाले नाही असे कोणाच्या तरी अनुभवास आजपर्यंत आले असेल काय? कार्याचे स्वरूप, कर्त्याचे शहाणपण व हिंमत, साधनाचा योग्यायोग्यपणा, इत्यादिकांवर हाती घेतलेल्या कामात यश अगर अपयश येणे हे सदासर्वदा असते. त्यात बिचाऱ्या मांजराच्या जाण्याचा काहीच संबंध नसतो.

पण यावर कोणी अशी शंका घेतील की आजपर्यंत हा विश्वास साऱ्या देशातील लोकांचा पूर्ण होता आणि अजूनही लक्षावधी लोकांचा आहे, तर हे सर्व लोक काहीच प्रमाण पाहिल्याशिवाय विश्वास धरीत असतील काय? अज्ञानी जे असतात त्यांच्या तोंडून हे वाक्य नेहमी ऐकू येते. त्याला एखादी नवी व सकृतदर्शनी विलक्षण वाटण्यासारखी गोष्ट सांगा. की हा वाद पुढे ठेवलेला! काय हो हजारो लाखो लोकांचे असे मत आहे आणि हाच काय तो शहाणा इतक्या सगळ्या लोकांना ज्ञान शिकविणारा! तर याप्रमाणे मनाने एकदां घेतलेले ग्रह मोडण्याची जगास नेहमी मारामार पडते. एकंदर लोकांची दुसरीही एक मोठी चूक अशी दृष्टीस पडते की एखाद्या गोष्टीचा खरेपणा किंवा खोटेपणा तिच्या स्वरूपावरूनच न पाहता ते नेहमी बहुमताकडे धावत असतात. जे एकदा मत पडून गेले त्यासच सारे अनुसरतात. मग ते खरे असो किंवा खोटे असो! त्याच्या स्वरूपाविषयी बारीक विचार करण्याचे कोणाच्या मनातही येत नाही! आणि तसे करण्याची योग्यताही थोड्यांचीच असते. याकरिता लोकशिक्षणाचा जेवढा फैलाव होईल तेवढा देशास हितावहच होतो. त्याच्या योगाने लोकांचे भ्रमजाल तुटुन सत्यासत्याची निवड करण्याचे त्यांच्या अंगी सामर्थ्य येऊ लागते.

धर्मकल्पना आली कोठून?

- गो. ग. आगरकर

सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५) - समाजसुधारणेच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा थोर विचारवंत. निबंधकार, केसरीचे पहिले संपादक, 'सुधारक' पत्राचे संस्थापक.

केसरीतील निवडक निबंध, आगरकर : निबंध संग्रह हे निबंधसंग्रह. डोंगरीच्या तुरूंगातील १०१ दिवस हे आत्मचरित्र, वाक्यमीमांसा हे व्याकरणपर पुस्तक व विकारविलसित हे हॅम्लेटचे रुपांतर ही त्यांची ग्रंथसंपदा. खालील उताऱ्यातून त्यांनी धर्मकल्पना, पिशाच्च, आणि आत्मा याविषयी तर्कशुद्ध विचार मांडले आहेत.

ज्याप्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रे टाकून देऊन नवी घेतो त्याप्रमाणे आत्मा एक शरीर टाकल्यावर दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो. जे लोक एकच आत्मा एका शरीरातून निघून दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो असें मानतात त्यांना तो आत्मा कांही वेळा शरीरावांचून कोठेंतरी अस्तित्वात असतो असे कबूल करणें भाग आहे, कारण एका शरीरासकट तो दुसऱ्या शरीरात शिरतो असें म्हणावें तर शरीरें शरीरांत शिरतांना दृष्टीस पडलीं पाहिजेत. पण तसा प्रकार आपण कोठेंच पाहात नाही. शिवाय एक शरीर दुसऱ्या शरिरांत शिरू शकेल असे मानिलें तरी मोठे शरीर लहान शरीरात शिरूं शकेल असें मानता येत नाही! चिल्टाचा आत्मा आपल्या पिंजऱ्यासकट डुकराच्या शरीरांत शिरेल कदाचित! पण हत्तीच्या आत्म्यानें आपल्या प्रचंड देहासकट पोरकिड्याच्या शरीरांत प्रवेश कसा करावा? पण तसें होणें अशक्य असेल तर मोठ्या शरीरांत राहणाऱ्या आत्म्यांना लहान शरीरांत केव्हांहि प्रवेश करावा लागत नाहीं, असें मानलें पाहिजे; परंतु तसेंहि मानतां येत नाही. कारण आत्म्यास जी देहावस्था प्राप्त होते ती त्याच्या कर्मानुरोधानें होतें. एखाद्या हत्तीनें मेल्यावर पोरकिड्याच्या जन्मास जावे असे वर्तन त्याच्याकडून झाले असेल तर त्याला तसेंच करणें भाग आहे. पण हत्तीचें शरीर तर पोरकिड्याच्या शरीरांत शिरू शकत नाही. तेव्हां शरीरांतर करतांना आत्म्यास काही वेळा अशरीरी बनावें लागत असेल असे कबूल करणें भाग आहे. तेव्हा पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांची किंवा

पिशाचयोनीचे अस्तित्व मानणाऱ्यांची प्राण्याचे आत्मे नेहमीच्या शरीराचा त्याग केल्यावर कसल्याहि शरीराच्या आधारांवाचून काही वेळ राहूं शकतात, अशी खात्री झाली असली पाहिजे. आत्मा हा कोणत्याहि इंद्रियास गोचर न होणारा असा सूक्ष्म परमाणु आहे असे या लोकांचे खरें मत असेल आणि सूक्ष्मत्वास ते अशरीरत्व समजत असतील तर त्यांचे बोलणें थोडेबहुत ऐकून घेता येणार आहे. पण अशरीरत्व म्हणजे शरीराचा अत्यंत अभाव असें म्हणण्याचा त्यांचा आग्रह असेल तर मात्र ते काहीतरी बडबड करतात असें म्हणावें लागेल. अशरीरी वस्तु म्हणजे काय? आम्ही शरीरी मर्त्यांनी तिची कल्पना कशी करायची? आत्म्याशिवाय एखादी अशरीरी वस्तु आमच्या पाहण्यात आली आहे काय? इंद्रियाला किंवा मनाला गोचर अशा वस्तूंचे अस्तित्व मानण्यास कोणीहि हरकत घेणार नाही. इंद्रिये ही मनाची द्वारे आहेत. मनांत आढळून येणारी प्रत्येक वस्तु कोणत्या तरी इंद्रियाच्या वाटेने प्रथम त्यांत गेलेली असते. किंबहुना इंद्रियविकारांवाचून आम्हांस मनाचें अस्तित्वदेखील समजणार नाही. यावर कोणी असें उत्तर देतील की, पिशाच किंवा अशरीरी मृतात्मा या वस्तु अस्तित्वांत नसतील तर त्या आपल्या मनांत कोठून आल्या? याचें उत्तर असें आहे की, वस्तु दोन प्रकारच्या आहेत; एक ज्यांचे प्रतिबिंब इंद्रियाद्वारा मनावर पडतें त्या, दुसऱ्या अशा रीतीनें मनावर ज्यांचे प्रतिबिंब पडले आहे त्यापासून तर्काच्या साह्यानें मनुष्याचे मन ज्या नवीन वस्तु निर्माण करतें त्या. मनानें अशा रीतीनें उत्पन्न केलेल्या वस्तुसमुदायास कधी कधी कल्पनासृष्टीहि म्हणतात. कैलास, स्वर्ग, वैकुंठ, पाताल, यम, यमपुरी, यमयातना वगैरे काल्पनिक वस्तु ज्या अर्थाने अस्तित्वात आहेत असे म्हणता येईल त्या अर्थानेंच अशा रीतीनें आत्म्याचें अस्तित्व पाहिजे तर मानिता येईल. मानसिक सृष्टीत बाह्य सृष्टीची हुबेहुब प्रतिबिंबे आणि त्यापासून कल्पनेने उत्पन्न केलेलें विश्व यांचा अंतर्भाव होतो. म्हणून मानसिक सृष्टीत जी जी वस्तु दृष्टीस पडते ती ती बाह्यसृष्टीतील वस्तूप्रमाणें अस्तित्वात आहे असें म्हणतां येणार नाही. ती कल्पनेने उत्पन्न केलेली असल्यामुळें फक्त मनांत आहे; खऱ्या बाह्य विश्वांत नाही. अशरीरी आत्म्याच्या कल्पनेंत आणखी एक गोष्ट आहे ती ही की इतर काल्पनिक वस्तूंप्रमाणें याचे आम्हास ठळक काल्पनिक चित्रदेखील काढिता येत नाही. "अनंत" शब्दाच्या अर्थात वास्तविकपणें जितकी दुर्बोधता आहे, तितकीच "आत्मा" या शब्दांत आहे; निर्गुण निराकार परमेश्वर अशरीरी मृतात्मा आणि

पिशाच याच्या रूपांत खरोखर काही भेद नाही. अशा प्रकारचा परमेश्वर आम्ही केलेली स्तुति ऐकून आम्हांवर प्रसन्न होतो आणि आम्हांस संकटांतून सोडविण्यास किंवा सुख देण्यास प्रवृत्त होतो असें म्हणणें जितकें गृहणीय आहे तितकेंच वेळचेवेळी श्राद्धें केल्यानें मृतात्मे संतुष्ट होऊन आमचे साहाय्यकर्ते होतात आणि पिशाचगण गायत्रीचा जप आणि यज्ञोपवीत यांच्या धाकांत रात्रंदिवस असतो असें म्हणणेंहि गृहणीय होणार आहे!

पिशाचांचें अस्तित्व जर इतके शंकास्पद असेल तर प्रत्येक राष्ट्रांत पूर्वकालापासून सर्व प्रकारच्या मनुष्यांच्या मनांत त्याची कल्पना कशी आली व ती अजून जात कां नाही, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. याचे उत्तर असें आहे की, मनुष्य केवळ सत्याचाच भोक्ता नाही; अमुक गोष्ट चुकीची किंवा खोटी आहे असे सिद्ध करून दाखविल्याबरोबर ती सोडून देण्यासारखी त्याची प्रकृति असती तर ज्या सुधारणांकरिता आपण इतकें तडफडत आहो त्या कधीच झाल्या असत्या व आज जे लोक सुधारक म्हणून मोडत आहेत त्यांनी करण्यासारखें कांहींच राहिले नसते! पण मनुष्याची प्रकृति तशी नाही. शेकडा नव्याण्णव माणसें ज्याप्रमाणे आचारांत त्याप्रमाणें विचारांतहि हाताला हात लावणारी असतात. शारीरिक श्रमापेक्षा मानसिक श्रम करण्याचा मनुष्याला जात्याच विशेष कंटाळा आहे. मळलेल्या वाटेने जाणे येणें ज्याप्रमाणें शरीराला त्याप्रमाणें मनालाहि फार सुखावह असते. तेव्हा ती वाट सोडून देणे त्याला सहसा बरें वाटत नाहीं. तशांत नवा मार्ग आपणांस भलतीकडे घेऊन जाणारा आहे असा त्याचा बोभाटा झाला असेल तर त्याकडे लाखांतला एक इसमसुद्धा ढुंकून पाहणार नाही. पिशाच्याविषयीं आमच्या विलक्षण कल्पना कायम असण्याचें हें पहिलें कारण होय. त्याचें दुसरें कारण असें आहें की, त्या नाहींतशा न होऊं देण्यांतच पुस्कळांचा फायदा असल्यामुळे तें आपल्या लेखांनी, भाषणांनी आणि कृत्यांनी त्या कायम करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करीत असतात! हे सर्व या विलक्षण पिशाचकल्पनांनी आम्हांस अद्यापि का सोडिले नाही याबद्दल झाले. आम्हा मनुष्यांत ही अशरीरी आत्म्याची किवा पिशाचयोनीची कल्पना प्रथम कशी येते या प्रश्नाकडे आता वळूं.

लहान मुले कधी कधी झोपेंत एकाएकी जागी होतात आणि मोठ्याने रडू लागतात, हे पुष्कळांनी पाहिले असेल. या रडण्याचे कारण त्यांना विचारलें तर ती त्याकडे लक्ष न देता अधिकच रडत सुटतात. पुढें थोपटाथोपट करून

पोटाशी धरून मोठ्या प्रयासाने त्यांचे रडणें बंद केलें म्हणजे ती शुद्धीवर आल्यासारखी होतात. अशा रीतीनें सावध केलेल्या मुलास बोलतां येत असेल व नजरेपुढें होऊन गेलेली गोष्ट सांगता येत असेल, तर तो असे म्हणेल की अमका अमका मला मारूं लागला, अथवा अमक्याअमक्यानें मला बाऊ दाखविला, किंवा फलाणा माझी अमुक वस्तु घेऊन जाऊ लागला म्हणून मी रडलो. थोर माणसें व लहान मुलें झोपेंत जें बरळत असतात त्यावरून व झोपेतून दचकून उठतांना त्यांच्या तोंडातून जे शब्द मोठ्या जोरानें एकाएकी निघतात त्यांवरून त्यांना कसल्या प्रकारची स्वप्ने पडत असावी, हें सहज समजण्यासारखे असतें. पुष्कळ वेळां ही स्वप्ने इतक्या व्यवस्थित रीतीने व स्पष्टपणाने पडतात की, चांगल्या सुजाण व प्रौढ मनुष्यास देखील जागे झाल्यावर आपण स्वप्नांत होतो अशी खात्री होण्यास बराच वेळ लागतो! अंथरूण चापचावें, डोळे चोळावे, हातपाय हालवावे आणि कसला तरी थोडाबहुत उजेड असल्यास इकडे तिकडे बराच वेळ न्याहाळून पाहावें, तेव्हां कोठे आपण निजलेल्या ठिकाणीच आहों, आपल्या सभोवतालच्या वस्तु जागच्या जागी आहेत आणि आपण कोठे गेलो नाहीं व आपणांकडे कोणी आला नाहीं अशी खात्री होते ! कधीं कधीं स्वप्नांतच हें स्वप्न आहे असें स्पष्टपणें वाटत असते; पण तें सुखावह असल्यास तसेंच पुढें चालावें अशी इच्छा होते आणि आपण त्याला चालू ठेवण्याचा प्रयत्न करतो; पण कांही कारणामुळें त्याचा भंग झाला तर आपणास क्षणभर फार वाईट वाटते, याचा अनुभव पुष्कळांना असलाच पाहिजे. तात्पर्य, पुढील अनुभवावरून स्वप्नांतील भास जरी मिथ्या आहेत असे दिसून आलें,तरी जोपर्यंत आपण स्वप्नांत गर्क होऊन गेलेले असतो तोपर्यंत ते प्रत्यक्ष अनुभवाप्रमाणें खरें वाटतात यांत संशय नाहीं. तेव्हा या भासाचे खरें कारण समजेपर्यंत मनुष्यांनी त्यांच्या उत्पत्तीविषयी नानाप्रकारचे तर्क केले यांत कांही आश्चर्य नाही. जागृतावस्थेतील इंद्रियानुभवात आणि स्वप्नावस्थेतील भासांत एक मोठा भेद आहे तो हा की, पहिल्या स्थितींत इंद्रियांचे आणि अवयवांचें व्यापार चालू असतात पण दुसरीत ते बंद असतात. स्वप्नांत डोळे मिटले असून दिसतें; चालल्यावाचून अन्य स्थळी जाता येते. तोंडात काही घातल्यावाचून खाल्ल्यासारखे वाटतें :- सारांश, इंद्रियांचे व शरीराचे सर्व व्यापार बंद असता स्वप्नांतील भास होतात. हे निर्विवाद आहे. पण ज्याला ते होतात तो एकच आहे. जागृतावस्थेला मी तोच

स्वप्नावस्थेतला मी. एक मी दुसऱ्या मीला पक्के ओळखीत असतो ! खरा मी कोणता - हा की, तो -अशी भ्रांति कधींच पडत नाही. दोन्हीही एकत्र मी आहेत अशी खात्री असते तथापि ज्याअर्थी त्या दोघांचे अनुभव अगदी भिन्न आशा दोन स्थितीत येत असतात, त्याअर्थी एकाच मीची ही दोन पृथक् स्वरूपे असावी, असा प्रथमारंभी मनुष्याचा स्वाभाविकपणे तर्क होतो; आणि तो होण्यास अनुभवभेदाचे सबळ कारण असल्यामुळे या द्विप्रकारक दोन मीच्या अस्तित्वावरील विश्वास पुष्कळ काळपर्यंत न कमी होता अधिकच होत जातो. ज्या लोकांत अशा प्रकारच्या दोन मींची कल्पना पडत नाही, त्या लोकांत मरणोत्तर मनुष्याचा आत्मा कायम राहतो अशी कल्पनाहि असत नाही पण तसे लोक फार थोडे आहेत. बहुतेक लोक प्रत्येक मनुष्याला दोन प्रकारचे मी, आत्मे किंवा स्वस्वरूपें आहेत, असें मानतात, हस्तपादादि अवयव हलेतनासे झाले असताच दृष्ट्यादी इंद्रियांचे व्यापार बंद पडले असतां आम्हांस सुख-दुःखाचा भास होतो हें कसें ? अर्थात् अवयवांच्या व इंद्रियांच्या अनुषंगावाचून सुखदुःखानुभव घेता येण्यासारखी आमच्या आत्म्याची किंवा आमच्या मीची दुसरी एखादी स्थिती असली पाहिजे असे अनुमान होणें अगदी स्वाभाविक आहे. आणि हें मनांत एकदां पक्के बसून गेले म्हणजे इंद्रियांच्या व अवयवांच्या मदतीवांचून आपणाला सुखदुःखानुभव कसा घेता येईल याबद्दल शंकाच येत नाही. इंद्रियांचे व अवयवांचे व्यापार बंद असतां मला सुखदुःखानुभव व इतर विकार होतात यांत संशय नाही; व ज्याअर्थी तें त्यांवाचून होतात त्याअर्थी ते त्यावाचून होण्याचे सामर्थ्य माझ्यात असले पाहिजे हें उघडच झालें. तेव्हा शरीर विकृत म्हणजे शरीरांत असतां ज्याच्यावर विकार घडतात असा आणि अशरीरविकृत म्हणजे शरीरांत जखडला नसतां ज्याचेवर विकार होतात असा एकच माझेपणांत भेद असला पाहिजे. आणि म्हणून या दोहोपैकीं एखादा नाहीसा झालाच पाहिजे असें कदापि म्हणता येणार नाही. एखादे वेळी दोघांचाहि बरोबरच लय होईल. नाहीच असे म्हणत नाही; पण तसे अनेक वेळा घडत नाही. गाढ झोप लागली असता आमचे आत्मे शरीरबंधन क्षणभर एकीकडे झुगारून देऊन पाहिजे त्या काळात किंवा पाहिजे त्या ठिकाणी प्रवेश करतात. आणि जागृतावस्थेत अत्यंत अलभ्य अशा वस्तुचाही स्वप्नावस्थेंत यथेच्छ उपभोग घेतात, हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे आणि बऱ्याच अंशी त्यावर आमच्या अशरीरविकृत आत्म्याची किंवा मीची कल्पना बसविली आहे.

एकदां स्वतःसंबंधानेही द्विप्रकारक मीची कल्पना कायम झाली, (आणि नित्याच्या द्विविधात्मक अनुभवामुळें ती केव्हाच होते) म्हणजे दुसऱ्यालाहि असे दोन मी असतील असें वाटणें स्वाभाविक आहे, आणि दुसऱ्यांनी तसें असल्याबद्दल खात्री दिली म्हणजे हा ग्रह अल्प काळांत पक्का होऊन व पुढें त्यास अशा प्रकारच्या गोष्टींचा आधार मिळत गेल्यास तो थोडक्या वर्षात ठाम होऊन बसतो. झुलू लोकांचा असा समज आहे कीं, जे मेलेले पुरूष स्वप्नांत येतात ते सापाच्या किंवा छायेच्या रूपानें येत नाहींत; तर जिवंतपणी त्यांची जीं शरीरें असतात त्यांनिशींच ते येतात, आणि आपल्या जातींतील मनुष्यांशी बोलतात. मात्र जागें झाल्यावर स्वप्न पडणारास असें वाटतें कीं, अमकातमका अद्यापि जिवंत असून केवळ त्याची छाया मजकडे आली होती. वस्तुतः तो स्वप्नांत मूळच्या शरीरानें येतो. पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबास अंदमान बेटांतील लोक मनुष्याचा एक आत्माच मानितात. स्वप्नांत मनुष्याचा आत्मा नाकपुड्यांतून बाहेर पडून पाहिजे तिकडे वावरतो आणि हव्या त्या क्रिया करतो, असाहि या लोकांचा समज आहे. स्वप्नासारखेच दुसरे कांही प्रसंग आहेत, त्यांनींही याच कल्पनेचें पृष्टीकरण होतें. कोणतहि कारणांमुळें एखाद्या मनुष्यास एखादें वेळीं बेशुद्धि आली तर ती त्याला त्याचा आत्मा कोठें तरी भटकत असल्यामुळें येते, अशीही पुष्कळ लोकांची समजूत आहे. मनुष्याला झोप लागली असतां किंवा कोणत्याहि कारणांनें त्याच्या वृत्तीचा लय लागला असतां त्याचा आत्मा शरीरांतून बाहेर पडून मोकळा होतो, आणि देहबद्ध असतां ज्या गोष्टी त्याला सांगता किंवा पाहतां येत नाहींत त्या तो सांगू व पाहू शकतो, असाहि पुष्कळांचा विश्वास आहे. ही तादात्म्य दशा कृत्रीम असली तरी तींतदेखील तसाच प्रकार घडतो. अमेरिकेंत एका जातीचे रानटी लोक आहेत, ते असली लयावस्था उत्पन्न करण्यासाठी कडक तमाखूचा काढा करून घेतात. आपल्या लोकांत कांही प्रकृतीच्या मनुष्यांस धोतरा चारल्यानें किंवा ऊद घातल्यानें अतींद्रियज्ञान प्राप्त होऊन भूतभविष्य बिनचूक सांगता येतें, असा मूर्खपणाचा समज आहे. देवऋषि, पंचाक्षरी वगैरे लबाड लोकांचा धंदा व्यवस्थित चालण्यास व नसरोबाची वाडी, औदुंबर वगैरे क्षेत्रांचे महात्म्य इतकें वाढण्यास हाच मूर्खपणाचा समज कारण झाला आहे. मेंदूचे विकार अनेक तऱ्हेचे आहेत, व त्यांपैकी कांही कांही जातींच्या तापाप्रमाणें थोड्या दिवसांनी आपोआप नाहींसे होतात, हें ज्यांना ठाऊक नाहीं आणि पूर्वापार

चालत आलेल्या कल्पनांचा आणि विचारांचा मेंदूच्या विकृत स्थितींत मनावर केवढा परिणाम होतो याची ज्यांना अटकळ नाहीं, त्यांनी चारदोन अनुकूल उदाहरणांवरून दत्ताच्या किंवा दुसऱ्या एखाद्या देवाच्या अथवा मांत्रिकाच्या सामर्थ्याचे पोवाडे गावे यांत आश्चर्य तें कोणतें ? कोणत्याहि कठीण गोष्टीची सामान्य मनुष्यास खरी मीमांसा करतां येईनाशी झाली म्हणजे तो तीबद्दल पाहिजे तो ग्रह करून घेण्यास तयार होतो. सुधारलेल्या लोकांस प्रतिध्वनि कशानें होतों हें पक्के ठाऊक झालें आहे. पण रानटी लोकांस तो एक पिशाच आहे असें वाटतें ! मनुष्याच्या सावलीला आत्मा समजणारेहि कांही लोक आहेत. फेपरें, अपस्मार, वेडा मधुरा व सन्निपात वगैरे रोगांत वायूचे जे झटके येतात त्यांतहि रोग्याच्या आत्म्यांस असामान्य उन्नतावस्था प्राप्त होऊन भूतभविष्य सांगण्याचे सामर्थ्य येतें असा पुष्कळ अडाणी लोकांचा समज आहे. अशा स्थितींत जर मनुष्याचा आत्मा कांही वेळ नाहींसा होऊन पुनः परत येता तर झोंपेशी व इतर प्रकारच्या बेशुद्धीशीं साम्य पावणारी जी मृतावस्था ती ज्याला प्राप्त झाली आहे त्याचा आत्माहि शरीर सोडून कोठें तरी भटकत कशावरून नसेल व शरीर जपून ठेवलें तर तो फिरून कशावरून प्रवेश करणार नाहीं असा रानटी लोकांच्या मनांत सहज प्रश्न उत्पन्न होतो आणि ते झोंपेप्रमाणेंच मरणालाहि मोठी झोंप समजून तीविषयी तसलेच तर्क करतात. लघुनिद्रा आणि महानिद्रा यांतील भेद समजण्यास बरेंच शहाणपण लागतें. मेलेल्या मनुष्यांचें प्रेत जाळून त्याची राख दहा दिशांला फेंकून टाकली तरीदेखील त्याचा आत्मा येथेंच कोठें तरी किंवा अन्य ठिकाणीं निदान कांही वेळ जीव धरून असतो अशी ज्यांची समजूत असेल (आणि या देशांत अशा समजुतीचें पुष्कळ लोक आहेत) त्यांनी आपण मनुष्याच्या प्रथमावस्थेंत किंवा वन्यावस्थेंत आहों असें बेलाशक समजावें !

आगरकर लेखसंग्रह

तोडगे, मंत्रप्रयोग व औषधी *

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे

इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (१८६३-१९२६) वाङ्मय संशोधकाचे मेरुमणी, त्यागी इतिहासकार. भारत इतिहास संशोधन मंडळाचे प्रवर्तक. अखंड परिभ्रमण करून त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने (२२ खंड) गोळा केली.

प्राचीन साहित्य, समाजशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र, व्याकरण यावर विपुल लेखन. तर्कशुद्ध भाषा, साधार विचार, बहुश्रुतता, ओजस्विता हे गुण त्यांच्या लेखनात आढळतात. खालील उताऱ्यातून त्यांनी क्षुद्र व भ्रांत तोडगे यावर साधार आणि सडेतोड विचार मांडले आहेत.

(राजवाड्यांच्या संशोधनाला अविषय कोणताच नव्हता. व्यापक दृष्टीचा संशोधक सर्व गोष्टींचा संग्रह करण्याला का प्रवृत्त होतो आणि उपलब्ध साधनांचा तो केव्हां कसा उपयोग करतो, याची कांहीशी कल्पना प्रस्तुत टिपणावरून येईल. **मध्यंतरीचे शेरे कसे मार्मिक व विनोदगर्भ आहेत, याकडे लक्ष द्यावें.**)

हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत मंत्रतंत्र व जादू टाणेटोणे यांचें प्राबल्य पूर्वीपासून आहे. सध्याहि फारसें कमी झालेंलें नाहीं. जास्तच झालेले आहे, असें म्हणण्यास आधार आहे. उदाहरणार्थ, आकल्टिझम, थियॉसॉफी स्पिरिटऱ्यापिंग, टेबलटर्निंग वगैरे, म्हणजे जुन्या लोकांत जुनी खुळें होती. **नव्या इंग्रजी शिकल्या सवरल्या लोकांत यूरोपिअन धूर्तांच्या शिकवणीने व भूलथापांनी नवीं खुळें माजत आहेत किंवा जुन्या खुळांच्या नव्या आवृत्त्या निघत आहेत.....** पुणे येथे मी जुन्या बाडांचा व ग्रंथांचा जो संग्रह केला आहे, त्यात मंत्रतंत्राची व जादूटोण्याची बाडें बरींच आहेत. त्यांत एक बाड सुमारे १००-१५० वर्षापूर्वीचे आहे. यांतील कांहीं उतारे पांचचारशें वर्षांपूर्वीचे असावे, असा त्यांच्या भाषेवरून तर्क होतो.. ह्या बाडांतील कांही चमत्कार करमणुकीकरिता आपल्यापुढे मांडतो.

---

* निबंध - 'मंत्रतंत्र व जादू टाणेटोणे', भा. इ. सं. मंडळ, 'अहवाल', श. १८३२, पृ. ४३-५४.

(१) धान्याभिवृद्ध्यर्थ तोडगा :

वीशाखाः नक्षेत्रीं अंब्याचा वृक्ष आपणापासी : असलीयां :
धान्यरासीमध्ये घातलीयां : धान्येरासीस अभीवृद्धी होये : ॥ १ ॥

पाऊसपाण्याशिवाय व मेहनतमशागतीशिवाय धान्याभिवृद्धि झाल्यावर शेतकऱ्याला शेतांत भुतांची बाधा होण्याचा संभव असतो. त्यावर

(२) भूतबाधा हरण्याचा तोडगा :

मृगनक्षेत्रीः वेलतुराचा वृक्ष आनुन
हाती बांधावाः भुतबाधा हरेः ॥ २ ॥

बिचाऱ्या शेतकऱ्याची भूतबाधा हरल्यावर, वाटेल त्या मनःकामना त्याच्या मनांत उठण्याचा फार संभव. सबब

(३) मनः कामना पूरणाचा तोडगा

मूळ नक्षेत्रीः पाडळीचा वृक्ष घेईजे सन्नीष असलीयांः
जे चींती तें काम होयेः ॥ ३ ॥

(३७) दगड न लागण्यास तोडगा :

कानफोडी, कातमांडा, लज्जाळु, उरबीली, यैसी
४ मुळें शनवारी आंवतुन रविवारीं चौमुळांच्या रसें
कुमारिसुत भिजविजे तें सुत जवळी असल्यां दगड
न लागे सत्य सत्य ॥ ३५ ॥

(१८) घर रक्षेन मंत्र

आडबांधो थड बांधो बांधो तुंवा ताई ॥
चौऱ्हासी लाख जिव जंत बांधोः जति गोरखकी दाही : ॥
खडे सात सात वेळा मंत्रून २१ घराभोवते टाकावे फीरोन
वस्त न नेतः सुखी नीजावे : ॥ १८ ॥

(प्रवासास जावयाचे म्हणजे पुढील मार्गात मार्गरक्षणमंत्राने रक्षण होईल; परंतु मागल्या घराची व्यवस्था काय? सबब 'घररक्षणमंत्र')

(२६) कवळास वोखद

हा अघा योठांजाअ वोंतून
ज्ञानवल्लीप्रमाणें छ्याणुन
त्यांत साकर मेळवून

मग पीत जावें ऐसें रोज ७
कवल दूर होये ॥ पथ्य कीजे
रोज १४

औषधें सामान्य रोजच्या खाण्यापैकीच असतात. त्यांचा उल्लेख लौकिक लिपीने केला असतां तीं अतिपरिचयास्तव अवहेलनेस पात्र होतात, सबब वरील औषधांच्या यादीची पहिली ओळ सांकेतिक लिपींत लिहिली आहे. ती जरूर असेल त्याने उकलावी.

(वगैरे १३ तोडगे, ९ मंत्र व वीसएक औषधें देऊन राजवाडे म्हणतात-) तोडगे, मंत्र, प्रयोग व औषधी मिळून चाळीस बाबी वरती दिल्या आहेत. त्यांची आता मिमांसा करूं. **गृहरक्षण करण्यास पोलीस समर्थ नसला म्हणजे गृहसरक्षणमंत्र लागतो.** राजपुरुष राजमार्ग सुरक्षित ठेवीत नसले, म्हणजे मार्गरक्षणमंत्र करणें ओघांस येतें. **वैद्यशास्त्र सशास्त्र नसलें, म्हणजे साप, विंचू, यांचे दंश मंत्राने उतरून घेण्याची बुद्धि होते.** पोटभर अन्न मिळाले नाही, म्हणजे क्षुधापनोदनाचे खोटे तोडगे सुचतात. विद्वत्तेच्या अभावी मंत्राने वादिपराजय करण्याची दुर्बुद्धि उपजते. तात्पर्य, वाईट राजा, वाईट वैद्यक, वाईट पोलीस, वाईट कृषिज्ञान, वाईट अन्न देशांत असलें, म्हणजे असले क्षुद्र व भ्रांत तोडगे करण्याकडे प्रवृत्ति होते. **असली प्रवृत्ति आपल्या ह्या देशांत फार प्राचीन काळापासून म्हणजे अथर्ववेदाच्या काळापासून आहे. त्यावरून लोकस्थितीचा अंदाज अंशतः करतां येण्यासारखा आहे. स्त्रीवशीकरण अक्षता फेंकून करणाऱ्या द्रविडाचें वर्णन बाणाने केलेलें पुष्कळांना आठवत असेल. तसलेच तोडगे वर दिलेले आढळतील.**

वेडगळ धर्म कल्पनांनी देश भिकेस लागला

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दिल्ली, दिनांक २३ जून १९५६ रोजी दिलेले भाषण)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर - (१८९१-१९५६)

भीमराव रामजी आंबेडकर. आयुष्यभर ज्ञानसाधना करणारा थोर महामानव. कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. ज्ञानाशाखांतील त्यांचा अधिकार मोठा होता. दारिद्र्य, उपेक्षा, अज्ञान यांच्या गर्तेत पिचलेल्या दलितबांधवांना आत्मज्ञानाचा प्रकाश देऊन त्यांच्या उन्नतीसाठी जीवन समर्पित करणारा युगपुरुष.

व्हाईसरॉय कौन्सिलमध्ये मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री आणि भारतीय घटनेचे शिल्पकार.

जनता, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत इ. नियतकालिकांचे संस्थापक. कास्ट्स इन इंडिया, हु वेअर द शूद्राज, थॉटस् ऑन पाकिस्तान, बुद्ध ॲन्ड हिज धम्म या विद्वन्मान्य ग्रंथांचे लेखक.

"प्रत्येकाला धर्माची परीक्षा करून त्याची तपासणी करता आली पाहिजे. बाजारात सराफाच्या दुकानी आपण सोन्याचा दागिना खरेदीसाठी जातो, तेव्हा तुम्ही काय करता? तुम्ही हे पाहता की, हे सोने खरे आहे की खोटे? हे समजून घेण्यासाठी कसोटीवर त्या दागिन्याला कस लावून पाहण्यात येतो. तसेच धर्माला 'कस' लावून त्याची परीक्षा पाहिली पाहिजे. धर्मतत्त्वांची छाननी करून, सिद्धांत आणि आचार पडताळून आपण पाहू या की, कोणता धर्म माणसाला सुख-समाधान देऊ शकेल?

हेमाडपंती अक्कल

"या दृष्टीकोनातून पाहिल्यास मानव समाजाच्या अस्तित्वाला ब्राह्मणी धर्म नुसता विघातकच नाही तर भयंकर विषारी आहे. महाराष्ट्रात देवगिरीच्या रामाराव यादवाचा पंतप्रधान हेमाडपंत नामक ब्राह्मण होता. त्याने आचारविधी कर्मकांडांचे सातशे प्रकार आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहेत. एका वर्षात दिवस ३६० च असतात. मग हे सातशे विधी कशासाठी? हेमाडपंत ब्राह्मण असल्यामुळे त्याने हे सातशे 'आचार' लिहून ठेवून ब्राह्मणांच्या पोट भरण्याची परस्पर सोय करून ठेवली आहे.

फसवेगिरीचा प्रकार

"दुसरा तसाच प्रकार सत्यनारायण कथेचा. ही 'सत्यनारायणाची कथा' दुसरे तिसरे काही नसून ब्राह्मणांच्या शिधाभोजनाची सोय करून ठेवण्यासाठी कोणा ब्राह्मणाच्या सुपीक मेंदुतून निघालेला शोध आहे. 'सत्यनारायण पूजेचा समारंभ' पाहिला तर तुम्हाला आढळून येईल की, सत्यनारायणाला अर्पण करण्यासाठी जी मेवामिठाई आणि फळफळावळे असतात ती फक्त ब्राह्मणाच्याच खाण्याच्या उपयोगी असतात. एकाद्या जातीबरोबर पंगतीत आपण जेवावे की नाही, हे ठरविण्याचा अधिकार ब्राह्मणाचा.

ब्राह्मण जेवत नाही, बांधून नेतो

"आपल्यापेक्षा नीच समजून ब्राह्मणाचे त्या जातीने तयार केलेले भोजन जेवावयास नकार दिला तर ब्राह्मणाला त्याबदली अंदाजे वीस रुपये आणि काही फळफळावळे प्राप्त करून घेता येतात. तो ब्राह्मण ते जेवणाच्या बदली मागतोच. शूद्राने तयार केलेले जेवण त्याला चालत नाही. परंतु त्याच्याऐवजी स्वतःच्या घरी शिजवता येईल अशी सर्व शिधासामुग्री ब्राह्मण शूद्राच्या घरून गोळा करून घेऊन जातो. शूद्राने कितीही पवित्र सोवळ्याने त्याच शिधा-सामुग्रीचा उपयोग करून जेवण तयार केले तर ते चालत नाही. कारण अशी शिधासामुग्री त्याच्या पाच-दहा दिवसांची सोय करून देण्याइतपत असते.

नारायण कोण?

"जर 'नारायण' स्वतःच खरा असेल तर 'सत्य' हा शब्द आणखी का जोडण्यात आला आहे? याचा हा 'नारायण' नाहीच. ब्राह्मण पंडितांसारखाच तो पिळवणूक करणारांचा रक्षणकर्ता आहे एवढेच." हे सर्व फोल आचारविधी आहेत.

गंगेचे ब्राह्मण दलाल

"काही लोक गंगेवर स्नानासाठी जातात. गंगेच्या किनाऱ्यावर ब्राह्मण बसलेले असतात. स्नानासाठी जाणाऱ्या प्रत्येक माणसाकडून दक्षिणा (पैसा) उकळण्यासाठी ब्राह्मण तयार असतो. गंगा ही नदी अविरत वहात आहे, गंगा काही स्नानासाठी पैसे मागत नाही, किंवा कोणाला घ्यायला सांगत नाही. ब्राह्मणाला एक आणा देऊन ब्राह्मणाने काही मंत्र पुटपुटावे आणि नंतर गंगा स्नानासाठी परवानगी द्यावी, याची काही आवश्यकता आहे काय? भोळ्या लोकांची समजूत अशी की, अशा रीतीने ब्राह्मणाला दक्षिणा देऊन गंगा नदीत

स्नान केल्यास सर्व पापे धुवून जातात. काय मूर्ख आहेत ते सारे? गंगा नदी आणि लोक यांच्यामध्ये ब्राह्मण हा दलाल मानण्यात येतो, हे मोठेच आश्चर्य आहे.

पापक्षालनाची वेडगळ समजूत

"जर पाप गंगास्नानाने व ब्राह्मणांना दक्षिणा वगैरे दिल्याने धुवून जात असेल, नाहीसे होत असेल तर माणूस माणसाविषयी मुळीच सहानुभूती बाळगणार नाही. परस्परांवर प्रेम करणार नाही. अशा अवस्थेत कायद्याची आवश्यकता उरत नाही आणि सरकारचेही महत्त्व शिल्लक राहात नाही." परंतु हे स्वीकारण्यास कोणीही तयार नाही.

खुळचट श्रद्धा

"मी मंत्री असताना एकदा हरद्वार येथे गेलो होतो. मंत्री असल्यामुळे मला तेथे चारी बाजूंना पाणी असलेले एक लहान मंदीर दाखवण्यात आले. त्याला 'हर की पायरी' म्हणतात. तेथील पाण्यात माणसांची हाडे आणि इतर सर्व घाणेरड्या वस्तू जमा झाल्या होत्या. एकादे गटार त्यापेक्षा बरे असे वाटत होते. अशा त्या 'हर की पायरी'च्या घाण पाण्यात प्रत्येक स्त्री-पुरुष आंघोळ करीत होते. त्या पाण्यामध्ये मृताच्या अस्थि टाकल्यावर ब्राह्मणांच्या मध्यस्थीने त्यांचे आप्त नातलग स्वर्गाला जातील आणि तेथे स्नान केल्यावर हे सगेसोयरे पवित्र होतील, ही खुळचट श्रद्धा का असावी?" हे मला कळत नाही. मला वाटते, या सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे.

कसोटी लावा

सोने कसोटीवर खरे उतरल्याशिवाय विकत घेत नाहीत, तसेच धर्म देखील मानवाला उपयोगी आहे किंवा नाही या कसोटीवर घासून पारखून पाहिला पाहिजे, जोपर्यंत धर्माची अशी परीक्षा होत नाही तोपर्यंत तो स्वीकारणीय ठरणार नाही.

पूर्ण विचारानंतर धर्म स्वीकारा

"आमचे जुने लोक अशिक्षित असल्यामुळे ब्राह्मणांच्या प्रत्येक शब्दावर त्यांनी मोकळेपणाने विश्वास ठेवला, आता काळ बदलला आहे, तुम्ही संपूर्ण विचारांती धर्माचा स्वीकार केला पाहिजे."

(प्रबुद्ध भारत : २१.७.५६)

अंत्येष्ठी व श्राद्ध

हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण

हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण-

सत्यशोधक चळवळीतील एक धडाडीचे नेते. पुरोगामी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते. हरिभाऊंनी १९२९ साली 'अंत्येष्ठी व श्राद्ध' ही पुस्तिका प्रसिद्ध केली.

मेल्यावर केले जाणारे अंत्येष्ठी व श्राद्ध हे प्रकार कसे निंद्य व अज्ञानमूलक आहेत हे लेखकाने स्पष्ट केले आहे. या पुस्तिकेवर त्यावेळी खूप टीका झाली. त्यातील विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

मेलेल्या पितरांचे उद्देशाने **पक्वान्ने अमान्य** (न शिजवलेले अन्न) **हिरण्य**, वगैरे विधी करून दान करणे ते श्राद्ध होय. त्यांत **ब्राह्मणभोजन, होम, पिंडदान** ही तीन मिळून जे विशेष कर्म ते तर्पण होय-**धर्मसिंधू.**

श्रद्धेने, मृतपितरांची सेवा करावयाची ते श्राद्ध, त्यांना तृप्त करणे ते तर्पण. अशा श्राद्धासंबंधी व तर्पणासंबंधी शास्त्रीय व्याख्या आहेत. पण आमचे मते आईबाप जिवंत असतांना त्यांची श्रद्धापूर्वक सेवाचाकरी करणे हे खरेखुरे श्राद्ध होय. आणि ते जिवंत असताना जी जी इच्छा करतील ती ती आनंदाने पुरविणे हेच खरे तर्पण होय. कारण मृत पितरांची सेवा करता येत नाही व त्यांची इच्छाही तृप्त करता येत नाही हे अगदी उघड आहे. आईबाप जिवंत असताना, त्यांना असह्य दुःख द्यावयाचे, त्यांना लाथा मारावयाच्या आणि भुकेप्यासे घरांतून हांकलून द्यावयाचे आणि ते मरतांच आपणाला पितृ भक्तीचा मोठा उमाळा आला आहे असे दाखविण्याकरितां पिठाच्या पिंडाची आणि लाडूपोळ्याची गर्दी उडवून मूर्ख ठोंबे, उनाडटपू आशा **बाळंभट, बद्दंभट**, यांना आकंठ जेवावयास घालायचे आणि **ताट, वाटी, तांब्या, घोंगडी, काठी, जोडे, खेटरे** ही त्यांना दाने अर्पण करावयाची; अशा रीतीने ज्यांचा आपण अत्यंत छळ केला आहे अशा पितरांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करावयाचा हे कसले श्राद्ध? "जित्या न मिळे रोटी आणि मेल्यावर साखर वाटी," म्हणतात ते यालाच.

पूर्वीचे ब्राह्मण, मासांची पक्वान्ने करून त्याने श्राद्ध करावे म्हणजे स्वर्गातील पितर फारच तृप्त होतात असे सांगत, तसेच कोणत्या प्रकारच्या मांसाने श्राद्ध केले असता स्वर्गस्त पितर किती काळापर्यंत स्वर्गात तृप्त होतात याचाही बिनचूक (त्यांचे मते) शोध लावला होता. त्या शोधाचा मासला खाली दिल्याप्रमाणे आहेः-

मांसाने श्राद्ध - माशाने श्राद्ध केले असतां पितर स्वर्गात २ महिने तृप्त होतात,

हरणाचे मांसाने ३ महिने.
मेंढ्याचे मांसाने ४ महिने.
पक्षाचे मांसाने ५ महिने.
बोकडाचे मांसाने ६ महिने.
मगाचे मांसाने ७ महिने.
रेड्याचे मांसाने ८ महिने.
रू रू (रोहीच्या) मांसाने ९ महिने.
ग़ानडुकराचे मांसाने १० महिने.
ससा व कासव यांच्या मांसाने ११ महिने.
वाघ व सिंह यांच्या मांसाने १२ वर्षे.

महाशल्क **मासा, गेंडा, तांबडा बोकड, व गाय** यांच्या मांसाने श्राद्ध केले असतां पितर स्वर्गात निरंतर तृप्त होतात.

(मत्स्य पुराण अ० १७ व विष्णु पुराण)

वरील प्रकारच्या निरनिराळ्या मांसांची चव हिंदुस्थानातील मराठे, रजपूत प्रभुती मांस खाणाऱ्या लोकांना बहुधा माहीत नसेलच पण ज्यांना निरनिराळ्या मांसांचा अतिशय शोक, अशा युरोपियन व मुसलमान लोकांना तरी ती माहीत आहे की, नाही याची मोठीच शंका आहे. तथापि अशा निरनिराळ्या प्रकारच्या मांसांचा फन्ना उडविण्यात आणि त्यांनी जिभल्या चाटीत वर्णन करण्यांत आमच्या **आजकालच्या सोवळ्या ब्राह्मणभाईंचे पितर मात्र मोठेच वसताद होते, यांत शंका नाही.** अलिकडे ब्राह्मण लोकांनी गोवध बंद करण्याची जी चळवळ सुरू केली आहे ती पाहून त्यांच्या स्वर्गस्थ गोमांसप्रीय पितरांना अगदी भडभडून येत असले पाहिजे. पण त्याच गोमांसावर आपले वंशज इराणी

लोकांच्या हॉटेलांत गोमांसावर ताव मारतांना पाहून त्यांना त्यांच्या चातुर्याबद्दल तितकेच कौतुकही वाटत असले पाहिजे हे खास. सांप्रतकाळी जी अन्नसत्रवजा श्राद्धे चालू आहेत, त्या पासून पितरांना किंवा ते घालणाऱ्यास यत्किंचितही फायदा नाही हे खरे, तथापि ज्यांना श्राद्ध घालण्याचा मोह अगदींच आवरत नाही, त्यांनी श्राद्धास योग्य असलेला ब्राह्मण अगोदर शोधून काढण्याची तसदी घ्यावी आणि असा ब्राह्मण सापडलांच तर श्राद्धाची उठाठेव करीत बसावे हे त्यांच्या हिताचे आहे. कोणत्या ब्राह्मणाला बोलवूं नये या विषयीं पुराणांत पुढील प्रमाणे सांगितले आहेः-

अधिकार कोणाचा -

पगार (स्कॉलरशीप) घेऊन अध्ययन करणारा, घरे जाळणारा, वैद्यकी (डॉक्टर) करणारा, दक्षणा (मजूरी) घेऊन देवपूजा करणारा, ब्रह्मचारी, जुगारी पुष्कळ लोकांकडे होमहवन करणारा, खोटी साक्ष देणारा, सुतार काम करणारा, व्यसनी, काळा, चाहाडखोर, दांभिक, शिक्षक, जोशी, उपाध्याय, तेल, तूप, मध, मीठ विकणारा, द्रवीड चित्तपावन अशांचे हातून श्राद्ध केल्यास फलदायक होणार नाही. (मनु० अ० ३-१६७ व मत्स्य० अ० १६७) **वरील प्रकारच्या ब्राह्मणांत ज्यांचा समावेश होत नाही असे ब्राह्मण हल्ली कुठे आहेत काय?** मुळीच नाहीत. तेव्हा **ज्यांना श्राद्ध करण्याचे वेड लागले आहे, त्यांना श्राद्ध योग्य अशा ब्राह्मणाच्या अभावी करता येत नाही हे स्पष्टच आहे.**

स्वर्ग आहे कुठे ?

श्राद्ध करून ब्राह्मणांना तृप्त केले असता, स्वर्गात पितर तृप्त होतात असे श्राद्धाचे कारण सांगण्यात येते. पण हे कारण साफ लबाडीचे आहे. स्वर्ग मुळी आहे कुठे? ज्या प्रमाणे परीस, कल्पतरू इत्यादी पदार्थ **कविकल्पीत आहेत, त्याचप्रमाणे स्वर्ग कविकल्पीत आहे.** पण स्वर्ग हा एक लोक आहे अशी कल्पना केली तर तो कुठे आहे, **त्याला रस्ता कोणता, वगैरे गोष्टी ठाऊक नसताना व जरी** त्या ठाऊक असल्या तरी घरच्याघरी बसून **मृताच्या गोत्रजांनी ब्राह्मणास दिलेले अन्न स्वर्गातील मृतात्म्यास कसे पोहोचावे?** कारण ब्राह्मण तर मृताच्या गोत्रजांनी दिलेले अन्न घशाखाली घालून ढेकरा देत आपले घरी उताणा पडलेला असतो. मग ब्राह्मणास दिलेले अन्न

मृतात्म्यास कसे पोचावे? की, ब्राह्मणांपाशी तशीच कांही अद्‌भूत शक्ती असते? पण तसेही कांही दिसत नाही, कारण ब्राह्मणाच्या अंगी अशी कांही शक्ती असती तर सरकार पोष्टाच्या व तारायंत्राचा पसारा मांडण्याच्या फंदात पडले नसते. त्यांनी हे सर्व काम ब्राह्मणाभाईच्या मंत्राद्वारे करून घेतल्याशिवाय राहिले नसते. पण पहावे तो ब्राह्मणेतरांना पोष्टाची व तारायंत्राची जितकी जरूरी असते तितकीच किंबहुना तिच्यापेक्षाही अधिक जरूर ब्राह्मणांना लागते. त्याचप्रमाणे **एखाद्या ब्राह्मणास दुसऱ्या मजल्यावर बसला असताना खालच्या मजल्यावर त्याच्या करितां तयार असलेले अन्न त्याच्या पुत्राला वरच्या मजल्यावर मंत्राच्या योगाने बापाकडे पोचविता येत नाही,** मग तेच ब्राह्मण एखाद्या भाविकाच्या घरी पक्वान्नावर येथेच्छ ढेकर फुटेतो ताव मारून ते पक्वान्न इच्छित मृतात्म्यास स्वर्गात कसे पोचते करणार!

पुनर्जन्म

या बाबतीत विचार करू लागले असता दुसरा एक गमतीचा प्रश्न उद्‌भवतो तो असा की, हिंदुधर्मात पुनर्जन्म आहे असे ब्राह्मण सांगतात, हे म्हणणे वादाकरितां खरे धरल्यास मनुष्य मेल्यानंतर त्याच्या आत्म्याने **दुसऱ्या देहांत प्रवेश केला असला पाहिजे. म्हणजे मृताचा आत्मा स्वर्गात नसतोच हे उघड आहे.** असे असताना ब्राह्मण स्वर्गातील मृतात्म्यास आम्ही श्राद्धाचे अन्न पोचते करावे असे म्हणतात याचा अर्थ काय? सारांश श्राद्ध, पक्ष, महालय वगैरे भानगडीत यत्किंचितही तथ्य नाही. **हे सर्व अवडंबर ब्राह्मणांनी केवळ आपल्या स्वार्था-करितां माजविले आहे.**

क्रीयाकर्म

मनुष्य मरण पावला म्हणजे जे विधी करतात त्या सर्व विधीस (क्रीयाकर्मास) मिळून **अंत्येष्टी असे म्हणतात.** वैदिक कालांतील प्रेतकर्म फार सोपे होते. कारण त्यावेळी गरूड (गारूड) पुराण जन्मास आले नव्हते. वैदिक काळी मनुष्य मृत झाला म्हणजे त्याच्या (प्रेतास) मनगटास दोरीचा एक शेवट बांधून दुसरा शेवट गाईचे गळ्यास बांधीत असत. मग ते सर्व लटांबर स्मशानांत घेऊन जात. तेथे गेल्यानंतर त्या गाईस कापून तिचे मांस प्रेताच्या निरनिराळ्या अवयवांवर ठेवून त्यास अग्नी देत. अशा गाईस "अनुस्तरणी" असे म्हणत. गाय मारण्याचा हेतू हा की, **मृतास स्वर्गात जातांना काही त्रास**

लोकांच्या हॉटेलांत गोमांसावर ताव मारतांना पाहून त्यांना त्यांच्या चातुर्याबद्दल तितकेच कौतुकही वाटत असले पाहिजे हे खास. सांप्रतकाळी जी अन्नसत्रवजा श्राद्धे चालू आहेत, त्या पासून पितरांना किंवा ते घालणाऱ्यास यत्किंचितही फायदा नाही हे खरे, तथापि ज्यांना श्राद्ध घालण्याचा मोह अगदींच आवरत नाही, त्यांनी श्राद्धास योग्य असलेला ब्राह्मण अगोदर शोधून काढण्याची तसदी घ्यावी आणि असा ब्राह्मण सापडलांच तर श्राद्धाची उठाठेव करीत बसावे हे त्यांच्या हिताचे आहे. कोणत्या ब्राह्मणाला बोलवूं नये या विषयीं पुराणांत पुढील प्रमाणे सांगितले आहेः-

अधिकार कोणाचा -

पगार (स्कॉलरशीप) घेऊन अध्ययन करणारा, घरे जाळणारा, वैद्यकी (डॉक्टर) करणारा, दक्षणा (मजूरी) घेऊन देवपूजा करणारा, ब्रह्मचारी, जुगारी पुष्कळ लोकांकडे होमहवन करणारा, खोटी साक्ष देणारा, सुतार काम करणारा, व्यसनी, काळा, चाहाडखोर, दांभिक, शिक्षक, जोशी, उपाध्याय, तेल, तूप, मध, मीठ विकणारा, द्रवीड चित्तपावन अशांचे हातून श्राद्ध केल्यास फलदायक होणार नाही. (मनु० अ० ३-१६७ व मत्स्य० अ० १६७) **वरील प्रकारच्या ब्राह्मणांत ज्यांचा समावेश होत नाही असे ब्राह्मण हल्ली कुठे आहेत काय?** मुळीच नाहीत. तेव्हा **ज्यांना श्राद्ध करण्याचे वेड लागले आहे, त्यांना श्राद्ध योग्य अशा ब्राह्मणाच्या अभावी करता येत नाही हे स्पष्टच आहे.**

स्वर्ग आहे कुठे ?

श्राद्ध करून ब्राह्मणांना तृप्त केले असता, स्वर्गात पितर तृप्त होतात असे श्राद्धाचे कारण सांगण्यात येते. पण हे कारण साफ लबाडीचे आहे. स्वर्ग मुळी आहे कुठे? ज्या प्रमाणे परीस, कल्पतरू इत्यादी पदार्थ **कविकल्पीत आहेत, त्याचप्रमाणे स्वर्ग कविकल्पीत आहे.** पण स्वर्ग हा एक लोक आहे अशी कल्पना केली तर तो कुठे आहे, **त्याला रस्ता कोणता, वगैरे गोष्टी ठाऊक नसताना व जरी** त्या ठाऊक असल्या तरी घरच्याघरी बसून **मृताच्या गोत्रजांनी ब्राह्मणास दिलेले अन्न स्वर्गातील मृतात्म्यास कसे पोहोचावे?** कारण ब्राह्मण तर मृताच्या गोत्रजांनी दिलेले अन्न घशाखाली घालून ढेकरा देत आपले घरी उताणा पडलेला असतो. मग ब्राह्मणास दिलेले अन्न

मृतात्म्यास कसे पोचावे? की, ब्राह्मणांपाशी तशीच कांही अद्‌भूत शक्ती असते? पण तसेही कांही दिसत नाही, कारण ब्राह्मणाच्या अंगी अशी कांही शक्ती असती तर सरकार पोष्टाच्या व तारायंत्राचा पसारा मांडण्याच्या फंदात पडले नसते. त्यांनी हे सर्व काम ब्राह्मणाभाईच्या मंत्राद्वारे करून घेतल्याशिवाय राहिले नसते. पण पहावे तो ब्राह्मणेतरांना पोष्टाची व तारायंत्राची जितकी जरूरी असते तितकीच किंबहुना तिच्यापेक्षाही अधिक जरूर ब्राह्मणांना लागते. त्याचप्रमाणे **एखाद्या ब्राह्मणास दुसऱ्या मजल्यावर बसला असताना खालच्या मजल्यावर त्याच्या करितां तयार असलेले अन्न त्याच्या पुत्राला वरच्या मजल्यावर मंत्राच्या योगाने बापाकडे पोचविता येत नाही,** मग तेच ब्राह्मण एखाद्या भाविकाच्या घरी पक्वान्नावर येथेच्छ ढेकर फुटेतो ताव मारून ते पक्वान्न इच्छित मृतात्म्यास स्वर्गात कसे पोचते करणार!

पुनर्जन्म

या बाबतीत विचार करू लागले असता दुसरा एक गमतीचा प्रश्न उद्‌भवतो तो असा की, हिंदुधर्मात पुनर्जन्म आहे असे ब्राह्मण सांगतात, हे म्हणणे वादाकरितां खरे धरल्यास मनुष्य मेल्यानंतर त्याच्या आत्म्याने **दुसऱ्या देहांत प्रवेश केला असला पाहिजे. म्हणजे मृताचा आत्मा स्वर्गात नसतोच हे उघड आहे.** असे असताना ब्राह्मण स्वर्गातील मृतात्म्यास आम्ही श्राद्धाचे अन्न पोचते करावे असे म्हणतात याचा अर्थ काय? सारांश श्राद्ध, पक्ष, महालय वगैरे भानगडीत यत्किंचितही तथ्य नाही. **हे सर्व अवडंबर ब्राह्मणांनी केवळ आपल्या स्वार्था-करितां माजविले आहे.**


क्रीयाकर्म

मनुष्य मरण पावला म्हणजे जे विधी करतात त्या सर्व विधीस (क्रीयाकर्मास) मिळून **अंत्येष्टी असे म्हणतात.** वैदिक कालांतील प्रेतकर्म फार सोपे होते. कारण त्यावेळी गरूड (गारूड) पुराण जन्मास आले नव्हते. वैदिक काळी मनुष्य मृत झाला म्हणजे त्याच्या (प्रेतास) मनगटास दोरीचा एक शेवट बांधून दुसरा शेवट गाईचे गळ्यास बांधीत असत. मग ते सर्व लटांबर स्मशानांत घेऊन जात. तेथे गेल्यानंतर त्या गाईस कापून तिचे मांस प्रेताच्या निरनिराळ्या अवयवांवर ठेवून त्यास अग्नी देत. अशा गाईस "अनुस्तरणी" असे म्हणत. गाय मारण्याचा हेतू हा की, मृतास स्वर्गात जातांना काही त्रास

होऊ नये व त्यास तेथे दूध दुभते मिळावे कारण मारलेली गाय मृत मनुष्याबरोबर स्वर्गात जाते अशी त्यावेळची समजूत होती. प्रेताबरोबर गाईचे मांस जाळण्याचे दुसरे एका कारण असावे ते हे की, मृत मनुष्यास स्वर्गात जाताना वाटेत हे मांस त्याला फराळ करण्यास उपयोगी पडावे. (ब्राह्मण लोक सांगतात की, मृत मनुष्य तेरा महिन्यांनी स्वर्गात जाऊन पोचतो. त्याला टप्प्याटप्प्यावर अन्न मिळावे म्हणून यजमानांकडून दरमहिना मासिक श्राद्ध करून शिदा, दानदक्षिणा उपटतात त्याचेच दर्शक हे गाईचे मांस फराळा करिता असावे असे वाटते. गाईचेच मांस जाळण्याचे कारण ते फार दिवस सडत नाही हे असावे. असा अमंगळ व हिंसामय प्रकार पाहून त्यावेळच्या गोमांस भक्षक ब्राह्मणास बौद्ध व जैन यांनी चांगलीच थप्पड दिल्यामुळे बंद पडला. तथापि, ब्राह्महणानी मांसाच्या ऐवजी मृत मनुष्यावद्दल ब्राह्मणांस ती गाय दान दावी असा संप्रदाय पाडला. हे दान मागते वेळी ब्राह्मण मृतांच्या गोत्रजांस असे सांगतात की, मृतात्म्यास वैतरणी नदीतून पलिकडे जाता येणार नाही, या करितां ब्राह्मणास गोप्रदान (गायदान) द्या, म्हणजे तो प्राणी तिचे शेपटावर बसून पूरक्तयुक्त वैतरणीतून पलिकडे सुखरूप जाईल. (परंतु यमदूत पलिकडे कसे जातात हे काही लिहीत नाहीत.) अर्थात ही सर्व ब्राह्मणेतर लोकांस लुबाडण्याची ब्राह्मणांची युक्ती आहे. नाहीतर कोठली वैतरणी आणि कोठला स्वर्ग.

अंत्येष्टी करण्याचे कारण मृतमनुष्यास स्वर्गात कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये हे आहे, असे ब्राह्मण लोक सांगतात व ती करणयास सुचवितात. यावर अशी शंका येते की, मृत मनुष्यांनी आपल्या आयुष्यांत ज्या तीर्थयात्रा, उपासतापास केलेले असतात, जी ब्राह्मणभोजने घातलेली असतात आणि ब्राह्मणांना जी दानदक्षणा दिलेली असते त्या पुण्याचा काहीच उपयोग होत नसेल तर त्या गोष्टी कशाला करावयाच्या, आणि उपयोग होत असेल तर अंत्यष्ठी तरी कशाला करावयाची? कारण या लोकी केलेल्या पुण्याच्या योगाने तो स्वर्गात सर्‍जी जाईल. मग ही भटजीची उपाधी पाठिमागे हवी कशाला, बाकी वरील कारणे आणि अंत्यष्ठी या दोन्हीही गोष्टीत खरेपणा नाही. पण ब्राह्मणांची विचारसरणी कशी परस्पर विरूद्ध आहे हेच आम्हाला दाखवायचे होते. अंत्यष्ठीच्या व श्राद्धाच्या योगाने मृताच्या गोत्रजाचे व देशाचे एकंदरीत फारच नुकसान होत आहे. उत्तर हिंदुस्थानात श्राद्धाकरीता ५०० रुपये खर्च

येतो. हे फुकटखाऊ भटभिक्षुक लोक मृताच्या मागील माणसास नडवून व थापा देऊन त्यांच्यापासून पैसे उपटून नेतात, व अशारितीने त्यांना कर्जात खितपावयास लावतात. वरील क्रियाकर्मांमुळे आळशी, ठोंबे, पढतमूर्ख, दांभिक शास्त्रिपंडीत, ढोंगी गोसावी, यांची चैन चालून देशांत निरूद्योगीपणा व भिकाऱ्यांची संख्या वाढते. हल्ली मजुरीचे दर पुष्कळ वाढले आहेत व मजूर मिळत नाहीत, याचे कारण असली ही दाने हेच होय. या दानामुळे **उनाड लोकांना मोलमजूरी करण्यापेक्षा भिक्षा मागणे सुखाचे वाटते.** आणि असले पुष्कळ ऐतखाऊ झाले म्हणजे देशाला दारिद्र्य येते. समंजस लोकांनी अंत्येष्ठी म्हणजे प्रेतास व्यवस्थेने मुठमाती देणे व श्राद्ध म्हणजे मृतांची श्रद्धापूर्वक आठवण करून त्याने आपले आयुष्यांत ज्या चांगल्या गोष्टी केल्या असतील, ते चांगले गुण आंगी आणणे व त्यांच्या नावाला शोभेल अशा रीतीने वागणे हेच आपले कर्तव्य होय, असे समजून या निरुपयोगी क्रियांचे खटाटोपात पडून आपले नुकसान करून घेऊं नये व असल्या निरुपयोगीपणांत होणारा खर्च तो आपले मुलाबाळांचे विद्यादानाकडे खर्च करून त्यांना विद्वान करून मनुष्य कोटीत आणा हीच माझी आपणा जवळ विनंती आहे.



व्रतवैकल्ये

वि. दा. सावरकर

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर (१८८३-१९६६) थोर क्रांतिकारक देशभक्त, प्रभावी वक्ते, प्रतिभाशाली लेखक, आणि राष्ट्रीय कवी. मराठी भाषा व लिपिशुद्धी चळवळीचे प्रवर्तक. सशस्त्र क्रांतिचे पुरस्कर्ते. मुंबई येथील (१९३८) मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

संन्यस्त खड्ग, उत्तरक्रिया, ही नाटके, कमला, गोमंतक, ही खंडकाव्ये, काळे पाणी, माझी जन्मठेप, शत्रूच्या शिबिरात, ही आत्मकथने, जोसेफ मॅझिनी, १८५७ सालचे स्वातंत्र्यसमर, हे त्यांचे गाजलेले ग्रंथ. खालील उताऱ्यातून व्रतवैकल्यातील कालबाह्यतेचे तर्कशुद्ध विवेचन त्यांनी केले आहे.

विज्ञानाने जी सत्ये प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे निर्विवादपणे सिद्ध केली आहेत, त्यांच्या प्रचारास अडथळा करणारी व्रते साफ सोडून दिली पाहिजेत. व्रताने स्वतःचा, स्वतःच्या राष्ट्राचा किंवा एकंदर मनुष्यजातीचा काहीतरी प्रत्यक्ष लाभ होतो की नाही, ही कसोटी प्रत्येक व्रतास लावली पाहिजे.

पूर्वी मोठमोठ्या देवळांचे गाभारे अंधाराने भरलेले असत. घरातही समया, लामणदिवे, पणत्या यांचाच वापर होत असे. म्हणून त्या काळी वाती आवश्यकच असत. देवळात त्या उपयोगी पडत, घरातही लागत. पण हजारो वर्षांपूर्वीचे हातवातींच्या उजेडात चाचपडण्याचे युग आता बदलले आहे. जुन्या प्रख्यात देवालयांच्या गाभाऱ्यातही आता विजेच्या दिव्यांचा भरपूर प्रकाश पडत आहे. खेड्यांतूनही घरोघरी, खोल्याखोल्यांतून विजेच्या दिव्यांचा लखलखाट झाला आहे. तिथेच एक लामणदिवा वा पणती, केवळ पणजोबांच्या वेळेस ती लावत म्हणून, लावून ठेवणे हास्यास्पद नाही काय? मोटारीला बैल लावणे किंवा मशीनगनचा गोळा धनुष्याच्या तातीने फेकणे हे जितके वेडेपणाचे तितकेच विजेच्या झुंबरांनी दिवसासारखा लख्ख प्रकाश पडलेला असताना गाभाऱ्यात समईचा वा लामणदिव्याचा मिणमिण नंदादीप उगीच धुरकटत ठेवणे हेही वेडेपणाचे आहे.

मनुष्यजातीचे अल्पस्वल्प हित साधता येईल अशा रीतीचे हे व्रत आचरावे. वाती करायला लागणाऱ्या वेळात टकळीवर सूत कातावे आणि ते एखाद्या प्रामाणिक, गरीब विकणारास दान द्यावे किंवा ते सूत स्वतः मागावर विणावे आणि ती खादी एखाद्या सच्छील, गरजू कुटुंबास भेट म्हणून द्यावी.

तीच गोष्ट लाख दुर्वांची. तास-तासभर परड्यातून नि खिंडारातून गवताची एकेक काडी खुडत वेळ गमवायचा आणि तो भारा गणपतीच्या डोक्यावर द्यायचा! त्या भाऱ्याखाली गणपतीची मूर्ती गुदमरून जाते. गणपती का गवत खातो? गवताचा भारा वाहायचाच तर तो गाईला तरी वाहावा. ते गवत खाऊन गाय प्रसन्न होईल व दूध देईल.

हिरव्या गवतासंबंधी किंवा वनस्पतीसंबंधी व्रत करायचे, तर विळा घेऊन रानात जावे आणि हिरवेगार गवत कचाकच कापून त्याच्या पेंढ्या गाईस घालाव्या. आपल्या अंगणात स्वतः पाणी घालून फुलवाडी लावावी आणि मालती, सोनचाफा, जाईजुई, गुलाब अशी सुंदर सुंदर फुले प्रत्यही देवास वाहावी. साऱ्या फुलांचा देवावर उगीच ढीग रचू नये. तर देवघरात शोभतील तितकीच तिथे वाहावी आणि बाकीची घरात फुलपात्रांतून कुशलपणे मांडावी किंवा त्यांचे हार करावे. आपण स्वतः पाणी घालून वाढवलेल्या लतावेलींच्या ताज्या, टवटवीत फुलांचे गजरे करावे आणि ते प्रेमाने आपल्या भगिनींना केसांत गुंफण्यासाठी द्यावे. मग त्या जिथे जिथे वावरतील तिथे तिथे सुगंध दरवळत राहील. प्रसन्न वातावरण निर्माण होईल. आरोग्य व आनंद देणाऱ्या अशा सौंदर्याची पूजा हेही एक व्रतच आहे.

वडा-पिंपळांना लाख प्रदक्षिणा घालायच्या, यासारख्या व्रतांनाही हीच कसोटी लावावी. आपल्या उष्ण प्रदेशातील लोकांना वडा-पिंपळांसारखे विशाल विस्ताराचे वृक्ष त्यांच्या शीतल छायेमुळे वत्सल वाटावे, हे स्वाभाविकच आहे. अशा वृक्षांविषयी कृतज्ञता वाटणे हेही साहजिकच आहे; पण त्यासाठी त्या वृक्षांचा देवच करून टाकणे, हे बुद्धिहीनतेचे लक्षण आहे. विशाल नि उपयुक्त वृक्षांची मनुष्याला उपयुक्त होईल अशी लागवड करणे, त्यांची जोपासना करणे हे योग्यच आहे. वडा-पिंपळांसारख्या झाडांखाली वाटसरूंना जशी छाया मिळते, तशाच त्यांच्या जीर्ण झालेल्या प्रचंड फांद्या कोसळून प्रसंगी त्यांचा प्राणही जातो. ती बिचारी झाडे काही जाणूनबुजून असे करत नाहीत. त्यांचा प्रदक्षिणा घातल्या काय किंवा न घातल्या काय, फांद्या पक्क्या आहेत तोपर्यंत

छाया देणे, त्या पोखरल्या की उन्मळून पडणे ही त्यांची भावनाशून्य क्रिया आहे.

चंद्र, सूर्य, शनी, मंगळ हे ज्योतिर्गोल नसून देव आहेत, मनुष्याच्या स्तुतीने ते प्रसन्न होतात आणि निंदेने संतापतात, अशी पूर्वी जगभर समजूत होती. पण आता प्रयोगांनी हे सिद्ध झालेले आहे, की सारे ज्योतिर्गोल हे निर्जीव पदार्थ असून त्यांची गती व स्थिती गणिताच्या कठोर नियमांनी होत असते. त्यांच्या प्रकाशाचे व घर्षणाचे मनुष्यावर होणारे परिणाम हे मनुष्यांच्या स्तुतिनिंदेने, दगडास तेलशेंदूर फासल्याने, शनिवार-मंगळवारी उपाशी राहिल्याने, एखाद्या पोथीच्या पारायणाने लेशमात्रही बदलू शकत नाहीत. त्यांचे परिणाम टाळण्याचा मार्ग पोथ्यातील भाकडकथांप्रमाणे वागणे हा नाही; तर गणित, रसायन, वैद्यक या शास्त्रांचे नियम समजून घेऊन त्यांच्या आधारे उपाय योजणे हा आहे. मनुष्याला हे ज्ञान झाले असूनही पूर्वीचे अज्ञान उराशी बाळगणे आणि जुनीपानी व्रतवैकल्ये करत राहणे ही असत्याचीच पूजा आहे.

वडाची पूजा करण्याने जर देव पावतो, सापाला दूध पाजल्याने जर देव पावतो, तर अनाथ अर्भकास दूध पाजल्याने तो देव काय पावणार नाही? तान्हेल्याला पाणी, तापलेल्याला छाया, अज्ञान्याला ज्ञानदान, मरणाऱ्याला प्राणदान ही पुण्यकृत्ये करणे हे व्रतच नव्हे काय? झाडून सवाऱ्या धर्मांतून ही कृत्ये पुण्यकृत्येच समजलेली आहेत. झाडांत, पशूंत, सापांत, दगडांत, मातीतही जर देव आहे, तर मनुष्यातही तो आहेच आहे. म्हणून मनुष्याची सेवा करण्याच्या व्रताने कोणत्याही व्रतापेक्षा अधिक फल मिळालेच पाहिजे.

अमुक प्रकारची लोकसेवा करा, हा आग्रह नाही. तुम्हांला व्यक्तिशः झेपेल ती लोकसेवा करा; पण लोकांचे हित होईल असेच एखादे व्रत धरा. त्यामुळे राष्ट्रसेवा घडेल आणि मनुष्यजातीचीही सेवा घडेल.

तत्वज्ञांचे दुहेरी धाडस

- श्री. म. माटे

प्रा. श्रीपाद महादेव माटे - (१८८६-१९५७) - संतसाहित्याचे गाढे व्यासंगी, थोर गद्यशैलीकार, अस्पृश्यांमध्ये पदरमोडकरून शिक्षण व जागृतीचे कार्य करणारे तळमळीचे कर्यकर्ते. १९४३ साली सांगलीस भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

उपेक्षितांचे अंतरंग, केसरीप्रबोध, विज्ञानबोध, विवेकमंडन, परशुरामचरित्र, संत पंत आणि तंत, आणि साहित्यधारा हे महत्वाचे ग्रंथ. वाङमयीन समस्या व सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या विषयावर लेखन. त्यांचे लेखन विचाराला चालना देते. खालील उताऱ्यात आपल्या तत्वज्ञांनी दाखविलेल्या धाडसाचे मार्मिक विवेचन केले आहे.

आपल्याला चांगले चांगले लोक सांगतात की, परमेश्वराची भक्ती करावी, त्याला आळवावे, त्याची आर्जवे करावी म्हणजे तो करूणा करतो आणि आपल्याला त्याचे ज्ञानच काय पण दर्शनसुद्धा होते. ही सगळी विचारपरंपरा मला खरोखरच विस्मयकारक वाटते. सर्व विश्वाच्या आरंभस्थानी असलेली जी कोणती शक्ती असेल, तिच्या ठिकाणी मानवतेचा आरोप करणे हे साहस आहे, असे मला वाटते. आकाशात झगझगणारा सूर्य, सौदर्याने भ्रमण करणारा चंद्र, लुकलुकणारे आणि निश्चल तेजाचे ग्रहतारे, अंधाऱ्या रात्री धुक्यासारखी दिसणारी ती आकाशगंगा, उत्तर ध्रुवाकडे तळपणारे ते नानाप्रकारचे रंग, हिमालयासारख्या पर्वताच्या प्रचंड रांगा, धवलगिरीसारखी गगनचुंबित शिखरे, गंगा, सिंधू यांच्यासारख्या विशाल नद्या, तराईच्या वनातील सृष्टीची अद्‌भूत सौदर्ये, समुद्राच्या लाटांचे जल्लोष, आकाशात भणभणणाऱ्या वाऱ्यांची आवर्ते ही सारी ज्या शक्तीने उप्तन्न केली तिनेच मानवही उत्पन्न केला. म्हणजे जेथून ही सारी उत्पन्न झाली तेथूनच मानवही उत्पन्न झालेला आहे. मौज अशी की, बाकीच्या साऱ्या गोष्टी लक्षावधी वर्षे या विश्वात नांदत असताना मानवप्राण्याचा जन्मही झालेला नव्हता; आणि जेव्हा कदाचित मानवप्राणी एखाद्या बर्फाच्या जागतिक लोंढ्यांखाली दडपून जाईल आणि नष्ट होईल तेव्हासुद्धा ज्या वस्तू सध्याच्या इतमामाने शोभत राहतील, त्यांच्यापेक्षा आपण

श्रेष्ठ आहोत आणि आपल्या ठिकाणी जी दिसते तीच त्या मूळ शक्तीच्या ठिकाणी आहे असे माणसाने मानावे ही मोठी नवलाची गोष्ट आहे! असे मानण्यास त्याला काय अखत्यारी आहे ? त्या शक्तीच्या ठिकाणी मानवता कल्पून त्याने तिचे आवाहन केले याचे मूळ कारण असे आहे की, विश्वाचे विशालत्व आणि त्याचा सखोलपणा ही आरंभी त्याच्या ध्यानात भरली नव्हती. ती एक संकुचित वस्तू आहे असेच वाटत असे आणि तिचा कर्ता जवळपास कोठे तरी असेल असे त्याला वाटत असे. अर्थात या वेळी त्या शक्तीचे दूरस्थपण कालदृष्ट्या आणि स्थलदृष्ट्या ध्यानात आल्यानंतर तिच्या ठिकाणी आपण मानवतेची कल्पना करावी आणि दया, करूणा, प्रीती असले प्रतिजबाबी भाव तिच्या ठिकाणी आहेत असे मानून चालावे हे खरोखर विस्मयकारक आहे.

पण माणसाला ही एक खोडच आहे की, ज्या त्या वस्तूचे मानुषीकरण करावे. तसे केले म्हणजे त्याला मोठी लज्जत उत्पन्न होते. बागेत गुलाबाची कळी बघितली तर 'या बागेची ही राणी आहे' असे म्हटल्याने त्याला आनंद होतो. चंद्रमा ही आकाशाची स्वामिनी आहे असे म्हटले म्हणजे रसाला लालचावलेला त्याचा आत्मा खूष होतो. सूर्याला प्रतापी वीर म्हटले म्हणजे त्याला त्याच्या तेजाची खरी कल्पना येते. लता या वृक्षांच्या अंगाला कवटाळीत आहेत असे रूपक केले म्हणजे अरण्याला जिवंतपणा आला असे त्याला वाटते. पण या सगळ्या कामात तो त्या वस्तूचे मानुषीकरण करीत आहे हे मात्र दिसून येते. हीच त्याच्या स्वभावाची लकब त्याने विश्वाच्या आदिस्थानी असलेल्या शक्तीच्या बाबतीतही लागू केली आणि एकदा हे आसन स्थिर झाल्यावर मग आपल्या भावनांचे सर्व भांडार त्याने या मानुष परमेश्वरावर भाबडेपणाने रिते केले. ह्या भांडारातून वाहात असलेल्या निर्झराने देशोदेशीचे वाङमय भरून गेले आहे; लोकांच्या जीवीताला त्याने स्निग्धपणा प्राप्त करून दिला आहे; लोकांच्या जीवितातील रुक्षपणाला त्याने मार्दव आणिले आहे; लोकांची संकटे त्याने कमजोर ठरविली आहेत आणि सर्वांच्या शेवटी म्हणजे त्याला वाटत असलेली महाप्रलयानंतरची भीती त्याने घालविलेली आहे. ही सगळी किमया माणसाच्या एका कृत्रिमाने झाली आहे. ते कृत्रिम म्हणजे, आपल्या ठिकाणची जी मानवता, तिचा अध्यारोप त्याने त्या कुटीरस्थ शक्तीवर एकदा आंरभीच करुन टाकला, हे होय, आता त्या वाटेने परत जाणे भारीच कठीण होऊन बसले आहे ! याला लोक पाखंड म्हणतात किंवा नास्तिकवाद

म्हणतात. पण हे म्हणणे अगदी चूक आहे. हाही यथार्थ ज्ञानाकडे वळण्याचाच एक प्रकार आहे.

पण माणसाची घृष्टता याहीपुढे गेलेली आहे. त्या गूढस्थ तत्वाला आपल्या पंक्तीला आणून बसविण्याचे धाडस त्याने एका अंगाला केले, तर दुसऱ्या अंगाला त्याने याहीपेक्षा एक भंयकर साहस केले ते आदितत्व कुठे आहे, कुठे आहे याचा शोध करता करता आपल्याच ठिकाणी ते आहे असा अद्‌भूत सिद्धांत त्याने सांगून टाकला ! ते तत्व गूढात होते तेव्हा त्याने त्याच्यावर आपल्या स्वरूपाचा अध्यारोप केला आणि पुढे आपले जे पंचभौतिक रूप आहे तेच त्या सूक्ष्म तत्वाचे कुटिर आहे असाहि उरफाटा सिद्धान्त त्याने सांगून टाकला. इतकेच नव्हे तर तत् त्वम्-असि-म्हणजे 'ते तू आहेस' म्हणजे 'तू तेच आहेस' असेही एकाने दुसऱ्याला सांगून टाकले. ब्रह्मस्वरूपाचा शोध करावयास दुसरीकडे जावयास नको. तुझ्या ठिकाणीच ते आहे, 'तुझे आहे तुजपाशी ! परि तू जागा चुकलासीं' असा निर्वाळा एकाने दुसऱ्याला दिला. ही घृष्टता तर विलक्षणच आहे. मायान्वित का होईना पण ब्रह्मरूप आत्मा किंवा आत्मारूप ब्रह्म मानवाच्या या जडदेहात वस्ती करून राहते ही कल्पना विलक्षण धाडसाची आहे !

मला कित्यकदा वाटे की, त्या सनातन तत्वाने आपल्या वस्तीला याहून जास्त चांगली जागा खास काढली असती. माणसाच्या ठिकाणी चंद्राची शांती नाही. सूर्याचे तेज नाही, वायूचे चापल्य नाही, सागराचा अगाधपणा नाही, पर्वताचे स्थैर्य नाही, वेलीचे मार्दव नाही, वृक्षाचा फलभार नाही, भूमीचे धन नाही, मृत्तिकेचा सुंगध नाही, सिंहाची गर्जना नाही, गरुडाची भरारी नाही-याच्यापाशी काही नाही. मानवी देह हा एक ओल्या मातीचा गोळा आहे. हा उन्हाने घाबरा होतो, थंडीने कंप पावतो, पावसाने फदफदू लागतो. असले मृण्मय घर चित्‌कणरूप जो आत्मा तो आपल्या वस्तीला कधीतरी योग्य मानील काय ? जो अग्नीने जळत नाही, शस्त्राने कापला जात नाही आणि पाण्यात बुडत नाही त्या सनातनाने असल्या भिकार धर्मशाळेत वस्तीला रहावे याचे मोठे नवल वाटते. यापेक्षा तो सूर्याच्या बिंबावर राहिला असता, चंद्राच्या पृष्ठभागावरील शांती त्याने सुखाने पत्करली असती, मेघांच्या गर्जनेच्याद्वारा आपले मनोगत व्यक्त केले असते, तो वाऱ्यावर स्वार झाला असता आणि सागराच्या बुडाशी जाऊन त्याने समाधी धारण केली असती-त्याच्या वस्तीला

ही, ठिकाणे खरोखर शोभण्यासारखी होती. पण एखाद्या चोरट्याने दोन बोटांनी दाबले असता ज्याचे मानगूट गळून पडते त्याच्या शरीरात ते मूळचे आदितत्व वस्तीला येऊन राहात असेल ही कल्पना माणसाला भावली तरी कशी ? आणि या असल्या किचकट शरीराचा अधिकारही एवढा की, ते चित्स्वरूप त्याच्या ठिकाणी स्वतंत्रपणेसुद्धा नांदत नाही तर मायेने कैदी होऊन पडते. ही सारी कथा अतयंत विस्मयकारक आहे. ब्रह्मांचे मानुषीकरण आणि माणसाचे ब्रह्मीकरण हे दुहेरी धाडस आहे. हे धारिष्ट याने पहिल्याने केव्हा केले हे माहीत नाही.

हे सारे आत्मे, मानवाची जात जन्मली नव्हती तेव्हा होते तरी कोठे ? ज्या वेळी माणसाची जात नष्ट होईल-आणि ती होणार असे शास्त्रज्ञ सांगतात-त्या वेळी हे सर्व आत्मे जातील तरी कोठे ? पृथ्वीवरची लोकसंख्या वाढली म्हणजे आत्म्यांची संख्या कशी वाढते ? आणि काही उत्पातांनी किंवा व्याधींनी, साथींनी ही संख्या घटत चालली म्हणजे उरलेले निर्वासित आत्मे राहतात तरी कोठे ? माणसांची शरीरे अन्नाने बनतात आणि अन्नानेच तगतात. पृथ्वीवरचे अन्न कमीजास्त झाले की माणसांचीही संख्या कमीजास्त होते. असल्या अन्नावर म्हणजे गवतावर किंवा कडब्यावर बनलेल्या व पोसलेल्या शरीरांत आत्मे येतात तरी केव्हा आणि यांतून त्यांचे प्रयाण तरी केव्हा होते ? वस्त्र जीर्ण झाले म्हणजे ते जसे आपण टाकून देतो तसे आत्मा आपले आवरणरूप शरीर टाकून देतो असे सांगतात. पण आत्मा आहे म्हणून शरीर उत्पन्न होते, का शरीर उत्पन्न झाल्यामुळे त्यात तो आल्यासारखा वाटतोय या विचाराची बाधा चिकित्सक मनाला झाल्याशिवाय राहात नाही; आणि ती एकदा झाली म्हणजे त्याच्या तोंडून, जनदृष्ट्या ज्याला पाखंड म्हणता येईल तेच बाहेर पडेल. परंतु हे पाखंड वगैरे काही नसून ही एक शुद्ध मनाची बालबोध पृच्छा आहे. एकदा मूलतत्वे पत्करल्यानंतर पुढला तत्वज्ञानाचा आणि वाङ्मयाचा विलास बुद्धीला आणि अंतःकरणाला अत्यंत आनंद देतो. पण मूलतत्वे मानावी लागतात. येथेच काय ते खरे दुःख आहे ! ही सारी अनुमाने आहेत असे म्हटले म्हणजे चांगले सुशिक्षित लोक मनापासून रागावतात. त्यांचा राग मी उमगतो. कारण त्याने मनाची शांती ढळते; प्राप्त होणारा तात्विक बुद्धिवादाचा खेळ हातातून निघून जातो. अंतःकरणाची नवरसात्मक भुलावण कोमेजून जाते; आणि केवळ अज्ञानाचे म्हणजे ज्ञान नसल्याचे वैराण जीवीतात पसरते हे दुःख

कोणालाही सोसवत नाही आणि म्हणून या वैराणाच्या सरहद्दीकडेसुद्धा फिरकणे नकोसे वाटते.

पण नवलाची गोष्ट ही आहे की, असले चमत्कारिक प्रश्न खुद्द साधुसंतांनीच विचारलेले आहेत. असल्या शंकांचे सहस्त्र दंश त्यांच्याही मनाला झाले होते. आणि त्यांनी ते आपल्या अभंगात आणि ओव्यात स्वच्छ सांगून ठेवलेले आहेत. संताची नावे ऐवढ्यापुरतीच घेण्यात काय मतलब आहे? या वैराणातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी फार मोठे कष्ट केले आणि शेवटी ते ब्रह्मपद पावले. त्यांनी स्वतः असे सांगितले आहे. यात एक मख्खी आहे. त्यांच्या चित्ताला दुःख होते आणि 'येणे दुःखे माझा फुटो पाहे प्राण' असे आक्रंदन ते करीत होते. हे दुःख जोपर्यंत उत्पन्न झाले नाही तोपर्यंत संताच्या मार्गाने कोणी जाणार नाही. पण यात दुःख तरी कशाचे? क्षणभर असे मानले की, आपल्याला त्या शाश्वत सत्याचे ज्ञान झाले नाही, तरी त्यात खंती मानण्यासारखे काय आहे ? विद्युत किंवा अणुशक्ती यांचे ज्ञान झाले नव्हते तेव्हा माणसांनी कधी दुःख केले होते काय ? आपले पुढे कसे होईल, असा हृद्रोग त्यांना कधी, लागला होता काय ? आइन्स्टीन याने एक नवीनच सिद्धान्त सांगितला आणि तो ऐकून महाबुद्धिमान माणसेसुद्धा एकदम बुचकळ्यात पडली. पण हे नवे ज्ञान झाले नव्हते म्हणून दुःखाने कोणी टाहो फोडीत होते असे मात्र आपण कधी ऐकले नव्हते. अजूनही याच्यापुढे कित्येक गूढस्थ सामर्थ्याचे शोध लागावयाचे आहेत. पण ते आज लागलेले नाहीत म्हणून आपल्या जिवाला कधी कष्ट झाले आहेत काय ? किंबहूना त्या शोधांच्या दिशा आणि त्यांची नावे हीसुद्धा आपल्याला माहीत नाहीत. हे जसे आहे तसेच यासर्व सामर्थ्याच्या बुडाशी, या सर्व शक्तीच्या तळाशी, या सर्व ज्ञानांच्या मूळच्या वीर्यकणांत ज्या सामर्थ्याची वस्ती असेल ते कळले नाही म्हणून आज मानवप्राण्याने कष्ट मानावे असे त्यात काय आहे ? ते ज्ञान उत्तोरोत्तर होत जाईल. जे पुढले पुढले बुद्धिमान संशोधक निघतील ते त्याच्या जवळजवळ जातील व तृप्त होतील.

सृष्टीचा व्यापार चालविणारी गूढ सामर्थ्ये ज्या पिढ्यांनी आजवर ओळखली नव्हती त्यांना ज्याप्रमाणे सकलीही शिक्षा झाली नाही, त्याप्रमाणेच ज्या पिढ्या ते शेवटचे महत्त्व न ओळखतां दिवंगत होत आहेत, त्यांना कसलीही शिक्षा व्हावयाची नाही असे मला वाटते. इतकेच की, त्यांना त्या

तत्त्वाचे ज्ञान झाले नव्हते. याहून जास्त काही नाही. पण आपल्याला चांगले चांगले लोक बजावून सांगत आहेत की, ज्यांना हे अंतिम ज्ञान होणार नाही त्यांना सद्‌गती प्राप्त व्हावयाची नाही. ही खरोखर आम्हां पामरांवर भलतीच आपत्ती लादणे आहे. आम्ही केविलवाणेपणाने सांगत आहो की आमची बुद्धी तोटकी आहे; आम्हांला ते शेवटचे कळण्यासारखे नाही; तर आम्हांला ते बजावतात की तुम्हाला चांगली गती प्राप्त व्हावयाची नाही. हा जुलूम झाला ! अहो मोठामोठाले श्रेष्ठ मुनी, ऋषी अंगावर वारुळे वाढत तोपर्यंत तप करीत बसले तरी त्यांना ब्रह्मज्ञानाचा आरवसुद्धा झाला नाही, तर आम्हा सामान्य बुद्धीच्या माणसांचा पाड तो काय ? प्रत्यक्ष महादेव हा जेथे ब्रह्मज्ञान-प्राप्तीच्या मार्गावरील कापडीच अजूनही आहे तेथे आमची काय कथा ? आणि यासाठी आम्हाला 'सद्‌गती' नाही ? म्हणजे ब्रह्माशी तन्मयता नाही, एकजीवपणा नाही हेच ना ? ब्रह्मापासून दूर असण्याने पारमार्थिक दुःख ते कसले ? आणि यात वाईट गती ती काय ? ते शेवटचे कोडे उलगडावे असे आम्हांलासुद्धा वाटते. श्रेष्ठत्व ज्ञान तेच आहे असे आम्हांलासुद्धा वाटते पण ते प्राप्त करून घेण्याची आमची बौद्धिक लायकी नाही. पण म्हणतात की श्रद्धा असावी.

पण भाव, श्रद्धा यांच्या बळावर गूढ सामर्थ्य कसे कळणार ? त्याचा आणि आमच्या श्रद्धेचा अथवा भावबलाचा संबंध तो कोणता ? विद्युत इत्यादींवर आम्ही श्रद्धा ठेवली असती तर तेवढ्याच बळावर ती आम्हांला वश होणार होती काय ? तिची आर्जवे केल्याने ती आम्हांला पावणार होती काय ? आमच्या आर्जवांचा आणि तिचा कसलाही संबंध नाही. ज्या सामर्थ्याचा व आमचा संबंध नाही त्यांची आम्ही पूजा जरी केली तरी तरी आमचा धावा कधीही ऐकत नाहीत हे आम्हांस माहीत झालेले आहे. पृथ्वीची पूजा आजवर अनेकांनी केली आहे; पण यांपैकी कोणाचा पाय घसरला तर पृथ्वीने त्याची कधी गय केली आहे काय? ज्याने कधी पूजा केलेली नाही त्या पाय घसरणाराला पृथ्वी जी शिक्षा करते तीच ही पूजा करणारालाही ती करते. कारण तिचा आणि पूजेचा कसलाच संबंध नाही. पृथ्वीशक्तीहून शतकोटी प्रबळ अशी जी शेवटची प्रबलतम शक्ती तिचेही असेच असले पाहिजे. पण आरंभी सांगितल्याप्रमाणें आम्ही, म्हणजे आमच्या प्राचीन पूर्वजांनी, त्य शक्तीवर मानवी करुणेचा, मानवी अंतःकरणाचा अध्यारोप करून ठेविला आहे. मानवासारख्याच भावना या शक्तीला आहेत; आमचेच आर्जवाचे व सदयत्वाचे

नियम तिला लागू आहेत हे त्यांनी ठरवून टाकले आहे आणि त्या पायाभूत गृहीत वस्तूवर पुढच्या साऱ्या युक्ती पुढिलांनी उठविल्या आहेत. श्रेष्ठतम चित्‌शक्तीचे हे मानुषीकरण म्हणजे एक मोठेच साहस होय. ही एक केवळ कविकल्पना आहे; संत्रस्तांची, घाबरे झालेल्यांची ती एक मानवी तरतूद आहे असा बळकट संशय येतो. तो बोलून दाखवू नये काय ? बोलून दाखविण्यात पाखंड आहे काय ? मला तर वाटते की, ही वैचारिक सचोटीच आहे.

(विचार - शलाका)

देवडीवरचा मुजरा

- के. सी. ठाकरे

प्रबोधनकार के. सी. ठाकरे -

थोर पत्रकार, बुद्धीवादी, विचारवंत, घणघाती लेखन करणारे निर्भिड लेखक, 'प्रबोधन' मधून विचाराला चालना देणारे लेखन त्यांनी केले. समाजातील दंभ आणि खुळचट कल्पनांवर त्यांच्या धारदार लेखणीने प्रहार केला.

क्रांतिकारक चळवळीच्या पुरस्कर्त्या प्रबोधनकारांनी गाडगेबाबांचे अभ्यासपूर्ण चरित्र लिहिले त्यातील सुरूवातीचा हा देवडीवरचा मुजरा.

साधू संत महंतांची चरित्रे आजकालच्या पिढीला टाकावू वाटतात. हातातही धरणार नाहीत कोणी. कारणे उघड आहेत. चालू घडीच्या समाज-जीवनाचे बिनचूक मार्गदर्शन करण्यासारखे असतेच काय मुळी त्यात ? आजवरच्या अनेक साधू संतांनी देव देवता धर्म व्रते दाने तीर्थयात्रा यांचेच प्रचंड बंड माजवून लोकांना देव - खुळे नि धर्मवेडे बनवले. मोक्षाच्या भरंसाट कल्पनांनी कोटिकोटी अडाणी स्त्री पुरुषांना संसारातून उठवून भिकेला लावले. दगड माती धातूंच्या मुर्तीचे भजन पूजनाचे लोकांना वेड लावून त्यांना माणसांतून उठवले. माणुसकीला पारखे केले. **माणसांपेक्षा दगड धोंडेच भाग्यवान ठरले. अन्न-अस्तर-आसऱ्याला आंचवलेल्या** माणसांसाठी त्यांची तरतूद करण्याऐवजी, देव देवळांच्या उभारणीसाठी आणि **ऐदी-बैरागी गोसावी भट भिक्षुकांना** निष्कारण पोसण्यासाठी अब्जावधी रुपयांची खैरात चालू झाली. माणसांपेक्षा फत्तरी देवदेवतांची आणि त्या परान्नपुष्टांची प्रतिष्ठा वाढली. तिरस्करणीय बुवाबाजीचा जन्म येथेच झाला.

माणुसकीची अवहेलना आणि बदनामी करणाऱ्या या परिस्थितीला जोरदार कलाटणी देण्याचे यत्न अनेक शहरी सुधारकांनी आजवर पुष्कळ केले. पण त्या बुद्धिवादी यत्नांची आंच लक्षावधि खेड्यांत पसरलेल्या अडाणी बहुजन समाजांपर्यंत जाऊन कधी पोचलीच नाही. आणि मुख्य अडचणीचा प्रश्न तर या कोटिगणति खेडूतांचाच आहे. त्यांच्या आचार विचारात आरपार क्रांति

घडवण्यासाठी **तेथे पाहिजे जातीचा.** नुसता 'जातीचा' असूनहि भागणार नाही. तर ज्या पूर्वीच्या साधू संतांनी देव-धर्म विषयक भ्रमिष्टवादाचा फैलाव केला, **त्यांच्याच 'मातीचा' तो असल्याशिवाय,** क्रांतीचे हे महान कार्य तडीला जाणार नाही.

श्री गाडगे बाबा त्याच नि तसल्याच **जातीचे नि मातीचे** चालू घडीचे महान क्रांतिकारक 'साधू आहेत. पण **त्यांना कोणी साधू संत महाराज म्हटलेले खपत नाही.** संतांविषयी त्यांना अपरंपरा आदर. संत कोणाला म्हणावे, यावर अनेक पूर्व संतांचेच दाखले देऊन ते प्रवचन करू लागले म्हणजे त्यांची रसवंती विलक्षण प्रेमादराने नाचू लागते. **"कुठे ते ज्ञानोबा तुकाराम एकनाथ कबिरासारखे मोठमोठे संत आणि कुठे मी ? कोणत्या झाडाचा पाला?"** ही कबुली त्यांच्या प्रत्येक कीर्तनात असते. देवकोटी किंवा संतकोटीपेक्षा साध्यासुध्या मानवकोटीचेच जिणे पत्करून, मानवतेची कट्टर अभेदाने सेवा करीत राहण्यातच मानव जन्माचे सार्थक आहे, हा बाबांच्या आचारधर्मातला एक ठळक कटाक्ष. त्यांची धर्मविषयक मतें आजकालच्या सुधारकांनाही लाजवतील इतकी उत्क्रांत आहेत. स्पष्टच म्हणायचे तर, **अस्पृश्योद्धार, पशू-पक्षि-हत्या-बंदी, अमानुष नि खुळचट रूढींचे उच्चाटन आणि** आजकाल महत्त्व पावलेला **खराट्याचा धर्म,** महात्मा गांधीजींच्या आंतल्या आवाजात स्फुरण पावण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी गाडगे बाबांनी प्रत्यक्ष प्रचारात आचारात आणलेला होता. फरक इतकाच की गांधीजींच्या लहानसान हालचालींच्या मागे पुढे प्रसिद्धी-तंत्राचे पाठबळ मोठे आणि गाडगे बाबांना नेमके त्याचेच वावडे.

(१) गांजा भांग अफू दारू व्यभिचारासारख्या व्यसनांचा कडवा निषेध (२) शेतकरी कष्टकरी जनतेला साक्षरतेचा, साक्षेपाचा, अखंड उद्योगाचा, सहकाराचा आणि काटकसरीचा अट्टहासी उपदेश, (३) सावकारशाहीच्या नि भांडवलशाहीच्या कचाट्यात चुकूनहि न जाण्याचा इषारा आणि (४) माणूसकीला बदनाम करणारे रूढीरिवाज नि देवकार्ये यांपासून दूर रहाण्याचा उपदेश, हे गाडगे बाबांच्या गेल्या ४५ वर्षाच्या प्रचारकार्यातले मुद्दे लक्षांत घेतले, तर **त्यांना समाजवादी सत्यशोधक म्हणायलाही कांही हरकत नसावी.** फरक एवढाच, शहरी चळवळे फक्त शहरातूनच समाजवादी तत्वांची नुसती पुराणे सांगत वावरत असतात आणि गाडगे बाबा लाखलाख गणतीच्या खेडूती बहुजन समाजाच्या जीवनाशी समरस एकवटून, स्वतःच्या आचरणाने त्यानाही

आपल्यामागे घेऊन जात असतात.

धर्मपंथ असो वा धर्मग्रंथ असो, त्यातल्या यच्चयावत् दांभिक फिसाटांचा कडकडून निषेध करणारा आणि देशकालवर्तमानानुसार जनतेला निर्मळ माणुसकीचा नवा आचार-विचार-धर्म शिकवणारा साधू म्हणा, संत म्हणा, किंवा महात्मा म्हणा, काय वाटेल ते नाव द्या, श्री गाडगे बाबांच्या पूर्वी कोणी झालेला आढळत नाही आणि पुढे त्यांची ही लोकोत्तर परोपरा कोणी टिकवून चालवील असेहि वाटत नाही. त्यांच्या निस्पृहतेला नि निरिच्छतेला **निरूपमा** हेच विशेषण छान शोभते.

(श्रीसंत गाडगेबाबा चरित्राची प्रस्तावना)

शेवटचे किर्तन

- गाडगेमहाराज

गाडगेमहाराज (१८७६-१९५६) डेबुजी झिंगराजी जाणोरकर. जन्म शेणगाव (जि. अमरावती) आधुनिक काळातील थोर संत. अज्ञान, रूढी, अंधश्रद्धा यावर किर्तनातून प्रहार करणारे लोकशिक्षक लोकसेवेचे व्रत अंगिकारून त्यांनी अनाथाश्रम, धर्मशाळा दवाखाने काढले. गोधडेमहाराज, चिंधेबुवा, मडकेबुवा, चापरेबुवा या नावाने सुपरिचित.

समाजातील अज्ञान दूर व्हावे, त्याला मानवधर्माची ओळख व्हावी, जातीभेद नष्ट व्हावा, देवाधर्माच्या नावावर चालणारी पशुहत्त्या बंद व्हावी यासाठी त्यांनी पन्नास वर्षे अनवाणी पायाने हिंडून किर्तनातून जनजागरण केले. त्यांच्या अखेरच्या किर्तनातील विचार खालील उताऱ्यात त्यांच्याच शब्दात व्यक्त झाले आहेत.

माहा बाप स्वप्नांत तुम्ही पाहिला होता का कधीं ? नाऽऽऽहीं ! मग जें पाहिलं नाहीं ते दिसतच नाहीं. मंग जो फोटो पाहातो, तो फोटोतलाच देव दिसतो. देव नाही दिसत. देव दिसायची वस्तूच नाहीं. मंग तीर्थांत देव नाहीं. आता आपण गणपती मांडला की नाहीं ? होऽऽऽय ! हे गणपतीची गणपती बसोन देवाची भक्ति नाहीं. हे एक रुढी पडून गेली रुढी. काय पडली ? रुऽऽऽढी ! हां ! गणपती बसोणं देवाची भक्ति नाहीं. ज्या वक्ती गणपतीले आणतां बॅन्ड लावतां, भजन लावतां अन् वाजवत वाजवत आणतां.

मोराया....मोरया....मोऽऽऽरया ।

आणून सिंहासनावर बसवतां. अन् त्याची पूजा करतां- निवद, मोदक, आरत्या - शेवटच्या रोजी उठवतां का नाहीं ? होऽऽऽ ! मग त्याले कुठी घेता? डोक्यावऽऽऽर ! बोला ? डोक्यावऽऽऽर! अन् मंग कुकडें लांबवता ?

मोरया...मोरया....मोऽऽऽरया ।

(गळ्याला हात लावून) एवढ्या पाण्यांत - मरया ! चले जाव ! हे देवाची भक्ति नाही. ज्याची एवढी शोभा केली, ज्याच्या आरत्या केल्या, अन् त्याले पाण्यांत बुडवून मारतां ? तुमच्यावर कधीं खटला भरला तर फौजदारी होते.

देवाची भक्ति नाहीं. देवाची भक्ति भजन !

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

आज काय आहे इथं ? पोलीस लाइनीत पूऽऽऽजा सत्यनारायण आहे. काय ? सत्यनारायऽऽऽण ! सत्यनारायण देवाची भक्ति नाहीं, **सत्यनारायण कोण करते ?** लोभी लोक मुलगा नाहीं - सत्यनारायण पाव. गाडी नाहीं - सत्यनारायण करूं, पैसा हातांत मिळत नाहीं, - सत्यनारायण करुं. ते जागा मले कधीं मिळेल, - सत्यनारायण करेल, लोभी लोक ! सत्यनारायण ? देवाची भक्ति नाहीं. सत्यनारायणाच्या पोथीमधें असं आहे कीं साधुवाण्यानं परसाद नाहीं घेतला; 'अन् सत्यनारायण नाहीं केला, त्याची करोडो रुपयांची नौका पाण्यांत बुडाऽऽऽली ! अडीच रुपयाचा सत्यनारायण केला अन् परसाद वाटला, परसाद घेतला अन् करोडो रुपयांची नौका बुडाली ते वर ....आऽऽऽली ! आं ? वर आऽऽऽली ! नाहीं नाहीं. हें खरं नाहीं ! ज्या सालीं लढाई झाली त्या सालीं, लढईच्या सालीं. समुद्रांत ऐकक आगबोट, पन्नास पन्नास कोट रुपयाची पार तळाला गेली. पत्ता नाहीं. अशा किती आगबोटी बुडाल्या. सत्यनारायण करणाऱ्या महाराजाले म्हणाव अडीच रुपये घेऊन कशाला एवढी बडबड करतां - अडीच लाख रुपये घ्या - अडीच कोट रुपये घ्या - समुद्राच्या किनाऱ्यावर एक सयनारायण करा अन एक आगबोट आणा वर. जमेल का ? नाऽऽऽहीं !

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

देवळांत देव नाहीं.

नहीं मेहजिदमें नहीं देवलमें ।

हजरत मैजिदींत नाहीं, हिंदूच्या देवळांत देव नाहीं.

नहीं मेहजिदमें नहीं देवलमें ।

हिरा खोया कचरोमें ॥

देऊळ तयार झालं. मूर्ति आणावं लागतंत की नाही?

होऽऽऽय ! बोला ? होऽऽऽय ! मग मूर्ति इकत कीं फुकट ? इकऽऽऽत ! **देव इकत भेटत असते ?** सांगा. मंग देव इकत न घेतां सूर्यनारायण घ्याव जेवढे पैसे पडतील तेवढे पडून् द्या. अन् आपल्या घरांत आणून बसवून

टाका ! देव इकत भेटते का ? मेथीची भाजी होय - का कांदेबटाटे होयेत ? देव इकत भेटते - हेंही समजत नाहीं ज्या माणसाले ? तो माणूसच कसा ! बरं. आणले देव. बससोले देवळांत - **तुमच्या देवाले, आंग धुतां येतें का ?** नाऽऽऽहीं ! ज्याले आंग धुवायची अक्कल नाहीं त्याला देवच म्हणता ? तुमच्या देवाले **धोतर नेसतां येतें का ?** नाऽऽऽहीं ! ज्याला धोतरही नेसतां येत नाहीं त्याला देवच म्हणतां ? तुमच्या देवापुढें निवद ठेवला - कुत्रं भिडलं, तर कुत्रं हाणतां येते का ? नाऽऽऽहीं. कुत्रंहि हाणायची ज्याच्या अंगांत ताकद नाहीं त्याला देव म्हणतां ? बरा तुमच्या देवाचा देबळापुरता तरी आंत उजेड पडते का ? नाऽऽऽहीं. ईझला दिवा मंडळी आली. बापूराव दिवा लावा. मंडळी दर्शनाला आली. आणा दिवा. देव कोणी दाखोला ? दिव्याऽऽऽनं ! दिवा मोठा की देव मोठा ? दिऽऽऽवा ! देवळांत देव नाहीं. देव कुठें आहे ? **या जगांत देव आहे. जगाची सेवा करा !** धर हात करून भजन करूं -

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

बिर्टिश सरकारने मोठे एक आपल्यावर अरिष्ट आणलं होतं. मग सत्याग्रह केला की नाहीं लोकाइन ? होऽऽऽय ! **कोणीं देवळांतले देव आले होते का मदत कराले ? वान्द्र्याचे राम आले, दादरचे इठोबा,** पाह्यले होते का ? नाऽऽऽहीं ! **वाळकेश्वरचे महादेव** पाह्यले होते का ? नाऽऽऽहीं ! मग कोण सत्याग्रह केला ? माणसानं ! कोणं केला माणसानं ऽऽऽ! अन् मंग कोण चले जाव म्हटलें ? गांधीजीनंऽऽऽ ! गांधीजीनं ! कोण चले जाव म्हटलें ? गांधीजीनंऽऽऽ ! **मग गांधीजीला देव म्हणा,** की शेकडों वर्ष राज्य केलं. अन् एका शब्दानं ज्यानं म्हटलं की **तुम चले जाव गेले का** राहिले ! गेऽऽऽले ! गांभीजीले देव म्हणा.

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

बडे जोरसे, बडे प्रेमसे, महात्माजीकी जय बोलो. महात्मागांधीकी जऽऽऽय ! दो दो रोटी खाये , लोटालोटा पानी पिये अन् आवाज अंदर चला, उसकू बाहेर निकालो जिन्होंने लोकोंके वास्ते तुरुंग भोगा, पोलिसके धक्के खाये, अंधारी रात कोठडीमे वास किया, बिर्टिशके घोडेका दाना भरडा- लोकोंके वास्ते. उसके नामसे ऐसी जय बोलो की जैसी तोफ छुटती है , महात्मा गांधीकी जऽऽऽय ! शाबास अपने अपने बापकी जय बोलो. हमारे बाप

बडे अंबलदार थे. हमारे बाप बडे शेट थे, बोलो - हमारे बापकी, हमारे आजेपंजेका कोई गूखाडीमें भी नाम नहीं है, गूखाडी मे न कोई नाम लेगा. गांधीजीके नामने पुर्थईपर बरसात किया बरसात !

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

दस मिनिट, दस मिनिटमे सब पुर्थईभर पसारा गांधी जीका हो गया की महात्माजी....गयेऽऽऽ ! महात्माजी गयेऽऽऽ ! दस मिनिट में. हम ऐसे है, इस घरमें हम मर गये तो पीछेके घरवालेकू छे महिने नहीं मालूम होता, उसके घरकू सगेवाले आते ...रोते, क्या हुवा हो ? वो गणपतशिंग कल रातकु मर गया. अरे हमकू मालूमही नहीं - जैसा कुत्ता मर गया साला. माणसाचं धन तिजोरी नाहीं, सोनं नाहीं, हिरे नाहीं, बंगला नाहीं, मोटर नाहीं ! माणसाच धन कीर्ति ! कबीर पुरावा देतात.

सूरतसे कीरत बडी बिनपंख उड...जाऽऽऽय ।

सुरती तो जाती रही कीरती कबूना ....जाऽऽऽय ॥

जबलग सूरज चांद है पुर्थईपर जबलग गांधी मरते नहीं. गांधीजी जिंदे है. मरेनवाले, आनेवाले, जानेवाले हम है. गांधीजीकू मरणच नहीं.

तुका म्हणे एक मरणचि खरें ।

उत्तमची उरे कीर्ति ...माऽऽऽगे ॥

मरण पतेंकाले लांबोनार ! मरण कांहीं या जगांत कोणाला ठेवत नाहीं. ठेवणार नाहीं.

हे लोक का गरीबींत ? साहेब (बोलणार - अहो बोलणार) हे लोक का गरीबींत राहिले ? एक तर याहीले नाहीं विद्या. काय नाहीं ? विऽऽऽद्या ! ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी चालेऽऽऽल ! आता तरी सुधरा. आतां तरी मुलाले शिक्षण द्या. पैसे नाहीं म्हणाल तर जेवणाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. इव्हायाला पाहुणचार करूं नका, धकू द्या. पण मुलाले शाळेंत घातल्याविणे सोडूं नका ऽ ऽऽ ! विद्या मोठं धन आहे. विद्या मोठं धन आहे. यांतलेच माणसं दिल्लीच्या तक्तावर भाषण करतात. आणि यांतलेच माणसं बोरीबंदरच्या ठेसनावर पोतें उचलतात. ते माणसं अन् हे कोण ? हे काइ बैल नाहींत ना ? कोण आहेत? माणसंऽऽऽ ! मोठी, मोठी गोष्ट आहे विद्या, मोठी गोष्ट आहे. या टायमाले

विद्या मुलाले न शिकवाल तर तुम्हाले आम्हाले विद्या नाहीं तर मजुरी तरी लागली पण पुढं तुमच्या मुलाले मजुरी लागणार नाहीं तर बुटपॉलिश करावं लागेल. इधर आ. देड आणा. चले जाव. बुटपॉलीश करावं लागेल. महाराज विद्या केवढी मोठी आहे. डॉक्टर आंबेडकर साहेब यांच्या पिड्यान पिढींत झाडू मारायचं काम केलं. यांच्या वडीलाले सुबुद्धी सुचली आणि आंबेडकर साहेबाले शाळेंत घातलं. आंबेडकर साहेबने कांही लहानसहान कमाई नाहीं केली. हिंदुस्थानची घटणा केली घटणा. अन् तेच शाळेंत जाते ना अन् शिकते ना तर झाडू मारणंच त्यांच्या कर्मांत होतं. विद्या मोठं धन आहे. जेवणाचं ताट मोडा. बायकोला लुगडं कमी भावाचं घ्या. मोडक्या घरात रहा. पण मुलाले शिक्षण दिल्याविने सोडूं नऽऽऽका. आणि दुसरं शिक्षण परमात्माची भक्ति.

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

होऽऽऽ । संसाराची काटकसर-मारवाडी गुजराथी ब्राह्मण भाटे हे का रोज तुपांतला शिरा खातात ? त्यांच्या घरीं जमा-खर्च आहे. काय ? जमाऽ ऽऽखर्च ! उत्पन्न किती अन् खर्च किती याची लैन मालूम आहे. अन् आमच्या मराठ्याले, तेल्या, माळ्या, न्हाव्या, धोब्याले याले जमाखर्च समजतच नाहीं. याचं कसं आहे ? पौणसे रुपये उत्पन्न आणि ऐशीं रुपये नव्वद रुपये खर्च. जानेवारीत मजा करा आणि फेपरवारींत बोंबलत बसा. बोंऽऽबोंऽऽ ! काटकसर पाहिजे. घरी जमाखर्च पाहिजे. लइ जण म्हणतात, पगार पुरत नाहीं. पगार पुरत नाऽऽऽहीं ! पगार सरतच नाहीं असं म्हटलं पाहिजे. ज्या घरांत नवरा बायको बुद्धिमान अक्कलवान असतील तिथं पगार सरत नाहीं. शिल्लक पेटींत टाकली पाहिजे, पगार कोणाले पुरत नाही ?

ताकद थोडी घुसा घणा -

एकाद्या माणसाले जोर कमी, कलागत करायला पहिला नंबर. पुढं गेला अन् दोन तोंडात बसले कीं चालला बोंबलत घराकडे. पुंजी थोडी खर्चा घणा. सवाशें रुपये पगार अन् दीडशें रुपये खर्च. जानेवारीत मजा अन् फेपरवारीत गप बसा, संसारांत स्वच्छता, काटकसर अन् मोठी गोष्ट दया, मोठी गोष्ट दऽऽ या !

तीरथ जाव काशी जाव चाहे जाव गया ।
कबीर कहे कमालकू सबसे बडी दया ॥

ज्या धन्याच्या अन्तःकरणांत दया असेल तो सत्पुरुष आहे. सत्पुरुष, मराठे मंडळी, जेजुरीला जाता का नाहीं ?

होऽऽऽय ! बकरा नेता का नाहीं ? होऽऽऽय ! मानेचा तुकडा कापता की नाहीं ? होऽऽऽय ! मसाला लावून शिजवून खाता की नाहीं ? होऽऽऽय ! तुमच्या पिढ्याच्या पिढ्या मरतील तुमच्या जेजुरीला जाणाऱ्याच्या, तुमचं कधी बरं होणार नाऽऽऽहीं !

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

तुम्हीं मऱ्हाठे, तुकोबाराया मऱ्हाठे, तुम्हाले एक पुरावा सांगतात -

जन्मवरी पोसे-लेकुराच्या परीऽऽऽ ।

(भजन मंडळींना) आवाज धरत आहोत !

जन्मवरी पोसे लेकुराच्या परीऽऽऽ ।

बकऱ्याला चारा टाकतां कीं नाहीं ? होऽऽऽय ! बकऱ्याले पाणी पाजतां कीं नाहीं ? होऽऽऽय ! हारपला बकरा, पाहून आणतां कीं नाहीं ? होऽऽऽय ! पाऊस आला, बकऱ्याले घरांत बांधता कीं नाहीं ? होऽऽऽय ! पोटच्या मुलासारखा वागवता बापा अन् त्याले मसाला लावून कापून खाता कापून. माणसं नाहींत तुम्ही, यानले रानडुकरं म्हटलं तरी चालेऽऽऽल.

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

होऽऽऽ । आपल्या हिंदुस्थानले मोठा एक डाग आहे डाग. तो डाग धुवून काढायचा प्रयत्न करा. तो डाग कोणता ? शिवशील ! काय करशील ? शिवशीऽऽऽल ! शिवशील. काय करशील ! शिवशीऽऽऽल ! तूं कोण ? जात पुसणं ज्याच्या अंगांत अभिमान आहे तो जात पुसते. तूं कोऽऽऽण ! जो जात पुसते त्याच्यासारखाच तो आहे कीं नाहीं ? होऽऽऽय ! याले चार हात अन् त्याले दीड हात आहे का ? बोला. नाऽऽऽहीं ! याले चार डोळे आहेत आहेत त्यानले दोनच आहेत असं आहे का ? नाऽऽऽहीं ! यानले चार पाय आहेत अन् त्याले एकच तंगडं आहे असं आहे का ? नाऽऽऽहीं ! मग तूं कोण कां पुसता ? कोणी तुम्हाले जात विचारील तूं कोण तर म्हणावं मी माणूस. कोण आहात तुम्ही ? माणूऽऽऽस ! का म्हैस आहात ? नाऽऽऽहीं ! कोण आहां - माणूऽऽऽस ! - माणूस ! कोण तूं - तर म्हणावं माणूस. कोण आहांत ? माणूऽऽऽस ! जात पुसणाऱ्याला काही शरमही नाहीं वाटत. त्याच्या

सारखाच तो आहे अन् जात पुसते, तूं कोण-आपल्यासारखा आहे का त्याला कांहीं चूक आहे ? नाऽऽऽहीं ? आं ? नाऽऽऽहीं ! तुमचं आमचं दोन काय आहे दाखवा. तुमची आमची जमीन एक की दोन ? एऽऽऽक ! तुमचं आमचं आकाश एक की दोन ? एऽऽऽक ! सूरेनारायण एक की दोन ? एऽऽऽक ! आगगाडी एक की दोन ? एऽऽऽक ! टॅक्शी मोटर एक की दोन ? एऽऽक ! कोरट कचेरी एक की दोन ? एऽऽऽक ! काल्हेरा पिलेग एक की दोन ? एऽऽऽक ! जेवण परसाकडे एक की दोन ? एऽऽऽक ! दोन दाखवा. मग म्हणा शिवशील. काय दोन आहे सांगा. तुम्ही आम्ही एका रस्त्यांतून जलमलो का - आम्ही आईच्या यवनीतून पडलो अन् तुम्ही काय तोंडातून पडले का बाहेर का बगलींतून निघाले - सांगा ! माणसाले जाती दोन आहेत दोन. किती ? दोऽऽऽन ? **बाई आणि पुरुष. या दोनच जाती अहेत. तिसरी जातच नाही.**

गोपाला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ॥

(शनिवार दि. ८।११।१९५६ रोजी पोलीस स्टेशन वांद्रा (मुंबई) येथे झालेल्या शेवटच्या कीर्तनातून)

विश्वाविरुद्ध

- पु. ग. सहस्रबुद्धे

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे - मराठीत वैचारिक साहित्याचे दालन समृद्ध करणारे एक विचारवंत. 'विज्ञानप्रणित समाजरचना', 'स्वभावलेखन', 'माझे चिंतन', 'राजविद्या', 'पराधीन सरस्वती', 'भारतीय लोकसत्ता' इत्यादी त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ.

'विवेकनिष्ठा' हा वैज्ञानिक विकासाचा मूलाधार होय, हे सूत्र युरोपच्या वैचारिक इतिहासाच्या आधाराने प्रस्तुत निबंधात स्पष्ट करण्यात आले आहे; भारतामध्ये १९ व्या शतकापर्यंत विवेकनिष्ठेसाठी विश्वाविरुद्ध उभा राहणारा बुद्धिवादी विचारवंत झालाच नाही; व त्यामुळे ऐहिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांत भारत मागे पडला हा विचार लेखकाने अगदी निर्भीडपणे या निबंधात मांडला आहे.

विवेकनिष्ठा, तर्कशुद्ध युक्तिवाद, राष्ट्रीय - सामाजिक - नैतिक मूल्यांच्या आग्रहाने आलेले ओज, वक्तृत्वपूर्ण भाषाशैली हे सहस्त्रबुद्धे यांच्या लेखनाचे विशेष.

इ. स. पूर्व ३९९ या सालच्या एका दिवशी अथेन्स नगरीच्या लोकसभेत जगाचा इतिहास घडविला जात होता. मानवी संस्कृतीची तोपर्यंत प्रगती चालू होतीच; पण त्या दिवशी त्या लोकसभेत ही प्रगती अत्यंत वेगाने चालणारी शक्ती निर्माण होत होती. विवेकनिष्ठा हे त्या शक्तीचे नाव. सर्व विश्व आपल्याविरुद्ध असले तरी आपल्या विवेकाच्या बळावर त्या विश्वाचा मुळींच मुलाहिजा न करता आपले मत आग्रहाने प्रतिपादन करण्याचे व त्यासाठी देहदंड सोसण्याचे मनःसामर्थ्य जगाच्या संसाराच्या इतिहासात मानव त्या दिवशी प्रथमच प्रगट करीत होता. अथेन्स मधील लोकसभेच्या नेत्यांनी सॉक्रेटीसवर अभियोग चालविला होता. अखिल राष्ट्राला मान्य असलेल्या देवता हा मानीत नाही व रूढ नीतीपासून तरुणांना च्युत करतो, वाममार्गास नेतो असे त्याच्यावर आरोप होते. वास्तविक सॉक्रेटीस ग्रीक देवता मानीत नव्हता असे नाही. पण प्रत्येकाने आपल्या विवेकबुद्धीच्या निकषावर कोणतेही तत्त्व-

देवांचे अस्तित्वसुद्धा - पारखून पाहावे असे तो सांगत असे. एखादी गोष्ट देवांना प्रिय आहे म्हणून ती शुभ व आदरणीय ठरत नसून ती गोष्ट शुभ व आदरणीय आहे म्हणून ती देवांना प्रिय होते असे, काहीसे उपयुक्तता-वादासारखे प्रतिपादन तो करीत असे. ज्ञान हा अत्यंत मोठा सद्‌गुण व अज्ञान हा अत्यंत घातुक दुर्गुण होय हा विचार तो आपल्या शिष्यांना शिकवी. नीतीच्याही बाबतीत हेच होते. रूढ नीतिनियम पाळू नयेत असे तो कधीच म्हणाला नाही; पण नीतिकल्पनांना अतींद्रिय; गूढ दैवी शक्तींचा म्हणजे देवांच्या वचनांचा आधार अवश्य नाही. ऐतिहासिक व सामाजिक अनुभवांवरून नीतिनियम ठरवावे असा त्याचा आग्रह होता. अर्थातच व्यक्तीचा विवेक हे नीतीचे अधिष्ठान ठरले. आता या प्रतिपादनात नीती व देव यांविषयीच्या रूढ कल्पनांवर प्रत्यक्ष हल्ला केला नसला तरी त्याचा परिणाम तोच झाला. कारण बुद्धीचा निकष लावल्याबरोबर प्रस्थापित नीतितत्त्वांवरील तरुणांची श्रद्धा ढळणे अपरिहार्य होते. त्याचप्रमाणे विवेकाचा नेत्र उघडताच ग्रीक देवतांविषयीची भाविक, भोळी श्रद्धा जशीच्या तशी टिकून राहणे शक्य नव्हते. सनातनी लोकांच्या मते याचाच अर्थ तरुणांना बिघडविणे व पाखंड माजविणे असा होत होता, व यासाठीच सॉक्रेटीसला न्यायासनापुढे खेचले होते. सॉक्रेटीसने विवेकनिष्ठेसाठी, स्वतःच्या मतासाठी मृत्यू पत्करला या गोष्टीमुळे जगाच्या इतिहासाचा प्रवाह बदलून गेला.

सॉक्रेटीसच्या या आत्मबलिदानाचा विशिष्ट अर्थ आपण समजून घेणे अवश्य आहे. धर्मासाठी, स्वजनांसाठी, स्वामीसाठी उदात्त भावनेने आत्बमबलिदान करणारे लोक सॉक्रेटीसच्या आधीही अनेक होऊन गेले असतील. पुढच्या इतिहासात तर निश्चित होऊन गेले आहेत. पण त्या सर्वांहून हे बलिदान वेगळे आहे. धर्मासाठी किंवा स्वामीसाठी ज्यांनी ज्यांनी प्राण दिले त्यांच्यामागे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने हजारो लोक उभे होते. त्या त्या व्यक्तींचा समाज किंवा त्यांच्या पक्षाचे लोक यांचा त्यांना बहुधा पाठिंबा असतो. त्यांचे त्यांना धन्यवाद मिळतात. परंतु सॉक्रेटीस हा सर्व समाजाविरुद्ध एकटा उभा होता. स्वजनांच्याविरुद्धच त्याचा लढा होता. त्याच्या बाजूला फक्त त्याची विवेकशक्ती उभी होती. एक व्यक्ती विरुद्ध विश्व असा हा लढा होता. त्याची अपूर्वता ही आहे.

टिळक आणि आगरकर यांची तुलना केली म्हणजे ही अपूर्वता नीट

ध्यानात येईल. टिळकांनी सर्व जन्म ब्रिटिश साम्राज्याशी लढा करण्यात वेचला. त्या लढ्याचे स्वरूप अत्यंत उग्र व भयावह होते. टिळकांना त्यात यातनाही अपार सोसाव्या लागल्या. पण हा संग्राम चालू असताना आरंभापासून टिळकांचे स्वजन - महाराष्ट्रीय जनता-त्यांच्या पाठीशी उभे होते. पुढे पुढे तर अखिल भारतभूमी त्यांना आशीर्वाद देत होती. आगरकरांचा लढा याहून अगदी निराळा होता. त्यांना स्वजनाशीच संग्राम करावयाचा होता. त्यांच्यामागे कोणीही उभे नव्हते. त्यांना साहाय्य फक्त त्यांच्या विवेकदेवतेचे होते. व्यक्ती विरुद्ध अखिल समाज असा तो लढा होता.

आपल्या मतासाठी मृत्यू पत्करावयाचा ही संस्कृती सॉक्रेटीसने प्रथम जगात आणली. सॉक्रेटीसची ही परंपरा मध्यंतरी काही शतके लुप्त झाली होती. आणि ही विवेकनिष्ठा लुप्त होती तोपर्यंत युरोपची प्रगतीही कुंठित होऊन बसली होती. जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशाच्या इतिहासावरून हे स्पष्ट दाखविता येईल की स्वतंत्र चिंतनाला, अवलोकनाला, अनुभूतीला व अनुभूतीतून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या प्रसाराला जितका, ज्या प्रमाणात व ज्या क्षेत्रात अवसर मिळतो तितका त्या प्रमाणात व त्या क्षेत्रात समाजाचा उत्कर्ष होतो. हे स्वतंत्र चिंतन व संशोधन जेथे कोणत्याही कारणाने का होईना, मुळीच होत नाही तो समाज रानटी, पाशवी स्थितीला गेलेला असतो. चवथ्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत युरोपची हीच स्थिती होती. अशा स्थितीत ज्या देशात कोणी सॉक्रेटीस निर्माण झाला नाही ते देश परवापरवापर्यंत दास्य, विघटना, दारिद्र्य, विघटना, दारिद्र्य या कर्दमात लोळत पडले होते. इंग्लंडचे भाग्य असे की, तमोयुगानंतरचा पहिला सॉक्रेटीस-बुद्धिनिष्ठेपायी आत्मबलिदान करणारा पुरुष - त्या भूमीत निर्माण झाला. त्याचे नाव रॉजर बेकन (१२१४-१२९४). ऑक्सफर्ड येथे विद्यार्थी असतानाच आपल्या गुरुजींची अंधश्रद्धा त्याला पटेना. त्या लहान वयातच ॲरिस्टॉटलचे वचन, त्याचे सिद्धान्त, स्वतः प्रयोग करून पाहिल्याशिवाय मी मानणार नाही, असा पीळ त्याच्या मनात निर्माण झाला. पुढे पॅरिसच्या विद्यापीठात प्राध्यापक झाल्यावर तो आपले विचार उघडपणे बोलून दाखवू लागला, तेव्हा धर्मपीठाचे अधिकारी त्याच्याकडे रोखून बघू लागले. रॉजर बेकन स्वतः फ्रान्सिस्कन पंथाचा धर्मगुरुच असल्यामुळे तो अग्निमुखातून सुटला इतकेच; पण आजन्म तुरुंगवास मात्र कपाळीचा टळला नाही. 'सत्यज्ञान हे वेदवचनांवरून मिळत नाही व अंधश्रद्धेनेही ते प्राप्त होत

नाही. ते फक्त बुद्धी, स्वानुभव, चिंतन, प्रयोग यांनीच प्राप्त होते.' असे तो सांगत राहिल्यामुळे त्याच्या पंथाच्या आचार्यांनीच त्याला तुरुंगात डांबून टाकले. जगाला ज्ञानकिरणांनी उजळून टाकणाऱ्या या महाभागाच्या आयुष्याची चोवीस वर्षे अंधारकोठडीत गेली व तेथेच शेवटी त्याचा अंत झाला.

चवदा, पंधरा व सोळा ही शतके म्हणजे पश्चिम युरोपच्या इतिहासातील ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनाचा काळ होय. त्या काळाचे व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिनिष्ठा, विवेकनिष्ठा हे मुख्य लक्षण होते. पश्चिम युरोपातील इंग्लंडखेरीज इतर देशांत विवेकाची उपासना इंग्लंडइतक्या निष्ठेने झाला नाही, तरी तेथे सॉक्रेटीस, रॉजर बेकन, वायक्लिफ यांची परंपरा चालविणारे थोर पुरुष मुळीच निर्माण झाले नाहीत असे नाही. मधूनमधून अशा महाभागांचे अवतार येथे होत होते व म्हणूनच त्यांची काही मर्यादेपर्यंत तरी प्रगती झाली. जॉन हस हा असाच एक अवतारी पुरुष होता. आपल्या कर्तृत्वाने चढत जाऊन प्राग विद्यापीठात तो प्राध्यापक झाला. तेथेच त्याने धर्मचिंतन सुरू केले. याच सुमारास जॉन वायक्लिफचे ग्रंथ त्याच्या वाचनात आले आणि त्याच्या मनात क्रांतिकारक विचार उद्‌भवले. प्रस्थापित धर्म, त्यांतील कर्मकांडे, धर्माचार्यांचे विलासी जीवन, त्यांचा धनलोभ व त्यांची पापकृत्ये यांवर तो कडक टीका करू लागला. अर्थातच रोमच्या धर्मपीठाची त्याच्यावर वक्रदृष्टी झाली. धर्मगुरूंनी त्याला अंधारकोठडीत रवाना करून त्याचे अनन्वित हाल केले. "तू पोपचा अधिकार मानीत नाहीस, मग कोणत्या आधाराने तुझे प्रतिपादन करतोस?" धर्माचार्यांनी त्याला विचारले. "मला आधार फक्त माझ्या विवेकबुद्धीचा आहे" हसने उत्तर दिले.

या विवेकबळाच्या आधारानेच जॉन हस शांतपणे चितेवर चढला. विवेकनिष्ठेसाठी आत्मबलिदान करणे ही मानवी संस्कृतीच्या प्रगतीसाठी एक अत्यंत अवश्य असलेली गोष्ट आहे असे दिसते; कारण नुसत्या सत्याचे, नवतत्त्वाचे, नवविचाराचे आवाहन माणसाच्या मनाला पोचत नाही. या सत्याच्या मागे अग्निज्वालांचा प्रकाश जेव्हा दिसतो तेव्हाच माणसाची दृष्टी तिकडे वळते, एरवी नाही. माणसाच्या बुद्धीचे हे फार मोठे वैगुण्य आहे, पण ते खरे आहे. केवळ तर्कशुद्धता, ऐतिहासिक प्रमाणे, स्वानुभव इतकेच काय पण दृकप्रत्ययसुद्धा मानवी मनाला नवसत्याकडे वळविण्यास असमर्थ आहे. सनातन धर्मशास्त्र, वेदवचन, प्रस्थापित रूढी यांच्याकडून मानवाची दृष्टी काढून ती

नव्या तत्त्वांकडे वळवावयाची असेल तर आत्मार्पण हा एकच उपाय आहे आणि हे जाणूनच सॉक्रेटीसने बुद्धिपुरःसर आत्मबलिदान केले.

दुर्दैवाची गोष्ट अशी की आपल्या अत्यंत उज्ज्वल अशा भारतीय संस्कृतीत या सामर्थ्याचा अभाव, हे फार मोठे वैगुण्य आहे, ही अत्यंत मोठी उणीव आहे. वेदकाळापासून तो इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराने येथे पाश्चात्य विद्येचा प्रभाव निर्माण होईपर्यंत या भूमीत सॉक्रेटीस झालाच नाही. आणि पाश्चात्त्य संस्कृतचीचा प्रारंभच सॉक्रेटीसपासून झाला.

जुन्या धर्मशास्त्राला किंवा रूढ धर्माला कोणी विरोधच केला नाही असे नव्हे. तत्त्वज्ञानपूर्वक विरोध केला नाही. जुन्या धर्मशास्त्राला आव्हान देऊन त्याच्या जागी नवे धर्मशास्त्र स्वतःच्या विवेकाच्या आधारे प्रस्थापित करण्याची रग कोणी दाखविली नाही, असा वरील म्हणण्याचा भावार्थ आहे. काही समाजधुरीणांनी देशकाल पाहून धर्मसुधारणा केल्या, पण त्या विवेकबळाने बुद्धीला पटेल ते ग्राह्य मानू अशा तत्त्वाने, अशा आग्रहाने केल्या नाहीत. मानवाच्या विवेकबुद्धीवरची जी अनन्यनिष्ठा तिचा आग्रह धरणारा, तिच्यासाठी संग्राम करणारा, एकही पुरुष ब्रिटिशपूर्व भारतीय इतिहासात झाला नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. स्त्रिया, शूद्र, अत्यंज यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव अनेकांना होत होती. कष्टकरी जनता, शेतकरी वर्ग पिळून निघत आहे हेही अनेकांना दिसत होते, पण ज्यांच्यावर अन्याय होत होता ते लोक किंवा त्यांच्यावतीने समाजातल्या इतर वर्गातले लोक यांतून ही समाजरचनाच आमूलाग्र बदलली पाहिजे आणि समाजरचनेची नवी तत्त्वे ठरविण्याचा आम्हांला अधिकार असला पाहिजे अशा बैठकीवरून प्रस्थापित धर्मशास्त्राशी संग्राम करण्यास कोणीही उभा राहिला नाही. ही विषमता अन्याय्य आहे असे पारमार्थिक क्षेत्रापुरते प्रतिपादन संत-साधू करीत होते, पण येथेही ते संग्रामास सिद्ध झाले नाहीत. काहींनी रूढ धर्मशास्त्राविरुद्ध आचरण केले, पण तसे तत्त्वज्ञान प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही.

विवेकनिष्ठेसाठी संग्राम करण्याचे धैर्य, विश्वाविरुद्ध उभे राहण्याचे हे मनःसामर्थ्य भारतभूमीत आगरकरांनी प्रथम प्रगट केले. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, महात्मा फुले, रानडे भांडारकर या सर्व थोर पुरुषांनी सनातन धर्मशास्त्रावर टीकास्त्र चालविले होते. पण तसे करताना त्यांनी आपल्या बाजूला पुरातन काळच्या अन्य ऋषींचे

साहाय्य घेतले होते. त्यातल्या त्यात लोकहितवादी व महात्मा जोतिराव फुले यांचा हल्ला मूलगामी स्वरूपाचा होता. त्यांची बैठक बरीचशी विवेकनिष्ठेची होती, पण जुन्या शास्त्रांना जळजळीत आव्हान देऊन 'आमच्या स्मृती आम्ही रचणार' अशी घोषणा करून बुद्धीला पटत नसेल तर परमेश्वराचे वचनही आम्ही मानणार नाही, असे जाहीरपणे सांगून अनुभव, इतिहास, तर्क यांच्याच केवळ आधाराने नव्या समाजरचनेचे संपूर्ण तत्त्वज्ञान सांगण्याचे कार्य, आणि या रीतीने विवेकनिष्ठा ही अद्‌भुत शक्ती या भूमीत निर्माण करण्याचे कार्य आगरकरांनी केले. लोकहितवादींनी सूत्ररूपाने नवे विचार आपल्या पत्रातून मांडले होते. जोतिबांनी आपल्या कवनांतून पोवाड्यातून व संवादातून होत नाही. नव्या तत्त्वांचा सर्व बाजूंनी विचार करणे, आधारप्रमाणांनी त्यांचे मंडन करणे, तुलनेने त्यांचे तारतम्य दाखविणे, इतिहासाच्या साहाय्याने जगाच्या पसाऱ्यात त्यांचे स्थान दाखवून देणे, त्यावर आलेल्या व येणाऱ्या आक्षेपांचे निरसन करणे, त्यामुळे होणाऱ्या समाजरचनेचे स्वरूप दाखवून देणे, अशा पद्धतीने जेव्हा सूत्रमय विचारांचा प्रपंच केला जातो तेव्हा त्यांना नवतत्त्वज्ञानाचा दर्जा प्राप्त होतो. आणि हे सर्व करीत असताना त्या तत्त्वांचा प्रणेता समाजाकडून होणाऱ्या यातना सोसताना जे अग्निदिव्य करतो, अखिल विश्वाविरुद्ध केवळ आपल्या विवेकाने जेव्हा तो संग्राम करू लागतो तेव्हा त्यातून विवेकनिष्ठेची शक्ती निर्माण होते. ती शक्ती येथे आगरकरांनी निर्माण केलेली आहे.

(माझे चिंतन)

बुद्धी : माणसाची खरी शक्ती

- दादा धर्माधिकारी

शंकर त्र्यंबक धर्माधिकारी (१८९९-१९८५)-

थोर गांधीवादी, स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी. व्युत्पन्न पंडित. त्यांच्याठायी अद्ययावत् व्यासंग, वेधक वक्तृत्व यांचा मनोहर संगम होता. असहकार, कायदेभंगाच्या चळवळीत दादा आघाडीवर होते.

चिंतनशीलता, तर्कशुद्धता, स्पष्टता, प्रसाद, इ. गुण त्यांच्या लयबद्ध, ओघवत्या कलावती वाणीतून स्पष्ट होतात.

सर्वोदय दर्शन, स्त्रीपुरुष सहजीवन, क्रांतिवादी तरुणांनो, अंतरीचे उमाळे, समग्रक्रांती हे त्यांचे ग्रंथ मौलिक विचाराने भरले आहेत. ' क्रांतिच्या संदर्भात ' या भाषणमालेतील खालील उताऱ्यातून त्यांनी मानवी बुद्धीचे महत्व विशद केले आहे.

सत्य विचार नेहमी तटस्थ, निरपेक्ष असतो. असा जो सत्यनिष्ठ विचार आहे, या विचाराची आज आपल्या देशाला फार मोठी गरज आहे. याचे कारण असे आहे, की विचार करण्याचे जबाबदारीचे काम आता जगातील जवळजवळ सगळ्या माणसांनी सोडून दिले आहे. व्हॉल्टेअरचे एक मोठे सुंदर वाक्य आहे. त्याने असे म्हटले आहे, की माणसाला देवाने बुद्धी दिली आणि माणसाने या त्याच्या चुकीबद्दल सूड उगविण्याचे ठरविले. तू आम्हांला बुद्धी दिलीस, ठीक आहे; आम्ही निदान एवढे तरी करू, की ती वापरणार नाही, तिचा उपयोग करणार नाही. आणि आज आपल्याला असे दिसून येते, की माणसाचे वैशिष्ट्य बुद्धी आहे, तरी ज्ञे बुद्धीमान लोक आहेत त्यांचा बुद्धीवर कमीत कमी विश्वास आहे. माणसाचा सगळ्यात कमी जर विश्वास कशावर असेल तर बुद्धीवर आहे. शिपायाचा तलवारीवर विश्वास आहे. सत्ताधाऱ्याचा सत्तेवर, तख्तावर, सिंहासनावर विश्वास आहे, पण ज्याच्याजवळ बुद्धी आहे त्याचा बुद्धीवर मुळीच विश्वास नाही. तो एखाद्या वेळी बुद्धीचा उपयोग तलवारीची स्तोत्रे गायला करतो. अनेकदा महिमा सांगायला उपयोग करतो. आणि सत्ताधाऱ्याचे वैतालिक तर अनेक साहित्यिक आहेत. अनेक बुद्धिमंत आहेत. बुद्धीमंताचा बुद्धीच्या

शक्तीवर विश्वास नाही. माणसाची मुख्य शक्ती बुद्धी हीच आहे. विचार माणसाची शक्ती आहे. या निष्ठेची आज आवश्यकता आहे. ही निष्ठा म्हणजेच लोकनिष्ठा. बुद्धीचा उपयोग जो करू शकतो, बुद्धीच्या शक्तीवर ज्याचा विश्वास आहे, तोच लोकनिष्ठ. हे लोकतंत्राचे, लोकशाहिचे अधिष्ठान आहे.

आज आपण असे बघतो, की ज्याच्याजवळ संपत्ती आहे, धन आहे तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्याच्याजवळ सत्ता आहे तो लोकशाही आपल्या स्वार्थाकरिता राबवून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि ज्याच्याजवळ दंडुका आहे, तो लोकशाही आपल्या वळणावर कशी येईल या दृष्टीने माणसाला वळवण्याचा प्रयत्न करीत आहे. या तीन शक्तिची प्रतिष्ठा जोपर्यंत आहे, तोपर्यंत औपचारिक लोकशाहीच्याऐवजी जिला आपण वास्तविक लोकशाही म्हणतो या वास्तविक लोकशाहीची स्थापना होऊ शकणार नाही. आणि वास्तविक लोकशाहीची स्थापना कोण करणार हा मुख्य प्रश्न आहे. आतापर्यंत लोकशाहीची स्थापना ज्यांनी केली त्यांच्यादेखील विचारात, त्यांच्या मनोवृत्तीत लोकांना फारच अल्प स्थान होते. लोक म्हणजे कोण ? आपल्याला काय हवे ज्यांना कळत नाही त्यांचे नाव लोक. त्यांना जे हवे ते आम्हांला कळते. त्यामुळे त्यांना जे हवे आहे ते त्यांच्याकरिता आम्ही मिळवावे, आणि नंतर ते बळजबरीने त्यांच्या गळी उतरवावे. ही आजपर्यंत क्रांतीकारकांची भूमिका. समाज-परिवर्तन करणारा जो वर्ग असेल. त्याची ही भूमिका. लोकांची समजूत घालून त्यांना जर आपल्याला वळणावर आणता आले तर ठीक आहे. तसा प्रयत्न आम्ही करू, पण ते जर आपल्याला करता आले नाही तर त्यांच्या मताची पर्वा न करता, त्यांच्या इच्छेची तमा न बाळगता, त्यांना जे इष्ट आहे आणि त्यांच्याकरिता जे हितकर आहे ते त्यांच्यावर लादण्याचा आम्ही प्रयत्न करू, ही भाषा सर्वत्र आपल्याला ऐकू येते. समाजपरिवर्तन करणारी माणसे मूठभरच असतात, जास्ती नसतात. पण ही समाजपरिवर्तन करणारी माणसे असतात, या माणसांच्या समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत लोकांच्या पुरूषार्थाला कितपत वाव आहे हा मुख्य प्रश्न आहे. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत लोकांचा प्रत्यक्ष भाग किती ? सक्रिय भाग किती ? आणि यावर आजच्या क्रांतीची प्रक्रिया अवलंबून आहे.

क्रांतीकारक हा जर कुठल्याही प्रकारची-हिंसक असो, अहिंसक असो, सशस्त्र असो, निःशस्त्र असो, कुठल्याही प्रकारची-सेना उभारू लागला तर त्या

सेनेला एक शिस्त लागते. आणि शिस्तीला एक गोष्ट आवश्यक असते. विचार ज्या मानाने कमी असेल, शिस्त त्या मानाने जास्त. शिस्तीला एकसूत्रीपणा लागतो. एकसूत्रीपणाचा अर्थ असा आहे, की सगळ्यांनी विचार करता कामा नये. एका शिपायाची गोष्ट सांगतात : हा शिपाई एकदा जखमी होऊन दवाखान्यात गेला. डॉक्टरांनी त्याच्या मेंदूचे ऑपरेशन केले. चुकून तो मेंदू त्याच्या कवटीत परत ठेवायला डॉक्टर विसरले. शिपाई तसाच घरी निघून गेला. नंतर डॉक्टरांच्या लक्षात आले. मग पत्र पाठविले, की तुझा मेंदू चुकीने राहून गेला आहे, तू परत आलास तर फिरून तुझ्या कवटीत मी तो व्यवस्थित बसवून देईन. शिपायाने लिहिले, की बरेच झाले. माझ्या लक्षातदेखील आले नाही. पूर्वीच्यापेक्षा आता मी सुखी आहे ते मेंदू नसल्यामुळे. असे सांगतात की नेपोलियन म्हणाला होता, की जो विचार करू शकत असेल तो शिपाई बनू शकत नाही. आणि म्हणूनच आपल्याला माहीत असेल, सैन्यातल्या शिपायाला दारू पाजण्याची पद्धत आहे. त्याची विचारशक्ती मंद व्हावी, कुंठित व्हावी हा त्यातला हेतू. विचार करू लागला, की तो शिपाई राहूच शकत नाही. कार्डिनल ह्यूमन म्हणून एक मोठा निबंधकार झाला फ्रान्समध्ये. त्याने नेपोलियनसंबंधाने एक निबंध लिहिला. त्यात असे लिहिले : त्याला बंदुकीत जी दारू असते, तिचे व्याकरण फक्त येत होते, दुसरे व्याकरण काही कळत नव्हते.पण नेपोलियन स्वतः काय म्हणतो : 'एक हजार तरवारींपेक्षा आपल्याविरूद्ध लिहिणारे एक वर्तमानपत्र जास्त भंयकर आहे.' आज आपण बघतो, जिथे समर्थ हुकुमशाही असेल तिथे भिन्न विचाराला थारा नसतो. राज्यकर्त्यांच्या विचाराहून निराळा, भिन्न विचार व्यक्त होऊ नये, हा सगळ्या हुकुमशहांचा प्रयत्न आहे. त्यांना तलवारीची, शस्त्राची भीती विचाराइतकी वाटत नाही. विचाराची जास्त भिती वाटते. विचारात तलवारीपेक्षा जास्त शक्ती आहे याचे हे प्रत्यंतर आहे. तलवारीत जर जास्त शक्ती असती तर सगळे हुकुमशहा शस्त्रधाऱ्यांना भ्याले असते. आज हुकुमशहा शस्त्रधाऱ्यांना भीत नाहीत. ज्याच्याजवळ विचार असेल त्याची मात्र भिती वाटते. त्या व्हॉल्टेअरच्या संबंधाने एक आख्यायिका आहे. पॅरिस शहरात तो आपल्या घोडागाडीत बसून जाऊ लागला. ऑक्ट्रायच्या नाक्यावर जो चौकीदार होता तो डोकावून त्याच्या गाडीत बघू लागला . म्हणाला, "बघतो आहे, की तुमच्याजवळ ज्याच्यावर कर लागू शकेल अशी काही वस्तू आहे का ?"

व्हॉल्टेअर फार थट्टेखोर होता, विनोदी होता. मिस्कीलपणाने म्हणाला, " माझ्याखेरीज या गाडीत ज्याच्यावर कर लागू शकेल असा कुठलाही जिन्नस नाही. एकटा मीच असा आहे. माझ्या डोक्यातला विचार आज ते सत्ताधारी लोक आहेत, त्यांच्या विचाराहून भिन्न आहे."

म्हणून मला आपल्याला असे सांगायचे आहे. की विचारात भेसळ होऊ देता कामा नये. भेसळ नको याचा अर्थ एकाच विचाराला आपण पकडून ठेवले पाहिजे असा नव्हे. एका विचाराला जो पकडून ठेवतो त्याला विचारच करता येत नाही. भेसळ होऊ देऊ नये याचा अर्थ एवढाच, कुठल्याही विभूतीच्या जीवनाशी, कुठल्याही विभूतीच्या पराक्रमाशी, कुठल्याही विभूतीच्या कार्यक्रमाशी, कुठल्याही विभूतीच्या तत्वज्ञानाशी, विचाराची भेसळ होऊ देता कामा नये. विचार निरपेक्ष आहे. मी आपल्या विचाराची स्वतःच्या जीवनाशी गल्लत करण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे विचार करू शकतो. आपल्याजवळ माझी अशीच विनंती आहे. हा अमूक विचार गांधीच्या तत्वज्ञानाशी-गांधींना तत्वज्ञान असेल तर-गांधींच्या विचारसरणीशी त्यांच्या कार्यक्रमाशी सुसंगत आहे की विसंगत आहे हा विचार चुकीचा आहे, आम्ही जो विचार करतो, आजच्या परिस्थितीत, जागतिक परिस्थितीत आणि राष्ट्रीय परिस्थितीत ज्या समस्या आमच्या समोर असतील त्या समस्या, ते प्रश्न सोडवायला हा विचार उपयोगी आहे की नाही, एवढेच आपल्याला बघायचे आहे, यापेक्षा जास्त नाही. त्यात गांधींची उपयुक्तता असली तर गांधींचा स्वीकार करू. उपयुक्तता नसली तर अव्हेर करणार नाही, धिक्कार करणार नाही; पण स्वीकार करण्याचे कारण नाही.

(क्रांतीच्या संदर्भात)

विज्ञानाचे विमोचक सामर्थ्य

- अ. भि. शहा

प्रा. अ. भि. शहा -

थोर विज्ञानवादी विचारवंत. साहित्य, धर्म समाजशास्त्र इ. विषयावर तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण लेखन त्यांनी केले. मराठीबरोबरच इंग्रजी भाषा व विचारवंत यांचा त्यांनी गाढा व्यासंग केला होता.

भारतीय लोकशाहीला अंधश्रद्धेचे आव्हान, शास्त्रीय विचारपद्धति इ. ग्रंथ रसिकांना उद्‌बोधक ठरले. खालील उताऱ्यातून त्यांनी विज्ञानाचे अपूर्व सामर्थ्य स्पष्ट केले आहे.

हिंदूची परंपरागत जीवनदृष्टि उचलून धरण्याचा प्रयत्न मोठ्या मानभावीपणाने करतांना कांही महाभाग दिसतात. जीवनविषयक महत्त्वाच्या प्रश्नांवर विज्ञानाचे निष्कर्ष काय आहेत हें माहित नसणारे लोक अशा प्रयत्नांना बळी पडतात. म्हणून वर सांगितलेल्या नव्या दृष्टीकोनाची जोपासना करणें अति अगत्याचें झालें आहे. या मानभावीपणाचें आणि तर्कदुष्टतेचें एक उदाहरण देता येईल. कित्येकदा असें म्हटलें जातें कीं, कांही वर्ण दुसऱ्या वर्णापेक्षां श्रेष्ठ आहेत. कारण त्यांच्या नसांतून खेळणारें रक्तच मूलतः निराळें असतें. रक्ताचेहि चार भिन्न प्रकार आहेत असें विज्ञानानेंच सांगितले आहे ना? पण हा युक्तीवाद सर्वस्वी भ्रामक आहे. कारण, माणसाच्या रक्ताचें शास्त्राच्या दृष्टीनें चार प्रकार आहेत हें जरी खरें असलें तरी ते प्रकार एका वर्णाला एक असें वाटून दिलेले नाहींत. एक ब्राम्हण आणि एक शूद्र यांच्या रक्ताचा प्रकार एक असूं शकेल आणि त्याच ब्राह्मणाचा भाऊ अथवा मुलगा यांचे रक्त भिन्न प्रकारचे असू शकेल. तेव्हां व्यक्तीची नैसर्गिक कुवत आणि गुण यांचा जात, वर्ण अथवा वंश यांच्याशी कांहींही संबंध नाहीं असें ठामपणें म्हणता येतें. व्यक्तिव्यक्तींमध्यें जे भेद आहेत त्यांचे एक कारण म्हणजे आनुवंशिकता, की ज्याचा बोध शास्त्रानें होतो, आणि दुसरें कारण म्हणजे परिस्थिति, कीं जिच्यावर माणूस ताबा ठेवू शकतो.

मानसशास्त्र

विश्व आणि विश्वांतील मनुष्याचे स्थान यासंबंधीच्या आपल्या कल्पना आधुनिक विज्ञानानें बदलून टाकल्या आहेत हें आपण पाहिलें. पण हें परिवर्तन येथेंच थांबत नाही, मनुष्याच्या मनोव्यापारावरहि विज्ञानानें प्रकाशझोत टाकला आहे. आपल्या कृतीचा किती तरी भाग असा असतो कीं, ज्या आपण विचारपूर्वक निर्णय घेऊनच केल्या आहेत असें वाटतें, पण वस्तुतः त्यामागील प्रेरणा आपल्या अंतर्मनांत कुठें तरी दडून बसलेल्या असतात, त्या प्रेरणांची आपणांस जाणीवही नसते. मनोविश्लेषणशास्त्रांनें असें दाखवून दिलें आहे कीं, आपल्या वर्तनाचा फार मोठा भाग अबोध अन्तर्मनांतील वासनांकडून प्रेरित झालेला असतो. व्यक्तिच्या मनोव्यापारामागील या प्रेरणा अज्ञात असल्या तरी वैज्ञानिकाला त्या ज्ञात होतात. म्हणून विज्ञानाच्या साहाय्यानें मनाच्या या सुप्त शक्तींना सामाजिकदृष्ट्या इष्ट तें वळण देणें शक्य झालें आहे. सुप्त मनःप्रवृत्तीच्या या ज्ञानाचा आणखी एक फायदा असा झाला कीं, साधु आणि पापी किंवा कायदा पाळणारा जबाबदार नागरिक आणि गुन्हेगार यांच्यातील सीमारेषा तरल आहे हें लक्षात आलें आहे. त्यांच्यातील फरक सामाजिकदृष्ट्या महत्वाचा असला तरी गुन्हेगार मुळांतच वाईट, किंवा पापी मनुष्य जन्मापासूनच तसा असतो असें मात्र नाहीं. म्हणजेच सामाजिक व्यवहारांत सहिष्णुतेची गरज फार मोठी आहे. नीच माणसाच्या निर्लज्जपणाइतकाच सज्जनतेचा दिमाख परिणामी भयंकर असतो. या नव्या मानसशास्त्राच्या मार्गदर्शनानें मनानें अपंग आणि दुर्बल लोकांना सुधारण्याची कांही यशस्वी तंत्रे उपलब्ध झालीं आहेत.

सामाजिक शास्त्रें

सृष्ट घटना आणि मानवी मन एवढ्यापुरतेंच विज्ञान मर्यादित नाहीं. माणसाची 'विचारशील प्राणी' याच्या इतकीच समाजशील प्राणी' ही व्याख्याहि महत्वाची आहे. कारण त्याच्या गुणशक्तींचा अविष्कार समाजाच्या प्रांगणांतच होऊं शकतो. मानवजीवनाच्या सामाजिक अंगांचा अभ्यास करणाऱ्या विज्ञानशाखेस 'समाजशास्त्र' असें म्हणतात. कुटुंबसंस्था, धर्म, शासनसंस्था, अर्थव्यवस्था, राजकीय चौकट, सांस्कृतिक क्षेत्रे इत्यादी समाजजीवनाची सर्व अंगे समाजशास्त्राच्या कक्षेंत येतात. निरनिराळ्या सामाजिक संस्थांचा

एकमेकांवर आणि माणसाच्या व्यक्तित्वावर होणारा परिणाम हाच मुख्यत्वेकरून समाजशास्त्राच्या अभ्यासाचा विषय होय. निसर्गशास्त्रांच्या तुलनेनें समाजशास्त्र हें अगदीं अलिकडचें आहे, पण एकदा वैज्ञानिक पद्धतीनें हें शास्त्र हाताळायला सुरूवात केल्यावर सामाजिक बदल कसकसे होत राहतात यासंबंधीचें कितीतरी, महत्वाचें ज्ञान मनुष्यास प्राप्त झाले. सर्वात महत्वाची गोष्ट लक्षात आली ती ही की कुठलीही समाजव्यवस्था ही सनातन, अपरिवर्तनीय स्वरूपाची नसते. असे समाज होऊन गेले कीं, जेथें स्वयंशासन अगदीं पूर्ण रूपानें प्रकट झालें. तसेच आपला अधिकार ईद्धवरदत्त आहे असें सांगणाऱ्या राजेशाह्या किंवा परोहितशाह्याही होऊन गेल्या. जातिव्यवस्था हीच जिचा कणा आहे अशा समाजरचना झाल्या, आणि सर्व जणांना सर्व बाबतींत समान हक्क देणारेही समाज होऊन गेले.

समाजव्यवस्थेतल्या सर्व स्थित्यंतरांत एक गोष्ट सातत्यानें दिसून येते कीं, जसजशी सामाजिक संघटना आकारानें मोठी आणि भौतिक प्रगतीमुळें अधिक गुंतागुंतीची बनते तसतशी मूठभर लोकांच्या हातीं सत्ता केंद्रित होऊ लागते. समाजाची संघटित सत्ता असणारी शासनसंस्था समाजापासून दुरावू लागते. तथापि आधुनिक तंत्रविद्येचा उदय होण्यापूर्वी प्रजेचें संरक्षण करणें व सर्व कल्याणकारी सुखसोयी वाढविणें याबाबत ज्याप्रमाणे शासनसंस्था फारसें कांही करूं शकत नव्हती, त्याचप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्थानिक गटांचें संघटन यांनाहि तिच्यापासून फारसा धोका नव्हता. पण तंत्रविद्येच्या प्रगतीमुळें मध्यवर्ती शासनसंस्थेच्या हातीं समाजाचें नियंत्रण करण्याची सत्ता प्रचंड प्रमाणादर एकवटली असल्यानें व्यक्तीचें स्वातंत्र्य अतिशय धोक्यांत आलें आहे.

शासनसंस्थेच्या हातीं असलेल्या सर्वसंहारक मानवजातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे याचा मागील प्रकरणांत उल्लेख केला आहे. पण घटकाभर तो धोका नजरेआड केला आणि शासनसंस्था ही लोकांना अधिक सुखसोयी पुरविण्यावर आपलें लक्ष केंद्रित करील असें मानलें तरी त्यामुळें देखील व्यक्तीच्या स्वतंत्र अस्मितेच्या सीमारेषा पुसून टाकून तिला शासनसंस्था अस्तित्वात असेपर्यंत कायम राहील अशी भीती आहे. त्यामुळें व्यक्तीची आणि तिचें स्वातंत्र्य यांना बाधा न आणता तंत्रविद्येनें उपलब्ध करून दिलेल्या कार्यक्षमतेचा व सुखसोयींचा लाभ कसा करून घ्यायचा हाच आजचा यक्षप्रश्न आहे. या प्रश्नापुढें कायमची बंदी घालण्याचा प्रश्न देखील

गौण वाटतो.

माणसाला हा प्रश्न सोडविणे शक्य झालें तर तें फक्त शास्त्राची प्रेरणा व पद्धति यांचा अवलंब केल्यानेंच शक्य होईल. मनुष्य पापांत रुतला आहे आणि म्हणून त्याचा सर्वनाश समीप आला आहे असें सांगणारा प्रेषित आणि ज्योतिषी खूप होऊन गेले. पण आहे त्या परिस्थितींतून मार्ग कसा काढावा हें त्यापैकीं एकानेंहि सांगितलें नाहीं. तें काम विज्ञानच करूं शकेल.

धर्मसंस्था

सामाजिक संघटनांप्रमाणेंच धर्मसंस्थेसारख्या जीवनाच्या सांस्कृतिक अंगांचीही उत्क्रांती झालेली आहे असें दिसतें. कित्येक मानवी समाजांत 'ईश्वर' कल्पनेचा निर्देश करणारा शब्दच नव्हता असें 'मानववंश शास्त्र सांगते. पाऊस, वारा, विजांचा लखलखाट यांना देवता मानून कित्येक समाजांत त्यांचें पूजन केलें गेलें. मृत पूर्वजांची पूजा करणारे आणि कोल्हा, कावळा, सरडा, सांप अथवा काही वृक्ष यांच्यात मृत व्यक्तींचे आत्मे राहातात अशा समजुतीनें त्यांची पूजा करणारेहि होऊन गेले. कांही समाजांत माणसासारखेंच आणि त्याचे सर्व गुणदोष अंगी असलेले निरनिराळे देव कल्पिलें गेले; तर पुढारलेल्या सर्व धर्मानीं, 'अल्ला' सारखा एकच सर्वशक्तिमान् परमेश्वर मानला. पण एकेश्वरवादांतहि अनेक प्रकार आहेत. एका बाजूस माणसासारखाच राग, द्वेष, मत्सर, लोभ यांनी युक्त असा ज्यू लोकांचा 'येहोव्हा' नामक परमेश्वर तर दुसऱ्या टोकास सर्व विकारांपासून अलिप्त अशी हिंदुंची 'ब्रह्म' कल्पना ! बौद्ध आणि जैन धर्माना सृष्टिकर्त्या परमेश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं, पण त्या दोन्ही धर्मात हिंदूंच्या प्रमाणें कर्मसिद्धांत आणि पुनर्जन्म स्वीकारले आहेत. प्रवासवृत्तावरून आणि विद्वानांनी केलेल्या संशोधनावरून धर्मकल्पनांतील विविधता अफाट आहे हें समजतें. त्याचा फायदा असा झाला कीं, कोणालाही स्वतःच्या धर्माबद्दलचा कडवा अभिमान बाळगण्याचें कारण राहिलें नाही. विज्ञान जन्मास येण्याआधी माणसाचा सृष्टीवर ताबा तर नव्हताच, पण आपल्या सभोंवती काय चाललेंले आहे याचें आकलनही त्याला होत नसे. त्यामुळें तो भांबावल्यासारखा होई. अशा वेळी त्याला धीर देणें, दिलासा देणें. सृष्टीत आणि समाजांत आपणाला कांही स्थान आहे अशी जाणीव त्यांच्यात निर्माण करणें, हें काम धर्मसंस्थेनें केलें. वस्तुतत्व अथवा अंतिम सत्य काय आहे

यासंबंधी धर्माधर्मांत कितीही मतभेद असले तरी प्रत्येक धर्माकडून दोन महत्वाची कार्ये बजावली गेली आहेत : (१) **बौद्धिक** : आपल्या 'अनुभवपरिसरांचा अन्वय लावणें सोपें जावें यासाठीं सोईस्कर अशी संदर्भ-चौकट-पुरविणें; आणि (२) **नैतिक** : आयुष्यात निरनिराळ्या प्रसंगी काय करावें आणि काय करूं नये, काय स्विकारावें आणि काय टाळावें हें समजण्यासाठी व त्याच्या अनुरोधानें स्वतःचें आणि इतरांचें वर्तन चांगले अथवा वाईट हें ठरविण्यासाठीं आदर्श आचारांचे विधिनिषेध पुरविणें.

आधुनिक काळांत निरनिराळीं भौतिक शास्त्रें व सामाजिक शास्त्रे यांनी वरीलपैकी पहिली जबाबदारी उचलली असून ती अत्यंत समर्थपणें पार पाडीत आहेत. दुसरें कार्य पार पाडण्यासाठीं नीतीशास्त्र हें एक स्वतंत्र शास्त्र म्हणून आज उभें आहे. **'परलोका' विषयीच्या कल्पनाजालांत न गुरफटता विज्ञानानें सांगितलेल्या सत्याच्या आधारें नीतीशास्त्र हें आज संपूर्णतया ऐहिक बनलें आहे.** धर्मावर आधारण्याची त्याला गरज राहिलेले नाहीं. म्हणून जुन्या धर्मसंस्थेची आज गरज राहिलेली नाहीं असें म्हणायलाही हरकत नाहीं.


नीतीशास्त्र

माणसामाणसांमधील संबंध कसे राहावेत याचा विचार नीतीशास्त्र करते. त्यामुळें या माणसाचा धर्म कोणता व त्याचा कोणता हें नीतीशास्त्राच्या दृष्टीनें गैरलागू आहे. प्रत्येक नागरिकानें कायदा पाळावा किंवा एखादा कायदा गैर वाटत असेल तर शांततापूर्ण मार्गानीं त्याचा निषेध करावा; प्रत्येकानें सत्याची कदर करावी आणि सत्यच बोलावे; लांच देऊं नये आणि घेऊ नये; व्यक्तिनिरपेक्ष मूल्यांच्या सिद्ध्यर्थ किरकोळ वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवावा; इतरांना उपद्रव न देता स्वतः सुखी होण्याच्या प्रत्येक माणसाच्या हक्काचा आदर करावा, इ.- एखादी व्यक्ति हिंदु अथवा मुसलमान, ख्रिश्चन अथवा पारशी आहे याची बिलकुल दखल न घेता वरीलसारख्या गोष्टी प्रत्येकानें पाळाव्या अशीच समाजाची अपेक्षा असते. हीच नीति. नीतीनियमांचें वैशिष्ट्य हें कीं ते सर्वांना सारखेच लागू असतात. व्यक्ति कुठल्याहि समाजांतील असो, कुठल्याहि राष्ट्राची असो, नीतिनियम एकच. मूलभूत मानवी मूल्यें पायदळी तुडविल्याबद्दल चीनचें (कम्युनिस्ट) सरकार आणि दक्षिण आफ्रिकेचें सरकार यांचा आपण निषेध करतो-दक्षिण आफ्रिकेचे राज्यकर्ते स्वतःस ख्रिश्चन म्हणवितात आणि चीनचें राज्यकर्ते निरीश्वरवादी म्हणवतात या गोष्टी त्यांच्या

कृतीच्या नैतिक मूल्यमापनाच्या वेळीं आपण विचारांत घेत नाहीं. वैज्ञानिक ज्ञानामुळें नीतिशास्त्र इहलोकपर झालें आहे आणि त्याच्या इहलोकपरतेमुळें त्यांचें क्षेत्र अखिल मानवजातीला समान झालें आहे.

आजच्या नीतिशास्त्राच्या इहलोकपरतेमुळें नीतिसंबंधी आणखी एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे नीतिनियम हे देखील ऐतिहासिक दृष्ट्या कालसापेक्ष आहेत. सुमारें पंधराशे नियम सांगितलेले आहेत. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें एक त्यांतलें वचन आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये, त्यांना विद्या शिकूं देऊ नये असा त्याचा अर्थ आहे. म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये हें जणूं एक नैतिक मूल्यच होतें. पण आज पंडिता रमाबाई, ॲनी बेझंट, इरावती कर्वे, दुर्गा भागवत या व अशा विदूषींची उदाहरणें समोर असतांना मनूचे आदेश अनैतिक होत असें सांगण्यास कोणीहि कचरणार नाहीं.

(शास्त्रिय विचारपद्धति)



बुवाबाजी आणि समाज

- नरहर कुरुंदकर

प्राचार्य नरहर अंबादास कुरूंदकर (१९३२-१९८२) वाङमय, तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र या विषयावर त्यांनी आपल्या स्वतंत्र शैलीतून विचारप्रवर्तक लेखन केले. चिकित्सक अभ्यासक, बहुश्रुत समीक्षक, पुरोगामी विचारवंत ही त्यांची ख्याती आहे.

रूपवेध, जागर, मागोवा, शिवरात्र, भजन, यात्रा, धार आणि काठ हे त्यांचे ग्रंथ आणि अनेक ग्रंथांना लिहिलेल्या त्याच्या प्रस्तावना हा मराठी भाषेचा अमोल ठेवा आहे. खालील उताऱ्यातून त्यांनी समाजातील बुवाबाजीचे विवरण केले आहे.

साधुसंतांकडून जे चमत्कार केले जातात त्याचे स्वरूप ठरलेले आहे. काहीजण समाधी घेणारे आहेत. ते महिना, दोन महिने, चार महिने समाधी घेण्याचा चमत्कार दाखवीत असतात. अनुभव असा आहे की, ही समाधी घेणारी मंडळी चिकित्सक प्रयोग करणाऱ्या अभ्यासकांच्या समोर आपल्या समाधिशक्तीचे प्रदर्शन करण्यास तयार नसतात. काही महिन्यांपूर्वी विदर्भात अशाच एका साधूने तीस दिवसांची समाधी घेण्याची घोषणा केली. ही समाधी आपण सर्वांच्यासमोर घेण्यास तयार आहे असेही त्याने सांगितले. ह्या दृष्टीने साधुमहाराजांच्यासाठी एक काचेचे घरही तयार करण्यात आले. ह्या समाधीच्या दृष्टीने करारमदार झाले. तीस दिवसांपर्यंत काचेच्या घरात बाबांनी समाधी लावून बसावे, ह्या काचेच्या घरात हवा असणार नाही, इतरांनी बाहेरूनच काय निरीक्षण करावयाचे ते करावे अशा प्रकारे करार ठरला. ऐन वेळी ह्या साधुमहाराजांनी काचेच्या घरातून हवा काढून घेण्यास विरोध दाखविला. प्रयोगात ही समाधी घेणारी माणसे उघडी पडतात. तरी समाधी घेणे हा लोकप्रिय प्रयोग आहेच. दुसरा लोकप्रिय प्रयोग अस्तित्वात नसलेल्या वस्तू काढून दाखविण्याचा आहे. कुणी रिकाम्या भांड्यातून कुंकू काढतात, कुणी रिकाम्या कलशातून भस्म, अबीर-बुक्का काढतात, काहींची हवेत हात फिरवून घड्याळे व मंगळसूत्रे काढण्याबद्दल ख्याती आहे.

हे सर्व चमत्कार सिद्धीच्यामुळे शक्य होतात आणि या सर्व सिद्धी योग्यांना हस्तगत करता येतात, म्हणून कोणत्या योग्याला कोणती सिद्धी हस्तगत होते आणि कोणती योगसाधना केली म्हणजे कोणती सिद्धी हस्तगत होते याविषयी योगशास्त्रावरील ग्रंथांत पुष्कळच माहिती दिलेली असते. म्हणून सिद्धी योगसाधनेमुळे निर्माण होतात, असे धर्मपरंपरेचे मत आहे. या सिद्धीच्या आहारी जाऊ नये, त्यांची उपासना करू नये, या सर्व सिद्धी क्षुद्र आहेत. सिद्धीचा मोह टाळावा. जो सिद्धीचा मोह टाळू शकतो तोच मोक्षाला जातो. उरलेले जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकून पडतात असेही धर्मपरंपरेचे मत आहे. ज्ञानेश्वरादिक वारकरी साधु-संतांनी, चक्रधरादिक महानुभावपंथ प्रवर्तकांनी, मुकुंदराजादी मंडळींनी, असे शेकडो साधु-संतांनी चमत्कारखंडन केलेले आहे. माणसाने सिद्धीच्या मागे लागू नये. सिद्धी-साधना करू नये. या साधनांच्यामुळे मोक्ष-साधना खंडित होते. माणसाचा अधःपात होतो. जो सिद्धी-चमत्काराच्या जाळ्यात अडकेल तो जन्ममृत्यूच्या चक्रतून सुटू शकत नाही, असे साधुसंतांनी अनेकवार सांगितलेले आहे. ज्यांच्याजवळ खरोखरी धर्मभावना आहे ते नेहमीच या चमत्कारवादाचे विरोधक राहिले. जो चमत्कार करून शिष्य गोळा करतो त्याचा संतवाङ्मयात धिक्कार आहे. चमत्कार करणाऱ्यांना गुरू करू नये, इतरांना सिद्धी-साधना करू देऊ नये, चमत्कार करणाऱ्या गुरूचे तोंड पाहू नये असे वारंवार सांगितलेले आहे. शतकानुशतके अनेकांनी सिद्धींना व चमत्कारांना विरोध केला असला तरी अनेकांना या सिद्धींचे व त्यांतून साधल्या जाणाऱ्या चमत्कारांचे आकर्षण असते. चमत्कार करणाऱ्या साधूंजवळ काही दैवी शक्ती असते व अशा साधूंची भक्ती केली, त्यांचे भजनपूजन केले की आपले हित होते; आपल्याला जर धार्मिक व्हायचे असेल तर अशा साधूंची भक्ती केली पाहिजे असे अनेकांना वाटत असते.

ही माणसे खऱ्या अर्थाने धार्मिक नसतात. ती सोयीस्कर असेल तितकेच धार्मिक आणि सोयीस्कर असेल तितकेच अधार्मिक असतात. म्हणूनच परीक्षेत पास होणे हे मनाशी बाळगून असा धार्मिक माणूस देवाला नवस करीत असतो. तो अर्धवट वाक्य बोलतो - "देवा मला पास कर, मी तुला पेढे वाटीन" असे तो म्हणतो पण कधी काळी जर या धार्मिक माणसाला प्रामाणिकपणे पूर्ण वाक्य बोलावे लागले तर त्याची अडचण होईल; पूर्ण वाक्यात मूळ मुद्दा असा मांडावा लागेल, "हे प्रभो, मी वर्षभर अभ्यास केलेला नाही. जर वर्षभर अभ्यास केला

असता तर तुझ्या साह्याची गरज नव्हती, पण अभ्यास न करणे ही चूक घडून गेली. देवा, तुझे काम हे की अशा चुकीबद्दल तू आम्हांला शासन तर करूच नकोस, पण चुकीवर पांघरूण घालून तू पारितोषिक द्यावेस. म्हणजे पास करावेस. अशा प्रकारे पारितोषिक देण्याची बुद्धी तुला व्हावी म्हणून आम्ही तुला नैवेद्याच्या रूपाने पाच-दहा रुपयांची लाच द्यावयास तयार आहोत. लाच खाऊन काम करण्याचा हा पृथ्वीवरील नियम देवा तू पाळलाच पाहिजेस. कारण तू लाचखाऊ नसशील तर तुझा आम्हांला उपयोग काय? खरे म्हणजे तू लाचखाऊ आणि बावळट असावयास पाहिजेस. कारण शेवटी तुझ्या नावे वाटण्यात येणारे पेढे आम्हीच खाणार आहोत. ते तुला पोहोचले असे तू मानायला शिकले पाहिजेस." अशा भक्तमंडळींच्या मनांत हे असते, पण इतके सत्य देवाशीसुद्धा बोलण्यास ते तयार नसतात.

आणि असे लोक तरी धर्माकडे कशाला जातात? त्यांना वासना आणि स्वार्थ सोडावयाचा असतो, उदात्त आणि पवित्र व्हावयाचे असते, म्हणून ते धर्माकडे जात नाहीत. या लोकांना देवही शरीराच्या सोयीसाठी हवा असतो. कुणाला नोकरी हवी असते, कुणाला बढती हवी असते, कुणी काळाबाजार करून अडकलेला असतो, अपव्यवहार करणारा असतो. त्यातून त्याला सुटावयाचे असते. कुणाला नोटा दुप्पट करून हव्या असतात. रोगमुक्ती हवी असते, आणि बहुतेकांना विविध प्रकारची पापकृत्ये करण्यात जन्म जात असल्यामुळे सदसद्विवेकबुद्धीची टोचणी लागलेली असते; पाप करणे न सोडता पापामुळे जो लाभ झाला असेल तो लाभ न सोडता जर स्वतःच्याच विवेकबुद्धीच्या टोचणीतून मुक्त व्हावयाचे असेल तर अशा चमत्कार करणाऱ्या साधुसंतांना शरण जाण्याइतका सोपा दुसरा मार्ग नसतो. माणसे धार्मिक प्रवृत्तीची असल्यामुळे चमत्कारप्रधान बुवाबाजीच्या मागे लागतात, अशी वस्तुस्थिती नसून खरी धार्मिक प्रवृत्ती नसल्यामुळे व धर्म आपल्या भ्रष्टतेला सहकार्य देईल अशी आशा वाटत असल्यामुळे चमत्कार व बुवाबाजी यांच्यामागे लागतात.

साधुसंत जे चमत्कार दाखवतात ते खरोखरीच घडू शकतात काय ? या साधुसंतांजवळ खरोखरीच सिद्धी असतात काय ? या चमत्कार करणाऱ्या मंडळींनी कधी समाजाचे कल्याण केलेले आहे असा दाखला मिळत नाही. समजा एक माणूस जमिनीवरून चालल्याप्रमाणे पाण्यावरून चालतो, ही गोष्ट आपण खरी गृहीत धरली तरी त्यामुळे समाजाचे कोणते हित होणार आहे ?

नद्या ओलांडण्यासाठी तुम्हांला नावा लागणारच. समुद्र प्रवासासाठी जहाजे लागणारच.

एखाद्या वर्षी पाऊस न पडल्यामुळे प्रचंड दुष्काळ असतो. अशा वेळी पाण्याशिवायच माणसे तडफडून मरण्याची वेळ असते. कुणाही साधुसंताने दुष्काळग्रस्त प्रदेशात जाऊन आपल्या सिद्धीच्या जोरावर कोरड्या विहिरी पाण्याने भरून दिल्याचा दाखला नाही. अति पावसामुळे पिके वाहून जातात, कोणत्याही संताने अशा वेळेला येऊन पाऊस थांबविल्याची उदाहरणे नाहीत, किंवा पिकेही वाचविलेली दिसत नाहीत. असल्या प्रकारच्या चमत्काराच्या नोंदी पुराणातच आढळतात. वर्तमानकाळात अशा कोणत्याही नोंदी दिसत नाहीत. कधी या चमत्कार करणाऱ्या मंडळींनी आपले सामर्थ्य समाजाच्या अगर देशाच्या कल्याणासाठी वापरलेले आढळून येत नाही. कारण त्यांच्याजवळ असे कुठलेही सामर्थ्य नसते. म्हणून अशा साधुसंतांच्या नादी लागण्यात व्यक्तींचा किंवा समाजाचा कुठलाही फायदा नसतो. तसेच हे खरे धर्माचरणही नव्हे.

संत आणि चमत्कार

- निर्मलकुमार फडकुले

डॉ. निर्मलकुमार जीनदासशास्त्री फडकुले - मराठीचे नामवंत प्राध्यापक. संतवाङमय तसेच अव्वल इंग्रजी काळातील प्रबोधनपर साहित्यावर प्रभावी बोलणारे रससिद्ध वक्ते.

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व, संत तुकाराम, हिरव्या वाटा, काही रंग काही रेषा हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरीचे अध्याय, लोकहितवादींचे निबंध यांच्या साक्षेपी संपादनातून त्यांची चिंतनशीलता, बहुश्रुतता व प्रासादिक शैलीचा प्रत्यय येतो. खालील उताऱ्यातून त्यांनी संतांच्या तथाकथित चमत्कारावर मार्मिक भाष्य केले आहे.

परवा एका सभेत संतांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कार्याबद्दल मी बोललो. भाषण संपल्यानंतर एक भाविक गृहस्थ तावातावानं व्यासपीठावर येऊन मला म्हणाले, 'तुम्ही आमच्या भावना दुखावल्या आहेत. आमच्या श्रद्धास्थानांवर तुम्ही आघात केलेला आहे.' मी विचारलं, 'नेमकं काय झालं ते सांगाल काय?' तेव्हा अधिकच आवेशाने ते बोलू लागले, 'संतांनी कसलेच चमत्कार केले नाहीत असे सांगून तुम्ही संतांचं अवमूलन केलं आहे. आम्हा भक्तांच्या भावना दुखावण्याचं पातक तुम्ही करीत आहात. हे आम्ही सहन करणार नाही.' सद्‌गृहस्थ बरेच अस्वस्थ झालेले दिसले. पण खरं सांगायचं तर माझ्या संपूर्ण भाषणात कोणालाही खुपण्यासारखा किंवा कोणाचा अनादर करणारा असा विचार मुळीच नव्हता. माझ्या मते मी संतांच्या कार्याविषयी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आत्मीयतेनंच बोललो होतो. पण माझा दृष्टिकोण विभूतिपूजकाचा मात्र नव्हता. संत कार्याची चिकित्सा बुद्धिवादी भूमिकेवरूनच करण्याचा मी प्रयत्न केला होता. या भाविकांच्या भावना का दुखावल्या जाव्यात हे कोडे मला नीटसे उलगडले नाही. सध्या भावना दुखावल्या जाण्याचं प्रस्थ फार वाढलेलं दिसतं. काहीतरी बोलायला जावं आणि कुणाच्या तरी अतिनाजूक भावनांना कळ यावी असा काळ आलेला आहे. लोकांची भावनिक प्रकृती अशी तोळामासा का बरं झाली असावी? फार जपून बोलायला हवं.

'आजचा चहा चांगला झाला नाही' असं मत नवऱ्यानं व्यक्त केलं की,

बायकोच्या नाजूक भावना दुखावल्या जातात. म्हणून समस्त नवरेमंडळींना त्यांच्या हिताचा सल्ला देतो की, 'बंधूनो! चहा वाईट असला तरी तो मुकाट्यानं प्रसन्न चेहऱ्यानं पिऊन टाका, खरं बोलण्याचा वेडेपणा करू नका. नाहीतर पत्नीच्या कोमल भावना एकदम दुखावतील बरं! चहा बेचव झाला, अगदी कोयनेलसारखा लागला तरी काही आकाश कोसळून पडत नाही. सहन करायला शिका. नवऱ्याच्या जातीनं कसं सहनशील असायला हवं. काहीतरी फटकन बोलाल आणि चटकन् भावना दुखावून टाकाल.' हे थोडं विषयांतर झालं खरं.

संतांकडे चमत्कारांच्या चष्म्यातून न पाहता चिकित्सेच्या दृष्टीतून पाहा, अशा अर्थाच्या माझ्या विधानामुळं तो गृहस्थ माझ्यावर चिडला होता. आता या भाविकाशी कोणत्या पद्धतीनं वाद करायचा? वादविवादाच्या आखाड्यात उतरून दोन हात करण्याची बौद्धिक मस्ती त्याच्यात मुळीच नव्हती. संतांविषयी परंपरेने चालत आलेल्या दंतकथा आणि आख्यायिका म्हणजे निखळ सत्य आहे, असे डोळे झाकून गृहीत धरणारा तो एक भोळसट श्रद्धाळू भक्त होता. साधूसंतांचं सामर्थ्य त्यांनी केलेल्या चमत्कारातच असतं याबद्दल त्याच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती. असल्या निःशंक झालेल्या माणसाच्या हाडीमासी खिळून राहिलेल्या भ्रांतिष्ट कल्पना कुणालाच नाहीशा करता येणार नाहीत. इथे वाद करण्यात काहीच अर्थ नव्हता. वादसुद्धा कुणाशी आणि किती करावा याचे तारतम्य नसेल तर वादातून तत्त्वबोध होण्याऐवजी 'शीर्षभेद' व्हायला वेळ लागत नाही. अशाच एका सभेत स्वतःला 'भगवान' असे संबोधून घेणाऱ्या एका 'साधू' चा उल्लेख मी 'आचार्य' असा करताच त्या भगवानाचे दोन शिष्योत्तम तत्परतेने माझ्या अंगावर चालून आले, आणि आपल्या 'सात्त्विक' आवाजात गुरगुरून म्हणाले,

'आचार्य नव्हे, भगवान म्हणा. आमचे गुरू साक्षात् भगवान आहेत. त्यांना आचार्य म्हणून तुम्ही आमच्या भावना दुखवीत आहात.' मीसुद्धा त्या थोर शिष्यांना माझ्या अतिसात्त्विक स्वरात ठणकावून सांगितलं, 'त्यांना तुम्ही भगवान म्हणा, नाहीतर परमेश्वर म्हणा! मी त्यावर आक्षेप घेत नाही. पण मी मात्र त्यांना आचार्यच म्हणेन, आचार्य हा सुद्धा काही सामान्य शब्द नाही. पुष्कळच बहुमानाचा द्योतक आहे. पण काय वाटेल ते झालं तरी 'भगवान' मात्र म्हणणार नाही. मग तुमच्या मृदु मृदुल भावनांचा चोळामोळा झाला तरी

मला पर्वा नाही.' माझ्या या नितांत सात्विक उत्तरामुळे ते शिष्यवर नाराज झाले. दुखावलेल्या भावनांवर फुंकर मारीत स्वस्थ बसून राहिले. साध्या, सरळ निरुपद्रवी अशा उल्लेखांमुळे देखील भावनेचा चिमटा बसावा हा काय चमत्कार आहे! याचा अर्थ कोणी आपली प्रामाणिक मते निर्भयपणे व्यक्त करूनच नयेत काय? की केवळ सांकेतिक सनातन विचारांचेच समाजाने अष्टौप्रहर रवंथ करीत बसावे? असल्या चर्वितचर्वणातून कोणता रस निर्माण होणार आहे? भिन्नभिन्न विचारांचे, कल्पनांचे स्वैर वारे समाजात मनमोकळेपणाने वाहत राहिले पाहिजेत. समाज म्हणजे जड, निर्जीव मने असलेल्या लोकांचा कळप नव्हे. जिवंत माणसांचा, स्वतंत्र इच्छाशक्ती असलेल्या सुबुद्ध लोकांचा समूह म्हणजे समाज. विचारांची आणि मतांची ठेकेदारी कोणा एका व्यक्तीकडे किंवा गटाकडे असूच शकत नाही. या भाविकाचे मन का दुखावले गेले? पारंपारिक मत मी मांडले नाही म्हणूनच ना! मी त्या वर उल्लेखिलेल्या सभेत म्हणालो होतो-

'संतांच्या जयजयकारातून रंगून गेलेल्या भक्तांनी संतांची रसमय श्रेष्ठ कविता कितपत वाचली आहे, याची मला कल्पना नाही. कित्येकांच्या घरी 'ज्ञानेश्वरी' असते, नामदेव-तुकारामाची गाथा असते. तिला दररोज फुले वाहून, हळद-कुंकू लावून तिची पूजा केली जाते. संतांची महती गाताना हे भाबडे लोक त्यांनी केलेल्या ऐकीव चमत्कारांची कथा सांगतात. संत काय जादुगार होते? अहो, आमच्यासारखीच ही हाडामासाची माणसं होती. सुख-दुःखांच्या भोवऱ्यात आमच्यासारखेच हे संतही एके काळी फिरत होते. आमच्यासारखाच त्यांनाही कित्येक वेळा आयुष्याचा वैताग आला असेल, आम्ही पावलोपावली वाट चुकतो, ठेचकाळतो, त्यांची वाट तशीच चुकली असेल. पण हरवलेल्या वाटा चिकाटीनं शोधण्याचं फार मोठं कार्य त्यांनी केलं आणि ती वाट आम्हाला दाखवली हाच खरा चमत्कार आहे. 'भिंत चालवणं' किंवा 'सदेह वैकुंठाला जाणं' असल्या गोष्टीचा चमत्कार कधी घडला की नाही या विचारांत कसलंही तथ्य नाही. भाबड्या लोकांच्या कल्पनाविलासात अद्‌भुतरम्यता असते. त्यात कर्तव्यबुद्धीला अवसर नसतो. काहीतरी चमत्कार करून, नजरबंदी करून संतांना लोकप्रियता मिळवायची नव्हती. लोकांच्या मागे आशाळभूतपणे धावणारे ते राजकारणी लोकनेते नव्हते. लोकांच्या मनांत आपल्या अनुभवांतून काही उदात्त निष्ठांची पेरणी करणारे ते विचारवंत होते. संत हा चमत्कार करणारा

गारुडी नसतो. तो माणसाला माणुसकी शिकवणारा माणूस असतो.'

आता माझ्या या विधानात एखाद्या भाविकाच्या भावना दुखण्यासारखं खरोखर काही आहे का? पण त्या गृहस्थानं आपली नापसंती व्यक्त करून म्हटलं, 'तुम्ही शिकलेले लोक, स्वतःला फाजील शहाणे समजता. अरे, तुकोबारायाच्या अभंगांची वही तेरा दिवस इंद्रायणीच्या तळाशी भिजत पडली होती. प्रत्यक्ष परमेश्वरानं ती काढून दिली. म्हणून तर तुमच्यासारखे लोक आज तुकोबाचे अभंग वाचू शकतात. संत म्हणजे तुमच्या-आमच्यासारखी माणसं नव्हतीच मुळी. ते देवांचेच अवतार होते. तुमच्यासारख्यांची व्याख्यानं ऐकण्यापेक्षा भजन करीत बसणं चांगलं!' हा सद्‌गृहस्थ आता फारच व्याकुळ झाला होता. त्याच्या अभंग श्रद्धेला मी नकळत हात घातला होता. अखेर त्याची कशीबशी समजूत काढून मी त्याला म्हणलो,

'दुसऱ्याचं बोलणं आपल्याला पटलं नाही तर तसं सांगण्याचा आणि स्वतःचं म्हणणं मांडण्याचा तुम्हाला जरूर अधिकार आहे. पण आपल्याला न पटणारं दुसऱ्याचं मत शंभर टक्के चुकीचंच आहे हा आग्रह कशासाठी धरता? ज्या संतांवर तुमची श्रद्धा आहे त्या ज्ञानोबा-तुकोबांनीसुद्धा असला दुराग्रह कुठेच धरला नाही. तुकोबा तर चक्क सांगतात- 'सत्य असत्यासी, मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।' जे आपल्याला सत्य वाटलं ते त्यांनी मनःपूर्वक झडझडून सांगितलं. बहुमत आपल्या विरोधी आहे की काय याची त्यांनी कधीच कदर केली नाही. बहुमताच्या बुजगावण्याला भीक घालायला या संतांना एखादी निवडणूक लढवायची नव्हती. ते हृदयाला पटले ते फटकळपणानं सांगताना कुणाच्या भावना दुखतील म्हणून त्यांनी कधी माघार घेतली नाही. संतांच्या सांगण्यात नावीन्य होतं, बंडखोरी होती आणि सात्त्विक बुद्धी होती. आयुष्याच्या वणव्याचे त्यांनीही चटके सहन केले होते. त्यातूनच त्यांचं तत्त्वज्ञान तावूनसुलाखून बाहेर पडलं होतं. माझ्या दृष्टीनं संतांचं मोठेपण यातच सामावलं आहे.' माझं म्हणणं त्या भाविकाला पटेल अशी माझी अपेक्षाच नव्हती. काही माणसं केवळ रूढ झालेल्या, गतानुगतिक कल्पनांची पोपटपंची करीत बसतात. तो भाविक मनुष्य कदाचित अशिक्षित असेल. पण सुशिक्षित लोकांतसुद्धा आत्यंतिक भाबडेपणाचे रोगट जंतू कमी असत नाहीत. सभेत बुद्धिवादावर विद्वत्ताप्रचुर व्याख्यान देऊन स्वतःला बुद्धिवादाचा गड्डा समजणारा तथाकथित विचारवंत नित्यनेमाने अंगारे-धुपारे करताना दिसतो तेव्हा काय करायचे? याचा

अर्थ त्यांना धड बुद्धीही नसते आणि धड अज्ञानी भोळसटपणाही नसतो. हे मध्येच कोठेतरी लोंबकळत असतात. माझा एक मित्र एका नामांकित कॉलेजात विज्ञानशास्त्राचा प्राध्यापक आहे. आपल्या आजारी पडलेल्या मुलाला डॉक्टरांचं औषध देताना कुठल्याशा बुवाच्या पायाचं तीर्थही भाविकपणानं पाजायचा. आता या सुशिक्षित मूर्खपणाला काय म्हणायचं? मी त्याला चिडून या कृत्याबद्दल जाब विचारला. हा महान प्राध्यापक माझ्या अज्ञानाची कीव करीत महणाला,

'तुझ्यासारख्या संशयात्म्याला हे कळणार नाही. साधु-पुरुषांच्या चरणोदकात एक दैवी सामर्थ्य असतं. डॉक्टरांचं औषध गुणकारी असलं तरी संतमहंतांच्या आशीर्वादाशिवाय गुण येत नाही. मुलाच्या आजारावर मी दोन्ही बाजूंनी चढाईचा व्यूह रचला आहे. एका बाजूला डॉक्टर तर दुसऱ्या बाजूला आमचे पूज्य बुवा. आता यम आला तरी त्याच्या बापाची भीती नाही. बुवांच्या तीर्थात सर्व रोग नाहीसे करण्याची शक्ती आहे, अशी माझी श्रद्धा आहे. पण ते तुला अधार्मिकाला कसं रे कळायचं?' हा अजब युक्तिवाद ऐकून मी माझ्या कपाळावर हात मारून घेतला. अशा लोकांना उपदेश करण्याचा जो प्रयत्न करतो त्याच्यासारखा दीडशहाणा कोणी असेल का? 'नॉलेज कम्स, बट विजडम लिंगर्स'. ज्ञान लाभले तरी शहाणपणा यायला बराच वेळ लागतो, असं टेनिसन् कवीनं म्हटलं आहे याची या ठिकाणी मला आठवण झाली. पाय धुतलेल्या पाण्यात पावित्र्य आणि रोगनाशक शक्ती सामावलेली असते हा भयानक गैरसमज लाखो लोकांच्या डोक्यात आहे, तो कसा काढावा हेच समजत नाही. या पाण्याला 'तीर्थ' म्हणण्याचा वेडेपणा माझा हा प्राध्यापक मित्रही करीत होता. अशा स्थितीत मघाच्या त्या भाविक भक्ताला दोष तरी कसा द्यायचा? उगीच कुणाच्या भावना कशाला दुखवावयाच्या? भावना, श्रद्धा, संस्कृती, परंपरा वगैरे गुळगुळीत शब्दांचा नेमका अर्थ तरी काय करायचा हेच आताशा समजेनासे झाले आहे. माझ्या पदवीधर सुशिक्षित मित्रापेक्षा आमचा संत तुकोबा निश्चितच कमी शिकला होता. शाळा कॉलेजची पायरी त्याला चढता आली नाही. पण ज्ञानाची आणि कवित्वाची उंच पायरी आपल्या अनुभवाच्या बळावर तो निर्विवादपणे चढून गेला. कळसावर जाऊन बसला. आपल्या तीर्थोकदावर, तीर्थयात्रांवर तो बुद्धिवादी कवी आणि संत तुटून पडला आहे. अंगारे-धुपारे देणाऱ्या बुवाबाजीवर त्याच्या तेजस्वी वाणीचा चाबूक

कडाडला आहे. एका कीर्तनात तुकारामाची दिव्य वाणी बोलून गेली,

डोई वाढवूनि केश । भूते आणीती अंगास
तरी ते नव्हती संतजन । तेथे नाही आत्मखूण
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नाना परी
तुका म्हणे मैंद । नाही त्यापाशी गोविंद ॥

भोळी भाविकता कुणाच्याही पायावर लोटांगण घेते, कुणाच्याही पायावर डोके ठेवायला डोके लागत नाही. डोक्यात भरलेला अंध-श्रद्धेचा कचरा हेच मुख्य भांडवल. ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे संत असल्या निर्बुद्ध प्रवृत्तींवर वैचारिक हल्ले चढवतात व समाजाला नव्या वाटा दाखवतात यातच त्यांचे खरं संतत्व आणि महत्त्व साठवलेलं आहे. त्यांच्या चरित्राभोवती अतर्क्य, अशास्त्रीय चमत्काराचं जाळं विणीत बसण्याचं काहीच कारण नाही. आता राहिला मुद्दा भावना दुखविण्याचा. आपल्या अंतःकरण प्रवृत्तीला जे प्रशस्त, हितकारक वाटतं ते बोलून दाखवण्याचा, लिहिण्याचा अधिकार जन्मदत्त आहे. अतिहळव्या लोकांनी वाटल्यास आपल्या भावनांचा विमा उतरवून घ्यावा. पण बुद्धीचा किरण एखाद्या भाबड्या भावनेच्या जिव्हारी घुसला तर त्यात हळहळण्याचं काहीच कारण नाही. अज्ञानाची आणि अंधश्रद्धांची कात गळून पडावी यासाठीच विचारांची लढाई सामर्थ्य एकवटून लढायची असते. ती अखंड लढत राहिली पाहिजे. संस्कृतीच्या व ज्ञानाच्या प्रगतीचं रहस्य या लढाईतच आहे.

'दुरितांचे तिमिर जावो' याचा अर्थ अज्ञानाचा अंधार नाहीसा होऊन नव्या ज्ञानाचा, बुद्धिनिष्ठेचा प्रभाव पडत जावो, असाच करावा लागेल. कीर्तनाच्या रंगात देहभान हरपून नाचणारा नामदेव 'ज्ञानदीप लावू जगी' असंच म्हणतो. पंजाबपर्यंत जाऊन त्यानं ज्ञानाची पताका फडकावली हा चमत्कार नव्हे का? पंढरीपासून पंजाबपर्यंत गेलेला हा नामा शिंपी ज्ञानभक्तीच्या सुईदोऱ्यानं समाजाचं फाटलेलं मन शिवत होता. त्याला टाके घालत होता. हा काय लहान चमत्कार आहे? आपल्या आयुष्याचा माळ फुलावा, व्यर्थ वारीत वेळ दवडू नका असं म्हणणारा सावता माळी एक चमत्कारच करीत नव्हता काय? संतांनी केलेल्या याच चमत्कारांवर माझे प्रेम आहे. प्रत्येक युगातले खरे संत असेच चमत्कार करीत असतात. पण कशाला चमत्कार म्हणावं हे भल्याभल्यांना अजून समजत नाही याचाच मला चमत्कार वाटतो.

कथा सत्यनारायणाची

- भीमराव कुलकर्णी

डॉ. भीमराव बळवंत कुलकर्णी - (१९३३-१९८७)

मराठीचे नामवंत अध्यापक. साहित्यविषयक चळवळीतील आघाडीचे नेते. एस्. पी. कॉलेज, मॉडर्न कॉलेज, एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ (मराठी विभाग प्रमुख) तसेच साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष. स्वतंत्र आणि संपादित असे ८० ग्रंथ प्रकाशित.

शास्त्रीय मराठी व्याकरण, भाऊसाहेबाची बखर, रसास्वाद, साहित्यिकी, हरिनारायण, स्त्रीफळा (कथा), स्वामी विवेकानंद (चरित्र) हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाह व कार्याध्यक्ष म्हणून यशस्वी कामगिरी पार पाडली. खालील उताऱ्यात सत्य नारायणाच्या कथेचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे.

सत्यनारायणाच्या पूजेचा प्रकार या देशातला अगदी अलीकडचा आहे आणि त्याचा पारंपारिक हिंदुधर्माशी काहीही संबध नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. शंभरसव्वाशे वर्षापूर्वी एका मुसलमानाच्या पीराची पूजा बंगालमध्ये हिंदू आणि मुसलमान या दोहोंमध्ये मोठ्या भक्तिभावाने केली जात होती. 'सत्यपिरेर पूजा' या नावाने ती ओळखली जात होती. या पूजेच्या निमित्ताने सारे लोक एकत्र येतात, एकमेकांत मिसळतात, स्पर्शास्पर्शाच्या विचारापासून या ठिकाणी ते मुक्त असतात, प्रसाद भक्षण करीत असतानाही हिंदुधर्मात मध्यंतरी दृढमूल झालेल्या रोटीबंदीचा विचार कोणाच्या मनात येत नाही, हिंदूत असे का असू नये असे कोणा तरी एका हुशार ब्राम्हणाला वाटले. आणि त्याने 'सत्यनारायणाची पोथी' तयार करून या प्रथेचे हिंदूंमध्ये बीजारोपण केले. दहापंधरा वर्षापूर्वी संतोषी माँची पूजा जशी वणव्यासारखी देशभर पसरली तशीच हीही कथा सव्वाशे वर्षापूर्वी देशभर एखाद्या झंझावाताप्रमाणे पसरली. प्रसाद भक्षणाच्या आणि लोकसंघटनेच्या सुधारकांनी त्याचे स्वागत केले आणि पोथीच्या रूपाने या पूजेमध्ये जे एक सनातन धार्मिक वातावरण निर्माण केले होते, त्याचे साऱ्या सनातनी समाजाला आकर्षण वाटले. १८८६ मध्ये प्रसिद्ध

सनातनी पुढारी विश्वनाथ नारायण मंडलिकांना पहिल्यांदा अशी पूजा एका ठिकाणी पाहावयास मिळाली तेव्हा ते चक्रावून गेले. त्यांनी आपल्या कारकुनाला पत्र लिहिले की,

"माझ्या माहितीत गेल्या ४५ वर्षात अशी पूजा कधी पाहिली नाही. ती या महिन्यात कोणी आणि कोणत्या आधारावर चालू केली, ते कळवावे."

बिचारा कारकून काय कळविणार होता ? त्याच्या बुद्धीच्या व शक्तीच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट होती ! बघता बघता ही पूजा महाराष्ट्रात घरोघरी पसरली. इतकेच नव्हे तर लग्न झाल्यावर निरनिराळ्या जातीजमातींमध्ये ज्या धार्मिक रीती होत्या त्या मागे पडून, त्याऐवजी एक सत्यनारायण घातला की संपले, अशी प्रथा पक्की होऊन गेली बरे, ही पूजा अगदी सोपी, तिला मुहूर्त लागत नाही. ब्राम्हणभोजन लागत नाही, दानदक्षिणा द्याव्या लागत नाहीत. होमहवन नाही, वैदिक मंत्रतंत्र नाहीत. वेदोक्ताची भांडणे नाहीत. स्नानसुद्धा करण्याची गरज नाही ! ज्याने त्याने आपल्या ऐपतीप्रमाणे सव्वाशेरापासून सव्वाखंडीपर्यंत प्रसाद करावा, पूजा करावी. पूजेनंतर नृत्यागायनादी हवे ते करमणुकीचे कार्यक्रम करावेत ! 'सपादंभक्षभक्त्या नृत्यगीतदिकं चरेत् !' असे मुळी पोथीत लिहून ठेवले आहे. त्यामुळे आज सत्यनारायण म्हणजे 'सांस्कृतिक एकात्मते' चे एक महत्वाचे साधन बनले आहे.

परंतु सत्यनारायणपूजेची म्हणून जी एक पोथी निर्माण केली गेली आहे, तिच्यामध्ये प्रत्येक अध्यायाच्या शेवटी ही कथा स्कंद पुराणातील रेवा खंडात असल्याचे सांगितले आहे. ही एक प्रकारची मनोरम क्लृप्ती आहे. स्कंद पुराणामध्ये ही कथा असण्याचे कारण नाही. ही कथा म्हणजे एक प्रकारचे काम्य व्रत आहे. सत्यनारायणाची पूजा केल्याने इच्छिलेले सारे काही मिळते याचे आमिष आहे आणि तिच्याकडे दुर्लक्ष केल्याने हा देव आपले वाटोळे करील अशी उत्तरार्धात धमकी आहे. सत्यनारायणाच्या कृपाप्रसादानें दरिद्री ब्राम्हण व भोळीविक्याचे कल्याण कसे झाले, ते पूर्वार्धात सांगून साधुवाणी व अंगध्वजराजा यांनी पूजेची कदर न केल्याने त्यांच्यावर कशी संकटे आली, याचे मन भयभित करणारे वर्णन आहे. ही कथा आपल्या पुराणकथेशी सुसंगत नसल्याने चक्रावून जाऊन आपल्या विद्वानांनी या पोथीचा शोध घेतला. कलकत्त्याच्या हरप्रसाद शास्त्र्यांनी ही कथा मुसलमानांच्या 'सत्यपिरेर' पासून कशी अविष्कृत झाली हे सांगितले . **कै. ह. रा. दिवेकरांनी** व इतर अनेक

विद्वानांनी ही कथा स्कंदपुराणात शेवटी कशी चिकटवून दिली आहे, याचे साक्षेपाने संशोधन केले. कै. दिवेकरांना कोकणात या पोथीचे एक हस्तलिखित मिळाले. त्या पोथीत त्यांना 'स्कंद पुराणे' ऐवजी 'स्कन्न पुराणे' असा उल्लेख आढळला (स्कन्न म्हणजे अगदी पुरातन) व राजाचे शंभर पुत्र प्रसादाची अवहेलना केल्याने नष्ट झाले (तस्यपुत्र शतं नष्टं) ऐवजी 'तस्य मित्र शतं नष्टं' म्हणजे त्याचे शंभर मित्र त्याला दुरावले असा उल्लेख आढळला. 'स्कन्न पुराणे-पूर्व खडे' ऐवजी 'स्कद पुराणे रवा खंडे' असा फरक होणे शक्य आहे आणि सत्यनारायणाची पूजा राजा करतो आहे, हे पाहून त्याचे शंभर स्नेही त्याला परत मिळाले, असा बुद्धिवादी अर्थ कै. दिवेकरांनी काढला. दिवेकरांनी त्यांना मिळालेली ही पोथी संपादून प्रसिद्ध केली आहे.

परंतु दिवेकरांना वाटते तसे वाटण्याचे वास्तविक काही कारण नाही. सत्यनारायणाच्या पोथीतील कथेचे वळण अशा विवेचनाला अनुकूल नाही. लोकांना एखादा सुटसुटीत, सर्वांना सारख्या प्रमाणांत करता यावा असा धार्मिक विधी हवा होता. आपल्या धर्माच्या जातीजमातींत धार्मिक विधी इतके त्या त्या जातीजमातींशी निगडीत आहेत की, त्यामुळे या जातीजमाती अभेद्य तटबंदीमध्ये स्वतःचे अलगपण राखून आहेत. इंग्रजांच्या आगमनानंतर या देशात नव्या दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या परंतु धर्मश्रद्ध व्यक्तीने मुसलमानांनी सहजगत्या 'सत्यपिरेर' च्या नावाने एकत्रित येण्याची किमया पाहिली. ही किमया त्यांच्या धर्माविधींतूनच त्यांना स्फुरली होती. असा विधी हिंदूमध्येही सूरू होणे त्याला आवश्यक वाटले. परंतु बुद्धिवादी दृष्टीकोनातून अशा कथेची मांडणी केली असती तर ती कोणी हातात सुद्धा धरली नसती. ब्रम्होसमाज, प्रार्थना समाज इत्यादी सुधारणेच्या प्रेरणेतून निघालेल्या समाजाचे काय झाले हे आज दिसतेच आहे !

त्यामुळे 'सत्यनारायणपोथी' संस्कृतमध्ये लिहिणाऱ्या आणि ही पोथी स्कंद पुराणात आहे म्हणून सांगून तिला धार्मिक प्रतिष्ठा देणाऱ्या कोणा अज्ञात ब्राम्हणाच्या शहाणपणाचे कौतुक जितके करावे तितके थोडेच आहे ! साऱ्या हिंदु समाजाने या कथेचा स्वीकार करावा म्हणून या पोथीत निर्माण केलेली कथा सर्वसामान्य व्यक्तीच्या धार्मिक कल्पनांचे पोषण करणारी आहे, या कथेचा अनादर केल्याने येणाऱ्या काल्पनिक संकटापेक्षा या कथेमुळे आपल्या इष्टमित्रांना अगदी साध्यासुध्या कारणासाठी एकत्र आणण्याची व आंनदोत्सव

साजरा करण्याची सोय त्याला महत्वाची वाटली. बंगालमध्ये मुसलमानांच्या पीराच्या ठिकाणी मलिदा मुक्तपणे प्रसाद म्हणून वाटला जात होता. त्याचे संस्करण करून 'हलुवा वा पुजारी',ची म्हणजे आजच्या प्रसादाची त्या ठिकाणी योजना केली. प्रसादासाठी गव्हाचा रवा उपलब्ध नसेल तर (बंगालच्या खेड्यापाड्यांतून सर्वत्र गहू उपलब्ध होत नाही म्हणून) तांदळाचा रवा वापरण्यात हरकत नाही, अशीही सवलत देऊन ठेवली. कै. दिवेकरांना या विधिमध्ये 'निहित ध्येयवादित्व, उच्च विचार, धर्मनिष्ठा, आणि भगवद्भक्ती' या सर्वांचा संगम आढळला. तो योग्यच होय.

धर्मभोळेपणा आणि आधुनिकता यांचा एक विलक्षण स्वरूपाचा समन्वय या सत्यनारायणाने घडविला आहे. त्याचे महत्व लक्षात असल्यामुळे शुद्धिसंस्करण करणाऱ्या अनेक घटकांनी या पोथीच्या मूळ रूपाकडे दुर्लक्ष केले आहे. हे दुर्लक्ष मोठे अर्थपूर्ण आहे. संस्कृतीच्या सर्वसमावेशक सहिष्णुतेचे व लवचिकतेचे या विधित प्रतिबिंब पडले आहे. सत्यनारायणाच्या पूजेमुळे गावोगावच्या पीरांच्या पूजेला आळा बसला.

पाप पुण्याची कल्पना-

- श्याम मानव

१९७० पासून सामाजिक कार्यात सक्रीय. प्रारंभी जयप्रकाश नारायण यांच्या तरूण शांतिसेनेत दाखल. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या सहवासात कार्य. हुंडाविरोधी व स्त्रीमुक्ती चळवळीत सक्रीय सहभाग.

शोध भानामतीचा, बुवाबाजी बळी स्त्रियांचा हे ग्रंथ प्रकाशित. सम्मोहनशास्त्राचें गाढे अभ्यासक, प्रभावी वक्ते काही काळ इंग्रजीचे प्राध्यापक . पत्रकार या नात्याने मनोहर, तरूण भारत, दै. लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, युगधर्म, नागपूरपत्रिका, स्त्री इ. नियतकालिकांतून स्वतंत्र लेखन. भ्रमनिरास या अनिसच्या मुखपत्राचे संपादक, सात वर्षांपासून अखिल भारतीय अनिसचे पूर्णवेळ कार्यकर्ते संघटक , शेकडो बाबा ज्योतिषी, मांत्रिक, अंगात येणाऱ्या देव्यांचा भंडाफोड अनिक चमत्काराचे रहस्य उघड केले. भानामती केसेस शोधल्या खालील उताऱ्यातून त्यांनी पापपुण्याची संकल्पना स्पष्ट केली आहे.

सर्वच धर्मामध्ये पाप पुण्याच्या व स्वर्ग नरकाच्या कल्पना आहेत. एवढेच नव्हे तर **शिक्षा व बक्षीस या कल्पनेवरच धर्मांनी आपल्या नैतिक आचरणाचा डोलारा उभारला आहे. ज्या काळांत धर्मांचा उदय झाला त्या काळात समाजात बऱ्याच व्यवस्था व संस्था उदयास यायच्या होत्या, माणसाची बौद्धिक प्रगल्भताही वाढायची होती.** सर्वत्र अव्यवस्थेची स्थिती होती. अशा या काळात माणसाच्या नैतिक आचरणाला अशा पाप पुण्याच्या कल्पनांची जोड देण्याची त्यांना आवश्यकता वाटली असावी. धर्माच्या उदयाआधीही कमी अधिक प्रमाणांत पाप पुण्याच्या कल्पना रूजल्या होत्याच.

धर्म संस्थापकांनी त्या काळात पाप पुण्याच्या कल्पनेवर आधारित अशा धर्मांतर्गत समाज व्यवस्थेची उभारणी करण्याचा प्रयत्न केला. कदाचित् ही पाप पुण्य कल्पना निर्मिती त्या काळातील सर्वात बुद्धिमान अशी निर्मिती असावी.

या संकल्पनेनं कदाचित् दीर्घकाळ पर्यंत नैतिक व्यवस्था समाजात रूजवण्यास मदत केली असावी. माणसाला चांगलं आणि वाईट यातील

करण्याची संधी दिली असावी. वाईटापासून बऱ्याच अंशी परावृत्त करण्यास ती कारणीभूत ठरली असावी.

हिंदू धर्मात मरताक्षणीच यमराज्यात या पाप पुण्याचा निवाडा करून स्वर्ग नरकात पाठवलें जातें अशी कल्पना आहे तर ख्रिश्चन व मुस्लिम धर्मात मृत्युनंतर सर्व माणसांना जमिनीत गाडले जाते. 'एक दिवस' कायामत का दिन' येतो त्यादिवशी अल्ला या सर्व माणसांना उठवून त्याच्या पाप पुण्याचा हिशेब करून न्याय निवाडा करतो अशी कल्पना आहे.

पण या पाप पुण्य मानणाऱ्या सर्वच धर्मांतील इहलोकीची व्यवस्था पुरोहितांवर मौलामौलवींवर, पाद्री-धर्मोपदेशकांवर सोपविली जाणे अपरिहार्यच होते.

परिणामतः पाप पुण्याच्या कल्पना राबविण्याची, रूजविण्याची जबाबदारी यांच्यावर येऊन पडली. या पुरोहितशाही वर्गाचे हितसंबंध जसे जसे निर्माण होत गेले तस तसे त्यांचे साटेलोटे धनिक लोकांशी निर्माण होत गेले आणि धनसंपत्तीच्या मोबदल्यात पापक्षालनाचे अनेक मार्ग त्यांनी उपलब्ध करून दिले.

कितीहीं पाप करा अमूक अमूक यज्ञ करा, देवाला देणगी द्या, गंगेत स्नान करा पापातून सुटका होईल असा एक नवाच संस्कार निर्माण झाला आधी केलेल्या पापी कृत्याच्या जाणीवेमुळे पश्चाताप उपलब्ध करून दिलेल्या माणसांना बदलण्याची संधी म्हणून धर्माने उपलब्ध करू न दिलेल्या पाप-क्षालन प्रक्रियेचा असा वाईट वापर सुरू झाला. खरं म्हणजे वाईट कृत्य करणारा माणूस बदलू शकतो त्याला खरेच पश्चाताप झाल्यास बदलण्याची संधी असावी हा उदात्त हेतू मानसशास्त्रीय दृष्ट्या अगदी योग्यच आहे, नव्हे मानवजातीच्या उच्च सुसंस्कृत पातळीचा निदर्शक आहे. ख्रिश्चनांच्या कबुल जबाबात, (चर्चमधे एक जागा असते त्या ठिकाणी त्या व्यक्तिला आपली ओळख न देता धर्मोपदेशकाला आपण केलेल्या वाईट कृत्यांची कबुली देता येते व पापाच्या ओझ्यातून मुक्त होता येते) कन्फेशन पद्धतीत हा शास्त्रीय भाग मोठ्या प्रमाणांवर आढळतो. पण तिथेंही कबुली जबाबापेक्षा २५ डिसेंबरला येशूचे रक्त (वाटली जाणारी दारू) प्याल्याने सारी पापे धुवून निघतात हा संस्कार बळावला.

पुरोहितशाहीनें हितसंबंधातून धनलालसे पोटी अथवा सत्तालालसे पोटी पश्चातापदग्ध पापक्षालन मार्गाचा एवढा गैरवापर सुरू केला की धर्मश्रद्धा मानणाऱ्या धर्मभिरू माणसांच्या मनातून सुद्धा पापाची भीती नगण्य करून टाकली.

कोणतेही पाप केले तरी पुरोहितशाहीने सुचवलेले पापक्षालन मार्ग नेहमी धनिक वर्गाच्या आवाक्यातील राहिल्याने भरपूर दानदक्षिणा वाटणारा, धार्मिक कृत्ये करणारा आणि तात्कालीन दृष्ट्या अवैध, अनैतिक मानल्या गेलेल्या कृत्यात सहभागी झालेला एक भला मोठा धनिक वर्ग केटभर निर्माण झाला आजही मोठ्या प्रमाणावर त्यांची प्रचिती येते.

देवळांना मोठमोठ्या देणग्या देणारे मोठ्ठाले यज्ञ पार पाडणारे जे लोक आहेत त्यातील बहुतांश लोकांच्या धनसंपत्ती मिळवण्याच्या मार्गाची चौकशी करून पाहा त्यातील बहुतेक लोक काळाबाजारासारख्या अवैध धंद्याशी संबंधित असल्याचे तुम्हाला आढळेल. अर्थात सारेच धार्मिक कृत्य करणारे लोक वाईट पैसा मिळवणारे असतात असा अर्थ कोणी काढू नये पण वाईट मार्गाने पैसा मिळवणारे जास्तीत जास्त भारतीय लोक मात्र धार्मिक कृत्यात जास्त गढलेले असतात ही मात्र वस्तुस्थिती आहे.

या देशात तर अजब व्यापाऱ्यांची जमातच तयार झाली आहे. समजा एका घरात ४ भाऊ असतील तर ते देवाला ५ वा भाऊ मानतात. आपल्या संपत्तीतील ५ वा हिस्सा देवाच्या नावे ठेवतात. उत्पन्नातला ५ वा हिस्सा इमाने इतबारे देवालाच दिला जातो. ही हिस्सेदारी एवढी प्रामाणिकपणे पाळली जाते की (देव प्रत्यक्ष हिशेब बघत नसतांनाही) एखाद्या विशेष प्रसंगी देवाच्या हिश्शातील रक्कम व्यापारात खर्च करावी लागली तर त्या पैशाची अगदी व्याजासहित परतफेड केली जाते. हा सारा देवाचा पैसा पाहून धर्म कार्यातच खर्च केला जातो हे प्रामाणिकपणाचे उदाहरण पाहून तुम्ही फारच खुश व्हाल पण याची दुसरी बाजू पात्र अतिशय काळीकुट्ट आहे. देवच पांचवा हिस्सेदार असल्यामुळें तो अशा व्यापाऱ्यांच्या सगळ्याच कृत्यांचा हिस्सेदार आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते. परिणामतः कितीही वाईट, अवैध मार्गाने पैसा मिळवताना त्यांना एक टक्काही हरकत वाटत नाही. पाहणी केली तर आपणांस आढळते की सट्टा व अवैध धंदा करणाऱ्यांमध्ये देवाला हिस्सेदार बनवणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

भारत हा तसा धर्मश्रद्धा बाळगणाऱ्यांचाच देश आहे. या देशात किमान ९९.९९ टक्के लोक देव व पाप पुण्य मानतात तरी या देशासारखा पराकोटीचा भ्रष्टाचार, खोटारडेपणा, दांभिकपणा अन्यत्र क्वचितच् आढळेल.

इतर पाश्चात्य देशातही भ्रष्टाचार आहे पण तो टक्क्यांमध्ये सुरू असतो. अख्खा पूल चा पूल, रस्ताचा रस्ता वा डॅमचा डॅम खाल्याची भारतासारखी उदाहरणे क्वचितच् आढळतात. आपल्या देशातील छोटे बांधकाम असो की मोठे बांधकाम असो त्या ठिकाणी हमखास देऊळ बांधले जाते कारण काय ?

देऊळ बांधणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरला, इंजिनिअरला कदाचित् असं म्हणायचं असतं की, 'हे देवराया आम्ही भरपूर सिमेंट खाल्लं, लोखंड खाल्लं, आमच्या बांधणी शास्त्राप्रमाणें हा पूल डॅम कोसळण्याची शक्यता आहे. म्हणून या पूलाच्या संरक्षणार्थ आम्ही भक्तीभावें तुझी येथे योजना करतो आहोत. हा एवढ्या रुपयांचा महाप्रसाद चढवतो आहोत. आता संरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी तुझीच. अर्थात अशांच्या मदतीला देव जात नाही. स्वतःच मंदिर वाचवण्याच्या भानगडीतही पडत नाही आणि त्या डॅम सोबत ते मंदिरही वाहून जातं. हा तुमचा माझा साऱ्यांचा अनुभव आहे.

या साऱ्या परिस्थितीचा चिकित्सक मागोवा घेतला असता आपणास असे आढळते की पाप पुण्याच्या कल्पनेमुळें माणसं चांगली वागतात याला काही आधार नाही. या समाजात पाप पुण्य कल्पना रूजलेल्या असूनही पाप घडतच राहतं. उलट मोठ्या प्रमाणावरचा अमानुषपणा आणि अमानवीयपणा या समाजात टिकून राहीला.

अस्पृश्यतेसारखा अतिशय अमानुष अमानवीय प्रकार या समाजात पाप पुण्याच्या आधारेच एवढा दीर्घकाळ टिकू शकला. कोणत्याही शास्त्रानें वा संपत्तीच्या लालसेने वा हुकुमशाहीने सुद्धा ही अस्पृश्यता एवढा दीर्घकाळ टिकू शकली नसती. आजवर शेकडो वेळा या परिस्थिती विरूद्ध अस्पृश्यांनी बंड करून उठायला हवं होतं. पण गेल्या जन्मीच्या पापामुळे आम्ही अस्पृश्य जमातीत जन्मलोय. या एका कल्पनेमुळे गेल्या २ हजार वर्षात एकही बंड अस्पृश्यांनी केले नाही, ही या संकल्पनेची दुसरी काळी बाजू आहे, हेही आपणास विसरता येणार नाही.

अनेक धर्मश्रद्ध माणसांना वाटते की आजकाल जी पापं समाजात वाढलीत ती प्रामुख्यानं विज्ञानाच्या विकासामुळं. लोकांचा पाप पुण्यादी कल्पनांवरचा विश्वास उडाल्यामुळं वाढली आहेत. त्यांच्या या म्हणण्याचाही आपण चिकीत्सक शोध घेतला पाहिजे.

जगभर विज्ञानाच्या प्रगतीमुळे धर्मश्रद्धेला ओहोटी लागली ही वस्तुस्थिती आहे. धर्मग्रंथात सांगेतलेल्या अनेक गोष्टी आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर खोट्या ठरायला लागल्यात. १५ ते १७ व्या शतकात युरोपामध्ये धर्म विरूद्ध विज्ञान अशी लढाईच सुरू झाली. परिणामतः विज्ञानाच्या प्रगतीसोबतच धर्मश्रद्धा वितळू लागली, ही वस्तुस्थिती आहे. पाश्चात्य देशांमध्ये आज धर्मश्रद्धा ही केवळ खाजगी बाब ठरली. सार्वजनिक जीवनांत तिला सामूहिक समारंभाखेरीज (आनंदोत्सव) स्थान उरले नाही.

भारतातही असेच घडले कां ? याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल. उलट देशात सार्वजनिक स्थळी व खाजगी जीवनातही धार्मिक उत्सवांचे व कृत्यांचे प्रमाण वाढले आहे. विज्ञान शिकविणारी प्राध्यापक मंडळी सुद्धा सत्यनारायणासारखे विधी करण्यात धन्यता मानते. याचा अर्थ बाह्यांगी उपचार या अर्थाने तरी या देशात धर्मश्रद्धा मोठ्या प्रमाणावर टिकून असलेली दिसते.

तरी पण पाप पुण्याची कल्पना हा समाज नीतिमान वा पुण्यशील करण्याबाबत फारच तोकडी पडलीय, ही वस्तुस्थिती आहे.

मी आधीच म्हटलंय की समाज मानसशास्त्रीय दृष्ट्या पाप पुण्याची कल्पना ही एक अतिशय बुद्धीमान व प्रभावी संकल्पना आहे, असे मानावेच लागेल. पण ती का कुचकामाची ठरली याची योग्य चिकित्साही आपण निर्भिडपणे केलींच पाहिजे.

आपण एक महत्वाचें कारण पाहिले की पाप क्षालनाचे मार्ग धनसंपत्तीशी जोडण्यात आल्याने पाप करणाऱ्यांना पाप करण्याची भीती वाटेनाशी झाली आहे.

दुसरा एक अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. तो समजण्यास थोडा कठीण असला तरी मुळातून समजून घेतला पाहिजे.

माणूस चांगला कां वागतो ? मुळातच त्याला चांगले वागावेसे वाटते म्हणून ! इतराशी आपण वाईट वागलो तर नंतर आपलेच मन आपल्याला खात

राहते. कारण इतरांनी तसं वागलेलं आपणास आवडल नसतं म्हणून आपण तसं वागायला नको होतं असं आपलं आपल्यालाच वाटू लागतं. कदाचित् त्यावेळी आपण (अहंभावनेमुळं) माफी मागणार नाही पण दुसऱ्यावेळी दुसऱ्याशी वाईट वागण्याचं आपण टाळतो. ही जी मनाची टोचणी आहे ती एकूणच आपल्या सामाजिक वर्तणुकीला निमंत्रित करीत असते. यालाच गिल्ट कॉम्प्लेक्स, अपराधीपणाची भावना म्हणतात.

ही अपराधीपणाची भावना मानवी जीवनात फार महत्वाची भूमिका बजावीत असते.

अर्थात तुमचे व्यक्तिमत्वात ती संस्कारानं (कंडिशनिंग) निर्माण होत असली तरी 'जगा आणि जगू या' या मूलभूत जीवशास्त्रीय जाणीवेनुसारच ती घडते. अर्थात लढाऊ समाजात याच्या नेमका उलट संस्कारही केला जाऊ शकतो. तरी पण समान्यतः 'माझ्याशी इतरांनी कसे वागावे ?" या अपेक्षेनुसार 'मी इतरांशी तसेच वागावे' या न्यायानुसार ही अपराधीपणाची भावना व्यक्तिमत्वात घर करून बसते. यांत धार्मिक संस्कारही महत्वाची भूमिका बजावतातच.

एखाद्या माणसाने टोकाचे वाईट कृत्य केल्यास त्याला ही अपराधीपणाची भावना प्रचंड अस्वस्थ करून सोडते. त्याचं मन त्याला खूप खाऊ लागतं. त्याची झोप सुद्धा प्रसंगी नाहीशी होते. याच ताणामुळे प्रसंगी तो पागलपणाच्या अवस्थेप्रत वा आत्महत्या करण्यापर्यंत मजल गाठू शकतो.

अशा मनोवस्थेत 'अशी मी पुन्हा चूक करणार नाही' यापुढे चांगला वागेन' ही व्यक्तीगत हमीच त्याला खऱ्या अर्थानें सावरू शकते, नवे जीवन देऊ शकते.

हा अत्यंत महत्वाचा मानसिक मुद्दाच सगळ्या धर्मांनी पाश्चात्तापदग्ध व्यक्तीला पापक्षालनाची संधी प्रदान करून वापरला होता. अशा व्यक्तींना एक नवे व सुसंस्कृत जीवन जगण्याची संधी देण्यासाठी तो सर्वथा योग्य होता.

पण ..... आता काय झालं ? केणतेही पाप केलं की गंगेत स्नान केल्यानं, देवाला पूजा घातल्यानं वा दान धर्म केल्यांनं त्या पापाचं क्षालन होतं असं एखादं वाईट कृत्य घडलं की ज्यामुळे त्याच्या अपराधी पणाच्या जाणीवेने त्याला अस्वस्थ करून टाकावं त्यावेळी हा पापक्षालनाचा मार्ग वापरल्यानं

खरोखरच त्याला समाधान मिळतं, अपराधीपणाच्या टोचणीतून त्याची सुटका होते. ज्यामुळं, त्याचं अख्ख आयुष्य कदाचित् बदललं असतं ती पश्चाताप-दग्धतेची अवस्थाच त्याच्या बाबत घडून येत नाही.

परिणामतः तो जास्त पापं करायला पुढे जाऊन निर्ढावतो. म्हणूनच सारेच गुन्हेगार, खूनी, वाईट कृत्य करणारें फार धार्मिक असल्याचे आपणास आढळून येतं.

कारण हो पापक्षालनाची पद्धती त्यांना अपराधीपणाच्या जाणीवे पासून सुटका करून देण्याचा एक प्रभावी मार्ग ठरला असता.

पाप पुण्याच्या संकल्पनेंमुळें आज पापं तर कमी होतच नाही उलट अपराधीपणाच्या टोचणींमुळं व्यक्तिमत्वावर येणारं मानसशास्त्रीय नियंत्रणही काढून टाकल्यास ही संकल्पना (त्यातील सोप्या सुटकेच्या मार्गामुळं) जबाबदार ठरली आहे. पर्यायानं न कळत पाप वाढवण्यास मदत करणारी ठरली आहे.

जर एखाद्या धर्मश्रद्ध माणसाला खरोखरच पाप पुण्याच्या संकल्पनेमुळे चांगला वागावं असं वाटत असेल तर त्याला सर्व प्रथम ही संकल्पना मुळातून बदलावी लागेल व पापक्षालनाच्या साऱ्या वाटा बंद कराव्या लागतील.

पण हे कसं शक्य आहे ? ' पांच रूपयाचे पेढे देवाला द्या ' म्हणजे पास व्हाल. 'सोमवार करा म्हणजे नोकरी मिळेल' या सारखा संस्कार ज्या समाजात अगदी लहानपणापासून होतो, त्या समाजात तर हे मुळीच शक्य नाही.

उलट वरील प्रकारच्या संस्कारामुळं 'अभ्यास कमी केला तरी चालेल, ५ रु. देऊन मी पास होईन. चांगली डिग्री नाही मिळाली तरी चालेल, देवकृपेनं नोकरी मिळेल. अशी असामाजिक व भ्रष्टाचारी मानसिकता निर्माण करणारा हा संस्कार ठरतो.

ज्या देशात् ज्या देवाला सर्वात जास्त वचकून घाबरून राहायला हवं त्यालाच लाच देऊन (५ रुपयाचे पेढे) प्रसन्न करून घेण्याचा संस्कार केला जातो त्या देशात बिचारी पाप पुण्याची संकल्पना माणसांना पाप करण्यापासून कशी परावृत्त करू शकणार ?

पाप पुण्याची कल्पना नसेल तर समाजात माणसं कोणत्या प्रेरणेमुळं

चांगलं वागतील? हा प्रश्न साऱ्याच सामाजहितवादी मंडळींना नेहमी पडतो. तसा हा प्रश्न फार महत्वाचा आहे.

पाप पुण्याची वा धर्मश्रद्धेची गरज नाही असं म्हणताना संस्कृतीची गरज नाही, असं आम्हाला कधीच म्हणायच नसतं. कोणत्याही पद्धतीचा समाज असला तरी त्या समाजात संस्कृतीची व चांगल्या सुसंस्कृत संस्कारांची आवश्यकता राहणार आहेच.

फक्त कोणत्या तरी अज्ञाताच्या भीतीनं चांगल वागा. असं सांगण्यापेक्षा चांगल वागणं हे सुसंस्कृतपणाचं, सभ्यपणाचं लक्षण आहे म्हणून चांगल वागा प्रतिष्ठा असेल तर चांगलं वागल्यामुळं मनाला बरं वाटतं म्हणून चांगलं वागा असा संस्कार समाजात निर्माण करावा लागेल आणि हा नैसर्गिकतेच्या व सत्याच्या फार जवळचा संस्कार असल्यामुळं दीर्घकाळ टिकणारा राहील.

मनुष्य कधीच एकटा राहू शकत नाही. अगदी जन्मापासूनच त्याला दुसऱ्या माणसांची मदत घ्यावी लागते. शिवाय इतर माणसांचा सहवास ही तर त्याची नितांत मानसिक आवश्यकता आहे.

१) जगण्याची तीव्र इच्छा !

२) एकटेपणाची भीती !

३) इतर माणसांच्या सहकार्याची व सहवासाची आवश्यकता !

हे तीन मूलभूत व नैसर्गिक मुद्दे असे आहेत की, जे माणसाचं सारं आयुष्य व्यापून टाकतात.

त्यामुळं इतर माणसांशिवाय आपण जगूच शकत नाही, याची माणसाला अगदी पदोपदी अनुभवाधारीत जाणीव होत असते. इतर माणसांशी आपण चांगलं वागलो तरच ते आपल्या सहवासात राहतील, म्हणून त्यांच्याशी चांगलं वागलच पाहिजे ही स्वार्थी जाणीव चांगलं व सुसंस्कृत वागण्याची प्रेरणा ठरते.

इतरांशी चांगलं वागलं तर माझ्या वागण्यामुळे इतर लोक आनंदीत झाले तर मला आनंद मिळतो. इतरांच्या दुःखात मी वाटेकरी झालो तर मला आनंद मिळतो ही भावनात्मक जाणीव चांगलं वागण्याची प्रेरणा बनते.

मी वाईट वा समाजविघातक कृत्य केलं, किमान दुसऱ्याचं प्रचंड नुकसान करणारं कृत्य केलं तर माझी अपराधीपणाची भावना मला अतिशय

अस्वस्थ करून सोडते, ही जाणीव मला वाईट वागण्यापासून परावृत्त करणारी व माझी वर्तणूक नियंत्रण करणारी ठरते.

'माझ्याशी इतरांनी कसं वागावं या अपेक्षेतून मी इतरांशी तसंच वागेन ही नैसर्गिक प्रवृत्ती माझ्या चांगल्या वर्तणुकीला वळण देण्यास व साऱ्या नैतिक कल्पनांची उभारणी करण्याचा आधारभूत पाया ठरते.

म्हणून पाप पुण्याच्या कल्पना समाजात नसणारा समाजही नैतिक व सुसंस्कृत राहू शकतो उलट तो अधिक सुसंस्कृत व नैतिक राहण्याची शक्यता आहे.

(अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका)
ऑगस्ट १९८७

अंधश्रद्धा निर्मूलन आक्षेप आणि आशय

- डॉ. नरेंद्र दाभोळकर

डॉ. नरेंद्र दाभोळकर - नामवंत कबड्डीपटू. डॉक्टरी पेशा गोर-गरिबासाठी चालवून बव्हंशी समाजकार्यासाठी वाहून घेणारे पुरोगामी चळवळीचे स्वंदे कार्यकर्ते, विचारवंत, समता आंदोलन देवदासी निर्मूलन, राष्ट्रसेवादल, विद्यार्थ्यांचे गतिमान संघटन 'छात्रभारती' या संघटनांचे आधारस्तंभ, मार्गदर्शन आणि सक्रीय कार्यफल. 'सामाजिक कृतज्ञता निधी' उभारण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे एक प्रवर्तक, कार्याध्यक्ष,समितीचे मुखपत्र भ्रमनिरासचे संपादन सल्लागार.

'भ्रम आणि निरास' 'अंधश्रद्धा-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' हे त्यांचे ग्रंथ-अनेक नियतकालिकातून लेखन. खालील निबंधात अंधश्रद्धा निर्मूलनावरील आक्षेप आणि या कार्यामागील आशयाचे विवेचन त्यांनी केले आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चलवळीबद्दल समाजात उत्सुकता दिसते. वाद-विवाद घडतात. प्रत्यक्ष चळवळ करताना समाजातून, त्यातील अनपेक्षित घटकाकडून कृतिशील पाठिंबा मिळतो. दुसरीकडे समाजात अंधश्रद्धा वेगाने वाढत आहे, असेही दिसते. त्याची चिकित्सा केलेलीही समाजमनाला आवडत नाही. आग्रहाने व आक्रमकतेने त्याचा पुरस्कार केला जातो. शिव्या आणि ओव्या दोन्ही मिळण्याचा असा वैचारिक घुसळीचा हा कालखंड आहे.

वैज्ञानिक जाणीवा वाढवणे, जनसामान्यांच्या प्रश्नाच्या अंगाने विज्ञान सामान्य माणसापर्यंत घेऊन जाणे हा प्रयत्नही समाजात, विशेषतः गेल्या दशकात, प्रभावीपणे चालू झाला आहे. अशा जाणीवाच शेवटी अंधश्रद्धांना मूठमाती देतील अशी या प्रयत्नांची वैचारिक मांडणी असते. प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही.

वरवर पाहता अंधश्रद्धेविरुद्धची लढाई सोपी वाटते. बुवाबाजी, त्यांचे चमत्कार, भूत, भानामती, चेटूक, जारणमारण, मंत्रतंत्र या खुळ्या कल्पना वाटतात. देवऋषि, तांत्रिक हे हास्यास्पद वाटतात. नरबळी, देवदासी या प्रथांतला अघोरीपणा उमजतो. भविष्याचा फोलपणा समजतो. या कालबाह्य गोष्टींबाबत चळवळ कशाला करावयाची? आपल्या मरणानेच काळाबरोबर त्या

अटळपणे नष्ट होतील असे वाटते. परंतु हा भ्रम आहे, हेही आता लक्षात येऊ लागले आहे. २१ व्या शतकाकडे नेणारे आधुनिक पंतप्रधान कुंभमेळ्याच्या मुहुर्तावर गंगेच्या प्रदूषित पाण्याच्या कुंडात सहकुटुंब बुचकळ्या मारतात. राष्ट्रपती मुहूर्त बघूनच पदाची शपथ घेतात. लोकसभेच्या सभापतीच्या मस्तकावर कुणी देवराबाबा पाय ठेवतो तर मुख्यमंत्री देवीलाल कुणा चंद्रास्वामीची तांत्रिक शक्ति वापरू पहातो. यातही आणखी गंमत अशी की अंधश्रद्धा जावयास हवी याबाबत सर्वच जण उच्चरवाने बोलत असतात. पुरोगामी, सावरकरवादी, धर्मवादी सर्वांचेच मत असते की, अंधश्रद्धा नाहीशा व्हावयास हव्यात. पण स्वतःची श्रद्धा ही पूर्णतः डोळस आहे आणि इतर बिचारे अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकले आहेत, असा प्रत्येक जण दावा करतो. यामुळे अंधश्रद्धा विरोधी विचार व चळवळ खोल जावू लागली की सतत काही प्रश्न विचारले जातात. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ प्रभावी व्हावी असे ज्यांना वाटते त्यांनी याबाबत नीट व धीट भूमिका घ्यावयास हवी.

साधारणपणे चळवळीवरचे आक्षेप खालील स्वरूपाचे असतात. (१) तुम्ही श्रद्धेचे मानवी जीवनातील स्थान काय मानता? (२) देव धर्म याबाबत तुमचे मत काय? (३) तुमच्या विचाराने अनैतिक समाज निर्माण होणार नाही का? (४) तुम्ही भावनाविरहीत असा माणूस निर्माण करू इच्छिता का? (५) व्यक्तिगत जीवनात तुमचे आचरण कसे असते?

अंधश्रद्धा व विश्वास

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे काम करताना अंधश्रद्धा व विश्वास हे दोन शब्द पसंत करणे अधिक योग्य. ज्या श्रद्धेला ज्ञानाच्या, अनुभवाच्या साह्याने प्रश्न विचारले असता ती टिकते त्याला विश्वास म्हणतात. ज्ञानाच्या साह्याने चिकित्सा केली असता ज्या श्रद्धेतील फोलपणा उघडकीस येतो त्याला आपण अंधश्रद्धा म्हणतो.

शब्दप्रामाण्य, व्यक्तिप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य यांच्या आधारावर श्रद्धा उभी असते. या श्रद्धेची चिकित्सा स्वतः न करणे व इतरांना ती करू न देणे म्हणजे अंधश्रद्धा.

व्यक्ती जीवनात श्रद्धेने अनेक बाबी करते. त्याचा अर्थ कसा लावायचा? असत्याचा समाजात जय होतो हे हरघडी दिसत असताना शेवटी सत्याचाच

विजय होईल या श्रद्धेने माणसे कशी काम करतात? ही अंधश्रद्धा आहे का? ती अहितकारक आहे का? या प्रतिपादनातील गोंधळ नीट समजावून घ्यावयास हवा.

सत्याचाच विजय होतो अशी श्रद्धा बाळगणे, हा भ्रम नव्हे तर समाजजीवनाच्या अभ्यासावर, ज्ञानावर आधारित असा बुद्धिप्रामाण्यातून आलेला विश्वास असतो. असत्य वागून एकमेकांना सतत फसवणारा समाज, समाज म्हणून अस्तित्वच टिकवू शकणार नाही. स्वतःच्या हितासाठीही सत्य वागण्याच्या नियमाने त्याला स्वतः बांधून घ्यावे लागते. आज हे न समजल्याने, स्वार्थाने वा हितसंबंधाच्या तीव्र स्पर्धेमुळे प्रत्यक्षात सत्याने वागले जात नाही.

परंतु प्रत्येक व्यक्तीमध्ये विवेकशीलता असल्याने आणि समाजाला स्वरक्षणाचे भान असल्याने असत्य वागण्याची अनिष्टता समाजातील सर्वांना समजेल. जी व्यवस्था, हितसंबंध असे वागण्यास भाग पाडतात ते मोडले पाहिजेत हेही त्याना समजेल. स्वतःच्या विकासासाठी, संरक्षणासाठी (व्यापक अर्थाने समाज स्वार्थासाठी) हे समाजातील सर्वांना निदान बहुसंख्यांना समजणे अपरिहार्य आहे. यामुळे शेवटी सत्याचाच विजय होईल. म्हणजेच सत्याचाच जय होतो, हा खरे तर तर्क सुसंगतपणे स्वीकारलेला निष्कर्ष असतो, वैचारिक विश्वास असतो. प्रत्यक्षात कृती करताना भावना प्रभावीपणे वापरली जाते. सत्यावर श्रद्धा आहे, याचा अर्थ वरील विश्वासासाठी मोहाला वा भितीला बळी न पडता माणूस कृती करतो व जीवन झोकून देतो. विचाराला लाभलेल्या या भावनेच्या झळाळीमुळे खंबीर विचाराचा पाया असलेल्या विश्वासापेक्षा त्याच्या पृष्ठभागावरील श्रद्धेची झळाळी अधिक आकर्षित करते, आश्वासक वाटते एवढेच.

कुणी विश्वास या अर्थी "डोळस श्रद्धा" हा शब्द वापरला तर शब्दासाठी त्याच्याशी भांडण्याचे कारण नाही. श्रद्धा हा शब्द कोणत्याही अर्थाने अमूर्त नसलेल्या मूल्यविचारासाठी वापरला जातो. जोपर्यंत ती तपासणे, नाकारणे, त्याच्या विरोधात संघटन करणे हा अधिकार आहे, तोपर्यंत याबाबत वादाचे कारण नाही. शब्द कोणताही असला तरी चिकित्सेला खुली असणारी व त्याच्या निकषावर उतरणारी श्रद्धा हा विश्वासच आहे व ही कसोटी नाकारणारी बाब ही अंधश्रद्धा आहे.

धर्म व देव

श्रद्धेबाबत हे चिकित्सा स्वातंत्र्य मान्य केले की धर्म व देव यांची चिकित्सा करणे अटळ होते. मानवाच्या प्रगतीचा इतिहास हा धर्माच्या चिकित्सेपासून चालू होतो. अग्निला, वा पर्जन्याला 'मेघ'भूत वा 'मेघ'देवता मानून त्यांचे खरे स्वरूप मानवाला कधीच ज्ञात झाले नसते. अनेक चमत्कार, तंत्र, मंत्र, चाल, रुढी हे सगळे देवाच्या व धर्माच्या नावानेच चालू होते. धर्म व देव मानणाऱ्या संतांनी, समाजसुधारकांनी त्यावर हल्ला केला हा इतिहास आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही देव व धर्म बुडवण्यासाठी निघालेली चळवळ आहे, असा एक चुकीचा प्रचार पद्धतशीरपणे केला जातो. उपासना पद्धती व धर्माचरण यांचे स्वातंत्र्य व्यक्तीला भारतीय संविधानानेच दिले आहे. भारतीय घटनेला प्रमाण मानूनच जे चळवळ करतात त्यांना ही बाब मान्य असणे व त्याबद्दल आदर असणे ओघाने आलेच. मात्र हे स्वातंत्र्य निरपवाद नाही. काही महत्त्वाच्या बाबींचे भान ठेवूनच हे उपभोगता येते. कायदा, सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक नीतीमत्ता, राष्ट्रीय एकत्मता, घातक अंधश्रद्धा, शोषण करणाऱ्या रूढी व परंपरा यांबाबत ज्या ठिकाणी देव व धर्माच्या नावाने प्रश्न उभे होत असतील त्या ठिकाणी शासनाने हस्तक्षेप करणे घटनेनेच आवश्यक व इष्ट मानले आहे.

देव, धर्म यांच्या श्रद्धेच्या नावाने उभे केले जाणारे प्रश्न हे बहुधा वरच्या प्रकारातीलच प्रश्न असतात. त्याबाबत स्पष्ट व स्वच्छ, खंबीर व सक्रिय भूमिका घेतल्यास बरेच सोपे जाईल. सर्वोच्च धर्मस्थळात राजरोसपणे होणाऱ्या देशविरोधी हिंसक हालचाली व धर्मश्रद्धेचा भाग म्हणून अगतिकपणे त्याकडे होणारे दुर्लक्ष, यामुळे ही बाब आता अधिक प्रकर्षाने पुढे आली आहे. सती प्रकरणामुळेही त्याला चालना मिळाली आहे. याबाबत समाजात व शासनात पुरेशी सजगता व सक्रियता आल्यास देव व धर्म कल्पनांचा योग्य आदर राखूनही अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम प्रभावीपणे होऊ शकते.

चार वस्तुस्थितींचे मिश्रण

धर्मामध्ये चार वस्तुस्थिती एकत्रित मिसळलेल्या असतात. धर्मात शोषण असते, मिथ्याकथन असते, कर्मकांडे असतात व नैतिक मूल्येही असतात.

यांपैकी धर्माच्या नावाने होणाऱ्या शोषणाचा विरोध अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करणाऱ्याने करावयासच हवा. धर्माच्या नावाने ज्या अनेक भाकड कथा, मिथ्या कथन केले जाते, त्याचा उपहास केला तर त्यातील फोलपणा हसत खेळत व्यक्तिला समजावून देता येतो असा अनुभव आहे. शोषणाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या कर्मकांडांनाही विरोध नोंदवायला हवा (लक्ष मोदकांच्या आहुतीसारखे प्रकार यामध्ये येतात आणि प्रत्यक्षात आहुती यज्ञ पार पडला तरी त्याला झालेल्या विरोधाने प्रबोधनाचे काम साधलेले असते). मात्र तुलनेने निरुपद्रवी कर्मकांडाबाबत दुर्लक्ष करणेच योग्य ठरते. ही कर्मकांडे ही मानवाच्या उपजत सद्‌भावनेची, परोपकारी वृत्तीची, उत्सवप्रिय स्वभावाची निदर्शक असतात. ती स्वाभाविक मानावयास हवीत. नैतिकमूल्यांचे संवर्धन धर्माच्या आधारे करू इच्छिणाऱ्या प्रामाणिक व्यक्तींच्या बरोबर भांडण्याचे कारण नाही. मात्र धर्मनिरपेक्षणेही ही नैतिकता समाजात आणणे शक्य आहे व तेच इष्ट व श्रेयस्कर आहे हे सांगत रहावयास हवे. या सर्वासाठी धर्मश्रद्धेची चिकित्सा, ती बाळगणाऱ्या व्यक्तिच्या श्रद्धांबद्दल पूर्ण आदर ठेवूनही करावी लागणार व ती केली पाहिजे.

विश्वाचा स्वयंकार्यकारण भाव

हे विश्व स्वयंकार्यकारण भावाने बद्ध आहे, असे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील व्यक्ति मानते. या कार्यकारण भावालाच बहुसंख्य लोक चैतन्य, ब्रह्म, परमात्मा, परमेश्वर वगैरे मानतात. या विश्वाची नियंत्रक शक्ति मानतात. विश्वाची निर्मिती कशी झाली, हा आज एक अनुत्तरीय प्रश्न आहे. परंतु ती एका चैतन्यतत्त्वाच्या आविष्काराने झाली, असे कोणी मानत असल्यास अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीसाठी त्याच्याबरोबर वाद खेळण्याची गरज नाही. नियमबद्ध चालणारे घड्याळ हे तयार झाल्यावर स्वयंगतीने चालते ते तयार करणाऱ्या घड्याळजीच्या इच्छेचा त्याच्या गतीशी, नियंत्रणाशी काही संबंध रहात नाही. तसेच हे विश्व भले कसेही निर्माण झाले असो, ते येथील स्वयंनियमाने चालते कोण्या अव्यक्त शक्तीच्या इशाऱ्याने नव्हे. ते अशा शक्तीच्या इशाऱ्याने चालते असे मानणे आणि मंत्रतंत्र, पूजाअर्चा, होमहवन वा इतर असंख्य कर्मकांडे याद्वारे त्या शक्तीला आपलेसे करून घेण्यासाठी धडपडणे, ही मात्र निश्चितच अंधश्रद्धा आहे. आणि विश्वाची निर्मिती कशी झाली हा प्रश्न अनुत्तरीत असला तरी पृथ्वीचा जन्म व सजीवसृष्टीची उत्क्रांती ही बाब पूर्णपणे

भौतिक आहे, हे आता सिद्ध झाले आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी ही बाब पुरेशी आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्यकर्ते स्वाभाविकच बुद्धिप्रामाण्यवादी असतात आणि ही मंडळी भावनेचे महत्त्वच जाणत नाहीत, असा एक (हेतुतः !) पसरवण्यात आलेला गैरसमज आहे. ही कल्पना संपूर्ण चूक आहे. मानवी जीवनात भावनेला महत्त्वाचे स्थान असते हे मान्य आहेच. एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्युने तीव्र दुःख होणे, अश्रू ढाळणे हे स्वाभाविक व नैसर्गिक आहे. परंतु त्या व्यक्तीच्या प्रेमापोटी तिची मरणोत्तर भेट व्हावी म्हणून प्लँचेट करणे वा ते दुःख विसरण्यासाठी झोपेच्या गोळ्या घेऊन सतत गुंगीत रहाणे, हे बुद्धीवादाला मान्य नाही.

अंधश्रद्धा विरोधी लढ्यातील कार्यकर्ते अश्रद्ध असतात. देव-धर्म मानणारे नसतात, म्हणून ते अनैतिक असतात, त्यांच्या विचारसरणीतून नैतिक समाजाची उभारणी शक्य नाही, असा एक प्रचार केला जातो. समाजजीवन नैतिक बनवण्यासाठी धर्मच हवा असा आग्रह मांडला जातो. खरे काय आहे? वस्तुस्थिती पाहिली तर या देशात तरी कोणालाही हे मान्य करावे लागेल की ईश्वर, पैगंबर, श्रुति-स्मृती, बायबल, कुराण, धम्म इत्यादी धर्मग्रंथ मानणारे, सकाळ-संध्याकाळ पूजा करणारे वा नमाज पढणारे लोक या देशात ९९% हून अधिक आहेत. ईश्वर, धर्मग्रंथ, स्वर्ग, नरक यासारख्या कल्पना यांवर जर समाजाची नीतिमत्ता आधारलेली असते हे सत्य असेल तर आजचा बेबंद, स्वार्थी, भ्रष्टाचारी अनैतिक समाज निर्माण होण्याची गरज काय? तेव्हा समाजाचो उभारणी धर्मनिरपेक्ष, नीतिमूल्यावर माणसाला मध्यवर्ती मानून व्हावी असा आग्रह धरणे सुसंगत आहे. तरीही समाजाची सध्याची स्थिती लक्षात घेता धार्मिक पाया घेऊन नैतिक समाजाची उभारणी करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांना विरोध असण्याचे कारण नाही. मात्र या दाव्याची चिकित्सा जरुर झाली पाहिजे. हा आमच्या धार्मिक श्रद्धेचा प्रश्न आहे, असे म्हणून ती टाळली जाता कामा नये.

चळवळीचा व्यापक पाया

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा पाया व्यापक असावा. त्यामध्ये सर्वांनी मोठ्या संख्येने उतरावे, असा प्रयत्न आज चळवळीच्या माध्यमातून होत आहे.

त्याला काहीसे यशही येत आहे. अशावेळी चळवळीत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक आचरणाचा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. छोट्यामोठ्या गोष्टीकडे बोट दाखवून ही मंडळी ढोंगी आहेत, सांगतात तशी वागत नाहीत असे बोलले जाते. याबाबत बुद्धीभेद न होता वस्तुस्थिती समजावून घ्यावयास हवी. कोणत्याही चळवळीत वावरणाऱ्या कार्यकर्त्याने आपला आचार आपल्या विचाराशी सुसंगत ठेवावयास हवा हे योग्यच आहे. हा प्रयत्न प्रामाणिकपणे व्हावयास हवा. परंतु उक्ति व कृती यामध्ये सुसंपूर्ण सुसंगती राखणे हे इच्छा असूनही शक्य होत नाही असा अनुभव येतो. अडचणी अनेक असतात. सर्व अडचणींवर निर्णायक मात करणे हे फारच थोड्यांना शक्य होते. परंतु त्यांच्या प्रयत्नांची दिशा व तळमळ बरोबर असेल, तर कमी-जास्त वेगाने असेल परंतु पाऊल पुढे पडत असते. शिक्षणात, समाजात, कुटुंबात, प्रचारमाध्यमातून सगळीकडे अंधश्रद्धा रुजवणारे संस्कार इतके केले जात असतात की विरोधी दिशेने वाटचाल करणाऱ्याचे प्रयत्न प्रामाणिक असले तरी काहीसे अडखळत होणे स्वाभाविक असते. अशा व्यक्तीला समजावून घेऊन उत्तेजन देण्याची अधिक गरज असते. योग्य दिशेने घेतलेली लवचिक भूमिका आणि महात्मा गांधींच्या तत्त्वानुसार "एक पाऊल बरोबर टाकणाऱ्या" व्यक्तीचे केलेले स्वागत याचे अवधान बाळगले तर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा प्रभाव वाढता राहील यात शंका नाही.

संभ्रम

- डॉ. अनिल त्र्यंबक अवचट

डॉ. अनिल त्र्यंबक अवचट - डॉक्टरी पेशा. गोरगरिबांच्या सेवेसाठी चालवून, समाजकार्यासाठी वाहून घेणारे तळमळीचे कार्यकर्ते. समाजातील उपेक्षित, शोषित दलितांचे दुःखी जीवन जाणून घेऊन ते दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तोच त्यांच्या चिंतनाचा अभ्यासाचा व लेखनाचा विषय आहे.

सुक्ष्म आणि भेदक निरीक्षण, उत्कट अस्वस्थता, स्वनिरपेक्ष भाषाशैली - त्याच्या तळाशी असलेला उपरोध, उपहास हे गुण त्यांच्या लेखात आढळतात.

'पुरोगामी सत्यशोधक' या वैशिष्ट्यपूर्ण नियतकालिकाचे संपादक. पुर्णिमा, वेध, हमीद, गर्द, माणसं, वाघ्यामुरळी, धागे उभे आडवे, ही त्यांची ग्रंथसंपदा होय. त्यांच्या 'संभ्रम' या ग्रंथातून घेतलेल्या पुढील वेच्यात त्यांचे वर्मभेदक चिंतन प्रत्ययास येते.

रमामाता - आपल्या देशात माणसांना विश्वाची उत्पत्ती, आत्म्यावरचे अन्नमय कोश, प्राणमय कोश असे प्रश्न फार पडत असतात. दुष्काळ, अन्न, औषधे असले सामान्य प्रश्न कुणाला पडत नाहीत. आणि याचा आम्हाला अपरंपार अभिमान वाटतो. आध्यात्मिक ठेव्यांच्या पेट्या भरून तयार आहेत. पाश्चात्य रौखात एक्स्पोर्ट करण्यासाठी, तिकडेही पेट्या भरून तयार आहेत. भीक घालायच्या धान्याच्या.

बिहारच्या दुष्काळाची आठवण होते. माणसे भूक लागू नये म्हणून मोहाच्या बिया खात आणि त्या गुंगीत दिवस दिवस झोपून रहात. पुन्हा ऊठले की पुन्हा बिया. भूक लागायचा प्रश्नच नाही. प्रश्न फक्त असतो तो दिवसें-दिवस खचत जाण्याचा. आपल्या समाजानेही भुकेचा प्रश्न असाच सोडविलेला दिसतो.

गम्मत अशी की, हा डोस कधी कमी पडत नाही. रमामाता गेल्या की, पूर्णानंद हजर होतच आहेत. त्यांच्या ओमशांतीचे सूर विरताहेत तोच भगवान

श्री रजनीशांची स्वारी दाखल होतच आहे. त्यांचं संपेतोपर्यंत चिन्मयानंद मिशनच्या लोकांची धावपळ सुरू होतेच आहे. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी. प्रत्येकाचे रूप न्यारे. सगळ्या मोहाच्या बिया.

न्यायरत्न धुंडिराज शास्त्री विनोद - डॉ. संप्रदाय सिद्ध पुरुषांचा एक अनुभव सागतांना म्हणाले, 'एक सिद्ध, रस्त्याने चालला होता. त्याने समोरून येण्याऱ्या एका स्त्रिच्या स्तनास हात लावला. लोक त्याच्यावर या वर्तनाबद्दल रागावले. त्या स्त्रिच्या दोन्ही स्तनांला कॅन्सर असल्याचे नंतर ध्यानात आले आणि ज्या स्तनाला सिद्ध पुरुषाने हात लावला, तिथला कॅन्सर कमी होऊन नष्ट झाला. हे पाहताच त्या स्त्रिने त्या सिद्ध पुरुषाचा पत्ता काढून त्याचा हात दुसऱ्याही स्तनास लावून घेतला त्यानंतर तिथलाही कॅन्सर नष्ट झाला.'

मी संप्रसादना विचारले, 'यावर एक डॉक्टर म्हणून तुम्ही विश्वास ठेवता का ?' ते म्हणाले, 'हो' - माझ्या वडिलांनी असे कितीतरी रोग बरे केलेले आहेत.' मी विचारले, 'त्या सिद्धामध्ये जर कॅन्सर नष्ट करण्याची शक्ती असेल तर जगात कॅन्सरने जर्जर झालेल्या असंख्य माणसांचा कॅन्सर ते का नष्ट करीत नाहीत ?'

त्यावर ते म्हणाले, 'असे करणे इष्ट नसते. या विश्वाचा म्हणून काही समतोल असतो, तो बिघडला असता.' 'मग त्या स्त्रिच्या कॅन्सरच्या बाबतीतच त्यांनी तो समतोल कसा बिघडू दिला ?' 'तसा बिघडण्यातच विश्वाचा समतोल राखायचा असेल म्हणून.' हे का, हे म्हणतात त्याला आधार काय ? हे प्रश्न अर्थातच विचारायचे नाहीत. 'आम्ही म्हणतो म्हणून' हेच खरे त्याचे उत्तर आहे.

या अध्यात्म मार्गी माणसांचे एरव्हीचे व्यवहार मात्र नित्याप्रमाणे सुरळीत चालू असतात. एकाने दुसऱ्यास संधी मिळेल तेथे ओरबाडणे, लुटणे इ. प्रकार सर्वसामान्य माणसासारखेच ही आध्यात्मिक क्षेत्रात थोर अधिकारपदाला पोचलेली माणसेही करीत असतात. अध्यात्माने एकाने दुसऱ्याशी वागण्यात किंवा सार्वजनिक व्यवहारात फारसा किंवा यत्किंचितही फरक पडलेला नसतो. यांना स्वप्नात काही दृश्ये दिसतात, म्हणून इतरांनी थोर म्हणायचे ? त्यांच्या दृश्य वर्तनातला फरक आणि तोही मानवतेच्या दिशेने पडलेला, हाच त्यांच्या थोरत्वाचा निकष मानला गेला पाहिजे.

काळुबाईची जत्रा - विज्ञानामुळे वाहने आली आणि आपल्या देशात

त्या वाहनांच्या साह्याने वैज्ञानिक दृष्टिकोनाऐवजी अंधश्रद्धांचे प्रस्थ वाढायला मदत होत आहे.

पूर्वी आदिम काळात या जत्रांना काही सामाजिक उद्देश होता. त्यावेळी माणसाच्या भटक्या अवस्थेत जत्रा हे माणसे एकत्र येण्याचे एकमेव ठिकाण होते. स्थिर वस्त्या नसल्याने जत्रेतल्या बाजाराला मोठे महत्त्व होते. लग्न, देणीघेणी, व्यापात हे व्यवहार इथे उरकले जात. आता सर्व समाज बदलला. आधीची कामे उरली नाहीत. जी उरली ती अन्यत्र उरकली जातात. आता उरला आहे तो फक्त अंधश्रद्धांचा हैदोस.

पूर्वी देवदेवतांचे प्राबल्य असणे साहजिक होते. निसर्गातले कित्येक नियम माहित नसल्यामुळे उपद्रव देणाऱ्या शक्तींना देवता मानून त्यांना बळी अर्पण करून ते तिच्यापासून संरक्षण मिळवीत. तिला खूष ठेवीत. या देवाविषयीच्या कल्पनेत पुढे बदल होत गेले. कारण माणसाचे निसर्गाविषयीचे ज्ञान वाढत गेले. भक्ति साप्रदायात तर देव हा सखा झाला. आता तत्त्वज्ञानाच्या पातळीवर आस्तिक असणे हे समजू शकते पण कल्पिलेल्या देवतेला काही बळी देऊन खूष करणे, नवस करून तिला लालूच दाखवून आपली इच्छा पूर्ण होईल असा विश्वास बाळगणे ही सर्व मागे जाण्याची लक्षणे आहेत.

मीरा दातारचा दर्गा - टाइफॉईड झाला की डॉक्टर त्या आजारात किती पैसे कमावतो हे सर्वांना माहितच आहे. लोक बिनपैशाच्या मीरा दातारच्या पाण्याकडे पळतात, ते उगाच काय ?

आपल्याकडे देवऋषी, मांत्रिक, दर्गावाले यांना समाजात केवढे स्थान आहे हे वरकरणी सहसा कळूनच येत नाही. त्यांची कधी कुठे जाहिरात नसते. गरजू माणसे एकमेकांना बरोबर तत्परतेने बातम्या पुरवीत असतात. एखाद्या बाईला मूल नसले की तिला लोक कोणकोणते तोडगे सुचवतात हे अशा कोणी बाईने लिहिले तर फारच मनोरंजक होईल. माझ्या माहितीच्या, मूल नसलेल्या एक बाई तर इतक्या हळव्या झाल्या आहेत की उद्या तुम्ही गंभीरपणे सांगितलेत की पाच मैलावरच्या शंकरावर रात्री बाराला नग्न होऊन पाणी घाला, मुलगा होईल, तर त्या बाई तेही करतील. पण समजाऊन घेणार नाहीत की आपल्याला मूल नाही ही गोष्ट आपण स्वीकारली पाहिजे. एखाद्या झाडाला फळे येत नाहीत, इतरांना येतात, तसलेच इथे आहे. म्हणून दारिद्र्य, स्त्रियांचे

दुर्बल स्थान, सामाजिक भेद इत्यादि त्यांच्या गोष्टीही दर्ग्यावर बाहेर पडत असतात ही खरी मूळ कारणे पण भुतांच्या परिभाषेत अशी दडून येतात की ते बोलणाऱ्या किंवा ऐकणाऱ्या माणसाला ते असंबद्ध वाटते आणि भुताखेताचे खरे वाटते. आपल्या व्यथा आणि उध्वस्त जीवन सरळपणे पहायची हिम्मतच उरली नसल्याने ही पुटं चढवावीच लागतात. त्याला काय इलाज ?

अंगाला थोडीशी खरूज झाली की माणसाला त्याची लाज वाटते. पण सगळे अंगच खरजेने भरून गेले, की लाजेची पायरी मागे पडून वृत्तीत एक प्रकारचा मोकळेपणा येतो, तसे आमचे झाले आहे.

(संभ्रम)

मानवी समानता हे धर्मापेक्षा उच्च नैतिक मूल्य

- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

लक्ष्मण बाळाजी जोशी - (जन्म १९०१) आधुनिक युगातील ज्ञानमहर्षी. उदार दृष्टीचे आणि राष्ट्रीय वृत्तीचे थोर धर्मपंडित. प्राचीन भारतीय धर्मविचाराचे चिकित्सक भाष्यकार. आधुनिक वैज्ञानिक विचारांचे पुरस्कर्ते. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, साहित्यशास्त्र, तत्त्वज्ञान इ. अनेक ज्ञानशाखांत अव्याहत संचार करणारे गाढे व्यासंगी, पट्टीचे वक्ते. रसिक पंडित. पुरोगामी विचारवंत. गांधीयुगातील वैचारिक प्रबोधनाचे नेते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडणीचे थोर शिल्पकार. मराठी साहित्य संमेलन दिल्ली (१९५४) चे अध्यक्ष. श्रीकेवलानंद सरस्वतींच्या वाईतील प्राज्ञपाठशाळेत अध्ययन करून न्यायशास्त्रातील तर्कतीर्थ ही पदवी संपादन केली.

हिंदूधर्माची समीक्षा, जडवाद, वैदिक संस्कृतीचा विकास, आनंदमीमांसा, विचारशिल्प, ज्योतिर्निबंध हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ. धर्मकोशाचे संपादक. मराठी साहित्य व संस्कृती मंडळाचे अनेक वर्षे अध्यक्ष. मराठी विश्वकोशाचे संपादन सध्या चालू.

गेल्या दीडशे वर्षांत आधुनिक भारताच्या आणि आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीला कारण होणारी जी राजकीय आणि सामाजिक आंदोलने झाली त्यातील मोठ्या वैचारिक संघर्षाची मुख्य केंद्रे बंगाल आणि महाराष्ट्र होत. बंगालमधील महान प्रज्ञावंत राजा राममोहन रॉय यांचे नाव प्रथम येते, त्याचप्रमाणे महारष्ट्रामधील महादेव गोविंद रानडे यांचे स्मरण प्रथम होते. राजकीय सुधारणा आणि सामजिक सुधारणा या दोन्ही एकमेकांना पूरक अशा प्रवृत्ती असून दोन्ही प्रवृत्ती या सारख्याच महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत; कारण स्वातंत्र्य हे त्याचे मूलभूत प्रेरक तत्त्व आहे, असा व्यापक तात्त्विक दृष्टिकोन सांगणारे जे प्रज्ञावंत झाले, त्यांच्यात महादेव गोविंद रानडे यांचे स्थान सर्वोच्च मानावे लागेल. महादेव गोविंद रानडे यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन

सबंध आयुष्यभर विरोधात राहिलेल्या लोकमान्य टिळकांनी खालील शब्दांत त्यांच्याविषयी लिहिलेल्या मृत्यूलेखात केले आहे. ते म्हणतात -

"महाराष्ट्र म्हणजे त्यावेळी जो थंड गोळ होऊन पडला होता, त्या थंड गोळ्याला कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असता तो सजीव होईल व हातपाय हलवू लागेल याचा रात्रंदिवस विचार करून अनेक दिशांनी अनेक उपायांनी अनेक रितींनी त्यास पुन्हा जिवंत करण्याचे दुर्घट काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड मेहनत जर कोणी केली असेल, तर ती प्रथमतः महादेवरावांनीच केली, असे म्हटले पाहिजे. आमच्या मते, हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय."

भारताच्या राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा मुख्य प्रारंभ इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेने झाला. त्याबरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या आणि प्रबोधनाच्या आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याचे कार्य म. गो. रानडे यांनी स्थापलेल्या सामाजिक परिषदेने सुरू केले. यावेळी म्हणजे १८८७ च्या सुमारास सामाजिक सुधारणेचे शत्रूही मोठ्या हमरीतुमरीने पुढे सरसावले.

सुधारणा-शत्रूंच्या धमक्या

काँग्रेसच्या मंडपातच सामाजिक सुधारणेची परिषद भरविण्याची पद्धत सुरू होती. काँग्रेस कमिट्या निरनिराळ्या प्रांतांत स्थापन झालेल्या होत्या आणि त्या वाढत होत्या. त्यावेळच्या मुंबई इलाख्यात तेरा काँग्रेस कमिट्या कार्य करीत होत्या. त्यापैकी नऊ काँग्रेस कमिट्यांनी सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात घेण्यास संमती दाखवली. सुधारणा शत्रूंना "केसरी" आणि "मराठा" पत्रांचा पाठिंबा होता. सुधारणाशत्रू खोट्या अफवा उठवीत असत. अत्यंत बीभत्स टीकाही करीत. एका सुधारणाशत्रूने बीभत्स जाहिराती भिंतीवर लावल्यामुळे तो फौजदारी गुन्ह्याच्या सापळ्यात सापडला व दंड भरून सुटला. त्यावेळी पुणे येथे श्रीधर विठ्ठल दाते नावाच्या आडदांड गृहस्थानी काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरल्यास, आपण मंडपाला आग लावल्याशिवाय राहणार नाही, अशी प्रतिज्ञा एका सभेत जाहीत केली; आणि एवढेच नव्हे, तर महादेवराव रानड्यांसमोर तिचा पुनरुच्चार केला. महादेवरावांचा स्वभाव हिमगिरीसारखा शांत आणि धीरोदात्त होता. त्यांनी थंडपणे उत्तर दिले. दाते म्हणाले होते की, आपल्या बायकामुलांना परिषदेमध्ये आणू नका. त्यावर रानडे


म्हणले, "याचा आम्ही पूर्वीच विचार केला आहे. आम्ही मंडपात गेल्यावर आमच्या बायका मागे रहायला तयार नाहीत. इतकेच नव्हे, तर तुम्ही आग लावणार म्हणून आमच्या बायका मुलाबाळांसकट सामाजिक परिषदेसाठी काँग्रेसच्या मंडपात येणार आहेत. या बाबतीत आम्ही सर्वांनी दृढनिश्चय केला आहे. मंडपाच्या आगीत सापडून, तुमच्या डोळ्यात सलणारे आम्ही सुधारक जळून जाण्यास तयार आहोत. सुधारकांचे निःसंतान झाल्याने तुमचा फायदाच होणार आहे; मग मागे कटकट उरणार नाही." हा दाते-रानडे संवादही पत्रकारांनी त्यावेळी हिंदुस्थानात पसरविला. खोट्या बातम्या देण्यात सुधारणाशत्रू निर्ढावलेले होते. मद्रासचे दिवाणबहादूर रघुनाथराव हे विद्वान गृहस्थ समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध होते. ते सुधारकांच्या गोटातून बाहेर पडले आहेत, अशी बातमी सुधारणाशत्रूंनी पसरविली. ही बातमी सुधारणाशत्रू गोपाळराव जोशी यांनी पिकवली होती. महादेवरावांनी मात्र काँग्रेसच्या मंडपात परिषद न भरवता स्वतंत्र मंडपात परिषद भरविण्याचे ठरविले आणि फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात स्वतंत्र मंडप उभारून परिषद निर्विघ्नपणे पार पडली. भारतातून ७९७ प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे त्यावेळचे काँग्रेसचे नेते होते. काँग्रेसच्या व्यासपीठावरून रानडे यांचे त्यांनी "नव्या भारताचा द्रष्टा" म्हणून स्तुतीस्तोत्र गायले. लोकोत्तर क्षमाशीलता आणि प्रचंड विद्वत्ता यांचा संगम महादेवरावांच्या ठिकाणी झालेला होता; ही गोष्ट लोकांना त्यांनी मोठ्या आवेशाने पटविली.

निराळा कार्यक्रम हवा

त्यावेळच्या सामाजिक परिषदांपेक्षा यापुढे होणाऱ्या सामाजिक परिषदांचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात निराळा आखण्याची आवश्यकता आहे. परंतु सामाजिक सुधारणेचे मौलिक तत्त्वज्ञान आज बदलण्याची जरूर नाही. सर्व **मानवांची एकता, व्यक्तिस्वातंत्र्य** आणि **सामाजिक समता** ही नैतिक मूल्ये गेल्या शंभर वर्षातील भारतीय प्रबोधनाच्या मुळाशी आहेत. भारतीय संसदीय लोकशाही याच नैतिक मूल्यांच्या अधिष्ठानावर उभी आहे. **परंतु धर्मनिरपेक्षतेचा म्हणजे इहवादाचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा म्हणून नव्या संदर्भात पुरस्कारणे, हे आज अत्यंत आवश्यक ठरत आहे.** भिन्न भिन्न धार्मिक समाज हे एकमेकांपासून वेगळे आणि मानसिक अंतर ठेवणारे समाज आहेत. त्यामुळे सामाजिक सामरस्य आणि मानवी समानता यांचा प्रत्यय या

परंपरागत धर्मामुळे येऊ शकत नाही. राष्ट्रीय एकात्मतेलासुद्धा तो एक धोका आहे. मानवी समानता हे धर्मापेक्षा अधिक उच्च नैतिक मूल्य आहे. आणि त्या मूल्याचा दैनंदिन जीवनातील सर्व व्याहारांमध्ये प्रत्यक्ष प्रत्यय आला पाहिजे. या दृष्टीने आपल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संस्था यांचे संशोधन व्हावयास पाहिजे. कौटुंबिक जीवनातही त्या समानतेचा प्रत्यय समान नागरिक कायद्यानेच येऊ शकतो. भिन्न धार्मिक समाजातील स्त्री-पुरुषांचे आंतरधर्मीय विवाह होण्यास परंपरागत धर्माचा संस्कार आडवा येणार नाही, इतके सामाजिक वातावरण बदलणे आवश्यक आहे. तात्पर्य, यापुढे भरणाऱ्या सामाजिक परिषदांचा कार्यक्रम हा अनेक बाबतींत गतकालातील सामाजिक परिषदांच्या कार्यक्रमापेक्षा अगदी वेगळा असा आखला पाहिजे.

(लोकसत्ता - रविवार, दि. २९/११/८७)



REFBK-0026092

अंधश्रद्धा निर्मूलन कार्याला महाराष्ट्रात दीर्घकालीन परंपरा लाभली आहे. एकनाथ, तुकाराम इ. मध्ययुगीन भक्तीसंप्रदायातील संत यात आघाडीवर होते. गेल्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात इंग्रजी सत्ता दृढमूल झाली. नव्या इंग्रजी साम्राज्याबरोबर विज्ञान आणि आधुनिक शिक्षण या देशात आले. त्यानंतर अनेक मान्यवर विचारवंतांनी अंधश्रद्धेवर आघात करण्यासाठी लेखन केले. यातील काही महत्त्वाचे साहित्यिक विचारवंत समाजसुधारक यांचे लिखाण एकत्र केले आहे. समाजसुधारणे बद्दल आस्था असणाऱ्या या सर्व परिवर्तनवादी लेखकांचे उद्‌बोधक विचार प्रस्तुत पुस्तकात आहेत. चळवळीच्या कार्यकर्त्यांना व या कामाविषयी प्रेम वाटणाऱ्या सर्व जिज्ञासु रसिकांना या विषयावरील हे अभिनव संपादन उपयुक्त ठरेल.